CMYK





सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १३ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ६८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com









## महत्त्वाचे

### विदेशी गुंतवणूकदारांकडून शेअर्स विक्रीचा सपाटा

**मुंबई** : विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जानेवारी महिन्यात म्हणजेच मागील १० दिवसांमध्ये २२१९४ कोटी रुपये भारतीय शेअर बाजारातून काढून घेतले आहेत. भारतातील कंपन्यांचे तिसऱ्या तिमाहीचे निकाल कमजोर असण्याची शक्यता, डॉलरची मजबूत होणे, त्याचवेळी अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प हे येत्या काही दिवसात अध्यक्षपद स्वीकारणार आहेत. त्यानंतर टॅरिफ वॉर वाढण्याची शक्यता असल्याने विदेशी गुंतवणूकदारांकडून काढता पाय घेतला जात आहे. डिसेंबर महिन्यात विदेशी भारतीय बाजारात १५४४६ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती.

### मणिपूरच्या दोन गावांत संचारबंदी

**इंफाळ** : मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यातील कंसाखुल आणि लीलोन वैफेई या दोन शेजारच्या गावांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली. दोन्ही गावे आणि त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील लोकांच्या हालचालींवर पुढील आदेश येईपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. एका गावातील कुकी तरुणाने दुसऱ्या गावातील नागा महिलेवर हल्ला केल्याने येथे तणावाचे वातावरण आहे. त्याच वेळी, कामजोंग जिल्ह्यातील होंगबाई भागात, जमावाने आसाम रायफल्सच्या तात्पुरत्या कॅम्पवर हल्ला केला आणि ते उद्ध्वस्त केले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सैनिकांनी घराच्या बांधकामासाठी लाकूड नेण्यात येण्यापासून रोखले होते. याचा त्यांना राग आला. जमावाला पांगवण्यासाठी जवानांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि हवेत गोळीबार केला.




| शाही स्नानाचे मुहूर्त | पौष पौर्णिमा | मकर संक्रांती | मौनी अमावास्या | वसंत पंचमी | रथसप्तमी | माघी पौर्णिमा | महाशिवरात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३ जानेवारी | १४ जानेवारी | २९ जानेवारी | ३ फेब्रुवारी | ४ फेब्रुवारी | १२ फेब्रुवारी | २६ फेब्रुवारी |

◆ **प्रयागराज, १२ जानेवारी**

संगम तट सोमवारपासून पुढचे ४५ दिवस सनातनचे सर्वांत मोठे 'शक्तिकेंद्र' बनणार आहे. गंगा-यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या धारा हजारो किमी प्रवासानंतर जशा प्रयागला मिळतात तसेच सनातन आस्थेचे प्रतीक चारही शंकराचार्य, शैव-वैष्णव, उदासीनसह सर्व आखाड्यांचे महामंडलेश्वर, सर्व परंपरांचे जगद्‌गुरू, सिद्धयोगी आणि संत-महंत पौष पौर्णिमेपासून महाशिवरात्रीपर्यंत संगमाच्या किनाऱ्यावर विराजमान असतील. चारही धाम, सात पुरींसह सर्व प्रमुख तीर्थस्थळांचे प्रतिनिधी आणि उत्सवमूर्ती, प्राचीन आणि आधुनिक मत-संप्रदायांचे प्रमुख एकाच ठिकाणी दर्शन देतील. त्यांची कठोर तपश्चर्या, लाखो मंत्रपाठ, जप-कीर्तन आणि यज्ञ आहुतींनी त्रिवेणी तट सनातनचे शक्तिकेंद्र बनेल.

उत्तरप्रदेशातील योगी सरकारने जगातील सर्वांत मोठ्या धार्मिक उत्सवासाठी 'महाकुंभ क्षेत्रा'ला ७६ वा अस्थायी जिल्हा बनवले आहे. ४० चौरस किमी क्षेत्रावर ४० कोटींहून अधिक भाविक येण्याचा अंदाज आहे. केंद्र आणि राज्य सरकारने त्यासाठी ६,३८२ कोटी रुपयांचे बजेट निश्चित केले. अलाहाबादचे नाव प्रयागराज झाल्यानंतर या पहिल्या कुंभमेळ्यात जिल्ह्याच्या बाहेरील भागापासून संगमापर्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्था आहे. (वृत्तसंस्था)

- सुरक्षित स्नानासाठी २५ हायटेक जेट स्की जल पोलिसांना देण्यात आली आहेत
- ३० अस्थायी पूल, २.६९ लाख अद्ययावत प्लेटने ६५० किमी रस्ता तयार
- २०० खाटांचे रुग्णालय, ५ लाख लोकांच्या डोळ्यांची तपासणी होईल
- ९ पक्के, १२ किमीत ५० अस्थायी घाट
- १०२ पार्किंग त्यात ५ लाख वाहने उभी राहू शकतील, देय फास्टॅगद्वारे होईल

### महाकुंभ झाला डिजिटल

यंदा महाकुंभातील देखरेख व नियंत्रण यासाठी उच्चस्तरीय उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मेळ्याचे इंटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सेंटर या संपूर्ण यंत्रणेचा मेंदू आहे. येथे अधिकाऱ्यांना उच्चस्तरीय संगणक प्रणालीद्वारे संपूर्ण मैदानावर लक्ष ठेवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. निरीक्षणासाठी ५२-सीटर क्षमतेची चार विशेष केंद्रे तयार करण्यात आली आहेत. कुंभच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी २,७५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ४० कोटी भाविकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सक्षम केले आहे. देशातील आतापर्यंतचा हा सर्वांत मोठा फेस रेकग्निशन उपक्रम मानला जातो. याशिवाय, १०८ कॅमेरे नंबर प्लेट्स् ओळखण्यासाठी खास तयार करण्यात आले आहेत. एआय-आधारित २६८ व्हिडीओ कॅमेरे गर्दीच्या हालचालींचे निरीक्षण करण्यास तैनात आहेत. वाहतूक व्यवस्थापनासाठी आणि पार्किंगची सोय करण्यासाठी २४० एआय-आधारित प्रणाली तैनात करण्यात आली. कुंभमध्ये प्रथमच सायबर पोलिस स्टेशनची स्थापना करण्यात आली आहे.

## २०४७ पर्यंत युवाशक्ती देश विकासासाठी पुढे येईल : पंतप्रधान

◆ **नवी दिल्ली, १२ जानेवारी**

भारतीय युवकांची क्षमता देशाला विकसित होण्यासाठी शक्ती प्रदान करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी व्यक्त केला.

विकसित भारत युवा नेता संवादा दरम्यान संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, काही लोकांना भारत विकसित होण्याचे ध्येय कठीण वाटू शकते. परंतु ते अशक्य नाही.



देशाच्या युवांची ताकद आणि संख्या यावर भर देताना पंतप्रधान म्हणाले की, 'विकसित भारत'ची भावना प्रत्येक पाऊल, धोरण आणि निर्णयाचे मार्गदर्शन करत असेल तर भारताला विकसित देश होण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही. देशाला पुढे जाण्यासाठी मोठी उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. भारत हेच करत आहे. देश वेगवेगळ्या क्षेत्रांत वेळेपूर्वीच असंख्य उद्दिष्टे साध्य करत असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

भारताने २०३० पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे लक्ष्य ठेवले आहे आणि त्यापूर्वीच ते ध्येय पूर्ण करेल. एकटे सरकार देशाची प्रगती करू शकत नाही. विकसित भारताची जबाबदारी केवळ एकट्या मोदीची नाही, तर युवांचीही आहे. त्यांचे विचार देशाच्या धोरणांचा भाग असतील आणि देशाला दिशा देतील, असे पंतप्रधान म्हणाले. (वृत्तसंस्था)

## शरद पवार शेतकरी आत्महत्या थांबवू शकले नाहीत : अमित शहा

**शिर्डी** : शरद पवार अनेक वर्षे केंद्रीय मंत्री होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देखील होते. मात्र, ते शेतकरी आत्महत्या थांबवू शकले नाहीत, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. भाजपाच्या शिर्डी येथे रविवारी झालेल्या महाअधिवेशनात अमित शाह बोलत होते. देवेंद्र फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे काम सुरू केले होते. त्यांनी जलयुक्त शिवार सुरू केले. आता या पाच वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मदतीने



ते दुष्काळमुक्त महाराष्ट्र करून प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात पाणी देण्याचे काम करतील, असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला. २०२४ वर्ष हे भाजपासाठी चांगले ठरल्याचे अमित शाह म्हणाले. तिसऱ्यांदा मोदी पंतप्रधान झाले. हरयाणात भाजपा तिसऱ्यांदा जिंकली. २०२४ वर्ष हे महत्त्वाचे आहे, याची इतिहासात नोंद केली जाई. स्थानिक निवडणुकीतही विजय मिळवायचा स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला विजय मिळवायचा असल्याचे शाह म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात निवडणूक लढून एवढे बहुत आले आहे. तुम्हीही मोठे काम केले आहे, फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्री बनवले. खरी शिवसेना आणि सच्च्या राष्ट्रवादी काँग्रेसचाही विजय झाला. शरद पवार यांनी राजकारणात जे केले, त्याला २० फूट दफन करण्याच काम तुम्ही केले आहे. उद्धव ठाकरे यांनी जे केले, त्यांना अद्दल घडवल्याचे काम तुम्ही केल्याचे शाह म्हणाले.

## नक्षलवाद सोडून पाच हजार युवक मुख्य प्रवाहात : गडकरी

**शिर्डी** : महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. जवळपास पाच हजार तरुण नक्षलवाद सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात आले आणि त्यापैकी कित्येकांना रोजगारही मिळाला, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी केले. अहल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे भाजपाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात



ते बोलत होते. गडकरी यांनी भाजपा कार्यकर्त्यांना पक्षाच्या निवडणुकीतील यशाचे अर्थपूर्ण सामाजिक परिवर्तनात रूपांतर करण्याचे आवाहन केले. मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीतील विजयामुळे सुशासन स्थापन होईल, असे ते म्हणाले. नक्षलग्रस्त गडचिरोलीत झालेल्या प्रगतीवर प्रकाश टाकताना ते म्हणाले की, एक काळ असा होता, जिल्ह्यातील काही भागांना भेट देणे लोकप्रतिनिधींसाठी कठीण होते. आज जवळपास पाच हजार तरुणांनी नक्षलवाद सोडला आणि ते मुख्य प्रवाहात आले. अनेकांना चालक, फिटरच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत. बेरोजगारी, कुपोषण आणि शिक्षणाचा अभाव या समस्या सोडवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.


## आजपासून ऐतिहासिक खो-खो विश्वचषकाला सुरुवात

### नवी दिल्लीत जगभरातील संघ दाखल

**नवी दिल्ली, १२ जानेवारी**

भारताच्या राजधानीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सोमवारपासून खो-खो विश्वचषक २०२५ स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या ऐतिहासिक प्रसंगासाठी २३ देशांतील ३९ संघांनी सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेत २० पुरुष व १९ महिला संघ आपले कौशल्य दाखवणार आहेत.

वातावरण क्रीडारसिकांच्या उत्साहाने भरले असून, खो-खोचा जल्लोष सोमवारपासून अधिकृतपणे सुरू होणार आहे. राजधानीत खो-खो चा आवाज घुमणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर खो-खोला जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या या स्पर्धेसाठी जगभरातील संघांचे दिल्लीत आगमन झाले आहे. इंदिरा गांधी इनडोअर



स्टेडियम या ऐतिहासिक पहिल्या वहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेचे साक्षीदार होणार आहे. या खेळाचा जागतिक व्यासपीठावर एक नवीन अध्याय सुरू होणार आहे. संघांचे आगमन पहिल्यांदा श्रीलंका व पेरू हे संघ दिल्लीमध्ये दाखल झाले. ११ जानेवारीला जवळजवळ १४ देशांचे संघ दाखल झाले. तर काल पर्यंत २३ पैकी एखाद दुसरा देश वगळता सर्वच संघ दिल्लीत पोहचल्याचे भारतीय महासंघाचे सहसचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी सांगितले. इराण, मलेशिया, बांगलादेश, इंडोनेशिया, नेपाळ आणि दक्षिण कोरिया हे संघ आपले कौशल्य दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

### पाश्चात्त्य देशांची नवी वाटचाल, 'खो-खो'ची मुसंडी

पाश्चात्त्य देशांमध्ये अमेरिका, पोलंड, नेदरलॅण्ड व जर्मनी या देशांचा सहभाग विशेष ठरणार आहे. या देशांमध्ये खो-खो हा खेळ नव्याने सुरु झाला असला तरी त्यांचा सहभाग त्या-त्या देशांमध्ये खो-खो खेळाला सरावाने आपला करू लागले आहेत. याशिवाय, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया हे दक्षिण देशही उत्साहात सहभागी झाले आहेत. अर्जेंटिनाचा सहभाग दक्षिण अमेरिकेतील खो-खोला मिळालेली देणगी ठरणार आहे. दिल्लीमध्ये आगमन झालेल्या सर्व संघांचे सराव सत्र सुरू झाले असून त्या निमित्ताने स्टेडियमच्या परिसरात उत्साह निर्माण झाला आहे.

## बांगलादेशींना दस्तावेज म्हणजे 'व्होट जिहाद भाग-२'

### देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

◆ **शिर्डी, १२ जानेवारी**

बांगलादेशी घुसखोरांनी बनावट दस्तावेजांद्वारे राज्यात मतदानाचा अधिकार मिळवणे म्हणजे 'व्होट जिहाद'चा दुसरा भाग आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी म्हटले.



नोव्हेंबरमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान फडणवीस यांनी २०२४ च्या सुरुवातीला झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाविरुद्ध एका समुदायाने मोठ्या प्रमाणात मतदान केल्याची उदाहरणे दिली होती आणि त्याला 'व्होट जिहाद' असे संबोधले होते.

व्होट जिहाद-२ चा भाग म्हणून बांगलादेशी घुसखोर महाराष्ट्रात जन्म प्रमाणपत्र मागत आहेत, असे फडणवीस यांनी अहल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथील भाजपाच्या अधिवेशनात सांगितले. अमरावती आणि मालेगाव तहसीलमध्ये असे जवळपास १०० प्रकरणे नोंदवली गेली आहेत. ५० वर्षे वयोगटातील ही लोकं बेकायदेशीररीत्या दस्तावेज मिळवत आहेत.

एकाही घुसखोराला महाराष्ट्रात राहू देणार नाही, असे फडणवीस यांनी ठामपणे सांगितले. त्यांचे सरकार जाती आधारित आणि जातीय फूट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या अराजकतावादी शक्तींचा सामना करण्यासाठी वचनबद्ध आहे, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### ८९ टक्क्यांचा स्ट्राईक रेट

भाजपा हा एकमेव असा पक्ष आहे, ज्याने मागील ३० वर्षांत सलग तीन निवडणुकांत १०० जागांचा टप्पा ओलांडला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वामुळे आम्हाला आत्मविश्वास मिळाला आणि भाजपाला ८९ टक्क्यांच्या स्ट्राईक रेटसह १३२ जागा मिळाल्या, असे फडणवीस म्हणाले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करा

### चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

◆ **शिर्डी, १२ जानेवारी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी काळात होणार आहेत. त्यासाठी आपल्याला महायुतीची तयारी करायची आहे. पक्षाचीही तयारी करायची आहे. तुम्ही आम्हाला सत्तेवर बसवले आहे. आता तुम्हाला सत्तेत आणायचे आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामावर विश्वास होता. विधानसभा निवडणूक आपण ग्रामपंचायतीप्रमाणे लढलो. लोकसभेत खोटा प्रचार विरोधकांनी केला. त्यात आपल्याला फटका बसला. त्यातून आपण खचलो नाही, तर लढलो. संघटनेला मजबूत करायचे आहे, असे बावनकुळे म्हणाले. शिर्डीत सुरू असलेल्या भाजपाच्या अधिवेशनात चंद्रशेखर बावनकुळे संबोधित करीत होते.

२०१९ मध्ये आपल्यासोबत विश्वासघात झाला. देवेंद्र फडणवीसांना चक्रव्यूहात अडकवण्याचा प्रयत्न केला होता. आपले सरकार सत्तेत आल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री व्हावे लागले, तेव्हा डोळ्यांत पाणी आले होते. अतिशय दुःख झाले. परंतु, देवेंद्र फडणवीस आधुनिक अभिमन्यू आहेत, असे बावनकुळे म्हणाले. कोल्हापुरात म्हणालो होतो की, महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होतील. कार्यकर्ते कामाला लागले आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले, असे बावनकुळे यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ‘एसबीआय’मध्ये वाजतेय ‘मेजर’ची काठी

## लाडक्या बहिणी, वृध्द नागरिक, विद्यार्थ्यांची गर्दी ; अशिक्षितांना पिटाळून लावण्यात येते

**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. १२ जानेवारी-**

लाडकी बहीण योजना, पेन्शन व संजय गांधी निराधार योजनेचे पैसे, विडी कामगार महिलांची मजुरी, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, केवायसी यांसारख्या कारणास्तव एसबीआय बँकेच्या अशोक चौक शाखेत लाडक्या बहिणींसह वृध्द नागरिक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत असून यामुळे लोकांचा गलका होत आहे. तेव्हा आवाज करु नका, शांत बसा असे ओरडत तेथील मेजर आपल्या हातातील काठी जोरजोरात वाजवत असतो. ‘त्या’ काठीच्या आवाजामुळे वृध्दांसह महिला वर्ग दचकत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

एसबीआय बँकच्या या शाखेत अशिक्षित, अल्पशिक्षित, महिला, विद्यार्थी, वृध्द नागरिक आदी ग्राहकांची संख्या जास्त आहे. असे असतानाही येथे पिण्याचे पाणी, मुतारीची अजिबात सोय नाही. रांगेत तासन्तास उभे राहावे लागत असल्याने वृध्द नागरिक वैतागून जात आहेत.



एसबीआयच्या अशोक चौक शाखेत नेहमी अशी गर्दी असते.



येथील मेजर हातात काठी घेऊन ती जोरजोरात वाजवत असतो.

### रेग्युलर कस्टमर्सना डोकेदुखी

स्टेट बँक ऑप इंडियाच्या अशोक चौक शाखेत लाडकी बहीण, पेन्शनधारक, विडी कामगार, विद्यार्थी यांचीच मोठी गर्दी असते. या शाखेत जेवढ्या काही काउंटर्स आहेत त्यापैकी एक-दोन काउंटर सतत बंद असतात. येथील अधिकारी, कर्मचारीच नव्हे साधं शिपाई सुध्दा ग्राहकांशी उध्दट व पटकून बोलतात. या साऱ्या गोष्टी रेग्युलर कस्टमर्सना डोकेदुखी बनत चालली आहे. त्यामुळे रेग्युलर कस्टमर्ससाठी स्वतंत्र काउंटर आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.

### एटीएम सेंटरमध्ये स्वच्छतेचा अभाव

या शाखेच्या बाहेर असलल्या एटीएम सेंटरवरही ग्राहकांची मोठी गर्दी होत असते. कंबर, पाय व पाठदुखी आणि सतत रांगेत उभे राहून त्रासलेल वृध्द तेथेच खाली बसून राहतात. त्यामुळे नंतर आलेले ग्राहक रांगेत पुढे जातात. वृध्द लोकांना तासन्तास ताटकळत राहावे लागत आहे. गर्दामुळे पासबुक भरुन घेण्यासाठी ग्राहकांमध्ये भांडणेही होत असतात. येथील एटीएम सेंटरमध्ये स्वच्छतेचा अभाव आहे. तसेच बँकेच्या समोर भररस्त्यावर वाहने दाटीवाटीने लावलेली असतात.

एखादी अडचण, प्रश्न याबाबत एखादा ग्राहक पुन्हा विचारणा केली असता येथील अधिकारी, कर्मचारी, शिपाई असे सारेचजण मोठ्या गुर्मीने मराठी कळत नाही का? असा उलट सवाल करत अशिक्षित ग्राहकांना अक्षरशः पिटाळून लावतात.

जुना विडी घरकुल, नवीन विडी घरकुल, एमआयडीसी, शास्त्री नगर, नीलम श्रमजिवी नगर, दत्त नगर, कुचन नगर, रविवार पेठ, गांधी नगर, मुस्लीम पाच्छा पेठ, सुनील नगर अशा लांबच्या ठिकाणाहून वृध्द नागरिक, विडी कामगार महिला रिक्षाने येत असतात.

परंतु सर्व्हर डाऊन आहे, साहेब नाहीत यांसह विविध कारणे सांगत आज या, उद्या या, परवा या असे म्हणत माघारी पाठविले जाते. त्यामुळे मनस्ताप होत आहे. तसेच रिक्षा भाड्याचा नाहक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे सांगण्यात येते.

## संक्षिप्त वृत्त



### डॉ. प्रशांत चाबुकस्वार यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

येथील मातोश्री गंगुबाई केकडे ज्यु.कॉलेजचे प्रा. डॉ. प्रशांत बजरंग चाबुकस्वार यांना स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य व मंत्रालय समन्वय समिती मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जाणारा, शैक्षणिक वर्ष २०२५ चा क्रांतिसूर्य महात्मा फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. व्यंकटेश महाजन महाविद्यालय,धाराशिव येथे सुधीर पाटील यांच्या हस्ते व प्रा. डॉ. बापुसाहेब आडसूळ, ॲड. तुकाराम शिंदे, श्री.गणेश नावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. प्रशांत चाबुकस्वार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव माजी महापौर महेश कोठे, अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आमदार देवेंद्र कोठे, खजिनदार प्रथमेश कोठे, संस्थासदस्या डॉ.राधिका चिलका, प्रभारी प्राचार्य सतिश मल्लाव, मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली, विभागप्रमुख नवनाथ व्हटकर यांनी अभिनंदन केले.




### विवेकानंद हे समाजाला नवी दिशा देणारे दीपस्तंभ : परमेश्वर व्हसुरे

**अक्कलकोट, दि. १२ जानेवारी-**

एक महान विचारवंत, समाजसुधारक स्वामी विवेकानंद हे एक संत नाहीत तर समाजाला नवी दिशा देणारे दीपस्तंभ आहेत त्यांच्या शिकवणीचा योग्य उपयोग केल्यास परिस्थिती सुधारेल आणि भविष्य अधिक उज्वल होईल.त्यांची शिकवण ही फक्त इतिहास नाही तर ती भविष्याची तयारी आहे असे मत साने गुरुजी कथामालाचे तालुकाध्यक्ष परमेश्वर व्हसुरे यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिनाच्या प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर औद्योगिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजशेखर हिप्परगी यशवंत घोंगडे विजय इंगळे विजयकुमार पाटील प्राचार्य दिलीपकुमार गायकवाड मेहबूब नदाफ आदी मान्यवर उपस्थित होते. युवा दिनानिमित्त निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, आपल्या आवडीचे छंद व तंत्रप्रदर्शन घेण्यात आले विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश घोडके, सातप्पा बगले, अक्षय वाघमारे, दिनेश मंठाळे, अमोल,बिराजदार, विश्वनाथ कोनापुरे, संतोषकुमार सोननद, प्रशांत स्वामी, वैशाली कलबुर्गे, प्रियांका गजेश्री शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले.




### पत्रकारांबरोबरच समाजानेही जनजागृतीसाठी पुढे यावे : काशीद

**दै. तरुण भारतच्या वरिष्ठ उपसंपादिका आरती कुसेकर यांना लायन्स क्लबचा आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान**


**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पर्यावरण, पाणी, निसर्ग वाचविण्याबरोबरच स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी पत्रकारांची भूमिका नेहमीच जागल्याची राहिली आहे. निसर्ग व समाजाचे संतुलन राखण्याची जबाबदारी केवळ पत्रकारांवर न टाकता त्यांच्याबरोबरच समाजानेही आता जनजागृतीसाठी पुढे आले पाहिजे, अशी अपेक्षा उद्योजक तथा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष प्रल्हाद काशीद यांनी व्यक्त केली. लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी आणि सोलापूर जिल्हा स्पोर्ट कौन्सिल तायक्वांदो असोसिएशनच्यावतीने पत्रकारदिनानिमित्त लायन्स क्लबचे प्रांतपाल ॲड.एम. के. पाटील व काशिद यांच्या हस्ते दै. तरुण भारतच्या वरिष्ठ उपसंपादिका आरती कुसेकर, हरिश्चंद्र कदम, बाळकृष्ण दोड्डी, श्रीनिवास दासरी, प्रशांत माळवदे, गोपाळ मुददिड्डी या पत्रकारांचा आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरव करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून काशिद बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी हे होते. प्रारंभी लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीचे अध्यक्ष मोहन भूमकर यांनी घंटा नाद केल्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर बँकेचे संचालक प्रकाश हत्ती, सोमशेखर भोगडे, राजश्री तडकासे यांची उपस्थिती होती. पत्रकारांमुळे देशात व जगात काय चालले आहे, याची माहिती मिळते. त्यामुळे पत्रकार हा देशाचा कणा असल्याचे ॲड. पाटील यांनी सांगितले तर सोलापूरची पत्रकारिता ही समाजाला दिशा देणारी असल्याचे गौरवोद्गार राजू राठी यांनी काढले. यावेळी ॲड. रा.गो.म्हेत्रस, ॲड. सत्यनारायण पसनूर, मुरलीधर आरकाल, राहुल भूमकर, मोहन ताठी, शंकर कणकी, नागेश्वर कन्ना, नरसप्पा इंदापुरे, विजय श्रीगिरी, सुरेश श्रीगिरी, बाबू चव्हाण, पुरुषोत्तम दुस्सा, मिलिंद बोमडयाल, सुनील पत्तेवार, माणिक भूमकर उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीदेवी येळमेली यांनी केले. आभार सोमशेखर भोगडे यांनी मानले.

## रक्तदान करून ५२ रक्तदात्यांनी केले राजमाता जिजाऊंना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

स्वराज्य जननी जिजाऊ माँसाहेब यांच्या ४७४ व्या जयंती निमित्त शहरातील पार्क चौक येथे राजमाता - राष्ट्रमाता जिजाऊ मध्ये मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने व छत्रपती ग्रुपच्या वतीने उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी श्रेष्ठदान रक्तदान करून ५२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मासाहेब जिजाऊंना अभिवादन केले. तत्पूर्वी, शनिवारी सायंकाळी फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या हस्ते जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेची प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली होती. तर रविवारी सायंकाळी राजमाता जिजाऊ पतसंस्थेच्या चेअरमन आशा शिंदे यांच्या हस्ते व संचालक मंडळांच्या उपस्थिती पूजन करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय महिला कबड्डी खेळामध्ये ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी मध्ये सहभाग घेतलेली अनुराधा अचलारी,१० मीटर धावणे राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवलेली पूजा राठोड, तलवारबाजीत राष्ट्रीय राष्ट्रीय ड्रायव्हिंग स्पर्धेत सहभाग नोंदवली आभा उज्वल मालजी, इंटरनॅशनल खेळाडू श्रावणी सूर्यवंशी ड्रायव्हिंग खेळाडू. आदींचा सत्कार यावेळी छत्रपती ग्रुपच्या वतीने करण्यात आला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष मनोज शिंदे, उत्सव अध्यक्ष अजयकुमार सिंह ,शितल टेकाळे, गजेंद्र जाधव ,सागर शिंदे, अक्षय जाधव, किशोर मोरे ,सिद्धू कटारे, विकी सूर्यवंशी, मधुकर कदम, योगेश मोरे यश मोरे, उदय मोरे, भीमाशंकर टेकाळे अनिल गायकवाड ,शिवाजी कोल्हे, अनिल इंगळे, तायाप्पा चव्हाण, संजय जाधव, कृष्णा पवार, प्रशांत पवार आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रमा घेतले

## क्षयरोगमुक्त मोहिमेंतर्गत एक लाख लाभार्थ्यांची तपासणी

**२४ मार्चपर्यंत चालू राहणार अभियान**

**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. १२ जानेवारी-**

१०० दिवसीय क्षयरोग मुक्त मोहिमेअंतर्गत तीस दिवसात आतापर्यंत विविध गट प्रकारांमध्ये एकूण १ लाख १६ हजार १७९ लाभार्थ्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी २ हजार ६९७ नॅट तपासण्या व ३ हजार ४०१ क्ष-किरण तपासण्या करण्यात आल्या. या अभियाना अंतर्गत आतापर्यंत ६१ नवीन क्षयरुग्ण शोधून काढण्यात यश मिळाले.

हे अभियान आयुक्त शीतल तेली-उगले, उपायुक्त आशिष लोकरे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांच्या सन्नियंत्रणात यशस्वीरित्या चालू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या महत्वकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उददीष्ट आहे. त्याअनुशंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त मोहिम, निक्षय शिबीरे आयोजीत करण्याची योजना केंद्रीय आरोग्य व कु.क.मंत्रालय यांनी तयार केली आहे. यामध्ये सोलापूर मनपा कार्यक्षेत्राची निवड करणेत आलेली आहे. दि.७ डिसेंबर २०२४ रोजी या मोहिमेचा संपूर्ण देशामध्ये शुभारंभ करण्यात आला. त्यानुसार सोलापूर मनपा कार्यक्षेत्रातही मोहिमेचा सुरुवात झाली आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर अभियानामध्ये सोलापूर मनपाच्या कार्यक्षेत्रातील अतिजोखमीच्या गटामधील झोपडपटटीतील रहिवासी, ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील नागरिक, मधुमेह बाधीत व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, बी.एम.आय. १८ पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती, मागील ५ वर्षाचे क्षयरुग्ण व मागील दोन वर्षाच्या क्षयरुग्णांच्या सान्नीध्यातील व्यक्ती, विडी कामगार, टॉवेल कामगार, उसतोड कामगार व साखर कारखात्यातील कामगार, इतर औद्योगीक कारखान्यामध्ये काम करणारे कामगार तसेच विविध प्रकारच्या शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, अंधशाळा, व्यसनमुक्ती केंद्रे, परिविक्षा गृहे, विविध प्रकारची धार्मिक प्रार्थना स्थळे, शाळा, कॉलेजेस या ठिकाणच्या व्यक्तींची क्षयरोग विषयक थुंकी तपासणी व एक्सरे तपासणी या १०० दिवसांच्या अभियानामध्ये करण्यात येणार आहे.

यामुळे क्षयरोगामुळे मृत्यूचे प्रमाण कमी करुन सोलापूर शहरातील क्षयरोगाचा प्रसार कमी होउन, सोलापूर शहर क्षयमुक्त करण्यास मदत होईल. त्यानुसार शहर क्षयरोग केंद्राकडून सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील वरील सर्व ठिकाणी दि.२४ मार्च २०२५ पर्यंत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त मोहिमेअंतर्गत विविध ठिकाणी निक्षय शिबीरांचे आयोजन केले.

## सोलापूरच्या साईश्वरला सुवर्ण, श्रद्धा गुंटूकला रौप्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पुणे इंटरनॅशनल किड्स जेन अल्फा मॅरेथॉन स्पर्धेत जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेचा धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक या बंधू भगिनींनी १४ वर्षे वयोगटात २.५ किमीची ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण करून त्यांच्या वयोगटात साईश्वर प्रथम तर श्रद्धा हिने द्वितीय क्रमांक संपादन करून अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक पटकाविले.

या स्पर्धेत विविध जिल्ह्यातील दोन हजार स्पर्धक सहभागी झाले होते. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह यांचे तसेच प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभत आहे.




## शैक्षणिक यशात शाळेचा महत्त्वाचा वाटा

**लेखिका दीपाली दातार; सेवासदन प्रशालेचे वार्षिक पारितोषिक वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

शाळा ही विद्यार्थिनींच्या आयुष्यात महत्वाची भूमिका बजावते मी या शाळेची माजी विद्यार्थिनी आहे, याचा मला रास्त अभिमान आहे. प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या आयुष्यात पुढे जाण्यासाठी वेळ आणि अभ्यासाचे योग्य नियोजन करून ध्येय गाठायचे आहे. आपल्या शैक्षणिक यशामध्ये आपल्या शाळेचा आणि गुरुंचा महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनींनी शाळेची आठवण कायम मनात ठेवली पाहिजे, असे मत ज्येष्ठ लेखिका दीपाली दातार-पतकी यांनी व्यक्त केले.

येथील सेवासदन प्रशालेचे स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण शाळेच्या माजी विद्यार्थिनी आणि लेखिका दिपाली दातार- पतकी यांच्या प्रमुख उपस्थित झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी सेवासदन संस्थेच्या सचिवा वीणा पतकी, सेवासदन संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, शालेय समितीचे अध्यक्ष विद्या लिमये, कार्यकारिणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, ॲड. अर्चना कुलकर्णी-जोशी, मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, मुख्याध्यापिका संगीता आपटे उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू, विद्यार्थिनी पंतप्रधान प्रतिनिधी किर्ती गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी ज्योती गोडसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शीला मिस्त्री यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.



संगीत शिक्षक विलास कुलकर्णी यांनी रचलेले व संगीतबद्ध केलेले स्वागतगीताचे सादरीकरण झाले. हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. अहवाल वाचन सतीश घंटेनवरू यांनी केले. आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार पूनम लगड इयत्ता १० वी क, व अष्टपैलू विद्यार्थिनी पुरस्कार स्नेहा पवार इयत्ता १० वी ब यांना प्रदान करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी मोरे-वाघमोडे यांनी केले. सूत्रसंचालन संगीता नगरकर व सूत्रसंचालन रुपाली पवार यांनी केले. यावेळी संस्थेचे माजी सचिव केदार केसकर, माजी मुख्याध्यापिका शीला पत्की, माजी उपमुख्याध्यापिका लता पोटफोडे, नामदेव राठोड, माजी शिक्षक सुपेकर, दिपाली गोन्यल, अरुण पोरे, श्रीमती सुमन पुरोहित उपस्थित होते.

## तक्रार निवारण दिनाच्या दुसऱ्या आठवड्यात १,०१२ तक्रारींचा निपटारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून सोलापूर ग्रामीण पोलीस दलात सुरू करण्यात आलेल्या तक्रार निवारण दिन या उपक्रमाचे आयोजन दिनांक ११.०१.२०१५ रोजी देखील सर्व पोलीस ठाणे स्तरावर करण्यात आले होते.

या तक्रार निवारण दिन मध्ये पोलीस ठाण्यास प्राप्त तक्रारी अर्जातील अर्जदार व गैरअर्जदार यांना चौकशीकामी हजर राहण्याबाबत समज देण्यात आली होती. त्यावरुन दिनांक ११.०१.२०२५ रोजी प्रत्येक पोलीस ठाणे येथील विशेष कक्षात उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष दुय्यम अधिकारी व बीट अंमलदार यांनी समुपदेशन, चर्चेतून यातून तक्रारी व अर्जाची निर्गती करण्यात आली आहे.

दिनांक १२.०१. २०२५ रोजीच्या तक्रार निवारण दिना मध्ये जिल्ह्यातील उपविभागानुसार निर्गती झालेल्या अर्जाची माहिती पुढीलप्रमाणे-

१) सोलापूर- १८८
२) अक्कलकोट-११५
३) बार्शी- १४०
४) करमाळा-२०९
५) पंढरपूर- १३०
६) मंगळवेढा- ११९
७) अकलूज- १११
एकूण - १०१२

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात अशा प्रकारे एकूण १०१२ अर्जाची निर्गती करण्यात आली आहे. तसेच यापूर्वी दिनांक ०४.०१.२०२५ रोजीच्या तक्रार निवारण दिनामध्ये ८३७ तक्रारीचा निपटारा करण्यात आला होता. या उपक्रमाचि यशस्वीता पाहता यापुढे आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

## पोलिस काका-दीदींच्या समुपदेशनामुळे वाचले शालेय विद्यार्थीनीचे प्राण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पोलिस काका व पोलिस दीदी या उपक्रमातील पोलिस कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनामुळे एका शाळकरी मुलीचा जीव वाचला. १० जानेवारी २०२५ रोजी पोलीस ठाणे दहिटणे गावातील येथील मेहता प्रशाला येथे इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या एका शालेय विद्यार्थीनीने जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडील पोलीस काका पोलीस दिदी पथकामध्ये नेमणुकीस असलेले महिला पोलिस कर्मचारी अनिता सुंदरलाल मोरे यांचे मोबाईल वरती फोन करुन, “मी माझ्या घरगुती कारणामुळे खुप निराश झाले आहे, मला काही सुचत नाही, तुम्ही १५ मिनीटात आले नाही तर मी माझ्या घरातच आत्महत्या करणार आहे“ असे कळविले. ही माहीती प्राप्त होताच महिला पोलिस कर्मचारी अनिता मोरे यांनी तात्काळ हालचाल करून पोलीस ठाणेकडील स्टाफसह सदर शालेय मुलीच्या राहत्या घरी दहिटणे या गावी जावुन पाहीले असता सदर शालेय मुलीने तिचे राहते घरातील बेडरुमचा दरवाजा बंद करुन बेडरुममधील फॅनला दोरी बांधुन पायाखाली खुर्ची घेवुन ती दोरी स्वतः हुन स्वतःच्या गळ्यामध्ये अडकावुन आत्महत्या करण्याचे तयारीत असतानाचे दिसून आले.

शहरातील शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांच्याबाबत घडणाऱ्या गंभीर गुन्ह्याना आळा बसविण्यासाठी तसेच त्या विद्यार्थ्याचे पोलीस अंमलदारांशी जवळीकता साधुन त्यांना तात्काळ पोलीस मदत मिळून त्यांचे संरक्षण व्हावे या उद्देशाने पोलीस आयुक्त राजकुमार यांनी शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात पोलीस काका व पोलीस दिदी या संकल्पनेवर पथक तयार केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस ठाणेकडील पोलीस काका पोलीस दिदी या पथकातील अंमलदार हे दररोज पोलीस ठाणे हद्दीतील शाळा कॉलेज, वसतीगृह येथे जावुन तेथील शिक्षकांना आणि विद्यार्थ्याना वेळोवेळी पोलीस प्रशासन तसेच समाजामध्ये घडणारे गुन्हे आणि गुन्हेगारापासुन स्वतःची घ्यावयाची काळजी त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करीत असतात. तसेच त्या विद्यार्थ्यांना पोलीस अंमलदार हे स्वताचे मोबाईल नंबर देतात.

त्यावेळी महिला कर्मचारी अनिता मोरे तसेच त्यांच्यासोबतच्या कर्मचाऱ्यांनी त्या मुलीची अत्यंत प्रेमाने समजुत काढुन तिला आश्वासन देवुन तिला दरवाजा उघडायला लावुन त्या शालेय मुलीस आत्महत्या करण्यापासुन वाचविले. या शालेय विद्यार्थीनीस जोडभावी पोलीस ठाणे येथे आणून तिला विश्वासात घेवुन तिच्याकडे चौकशी केले असता, दररोज चालणाऱ्या कुटुंबातील कलहास कंटाळुन आत्महत्या करण्याचा विचार केले असल्याचे तिने सांगीतले. सदर मुलीचे पोलिस निरीक्षक शेख आणि महिला कर्मचारी अनिता मोरे तसेच इतर स्टाफ यांनी मुलीची समजुत काढून तिला आत्महत्या करण्यापासून परावृत करुन परत एकदा सकारात्मक विचारात आणले आणि तिला तिचा आई-वडिलांच्या ताब्यात दिले.

सदरची कामगीरी पोलीस आयुक्त राजकुमार, पोलीस उप आयुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती शबनम शेख, पोलिस हवालदार विठ्ठल पैकेकरी, महिला कर्मचारी अनिता मोरे, सपना पवार यांनी पार पाडली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# राष्ट्रवादीमुळे महायुतीवर बदनामीच्या नामुष्कीचे संकट

## मस्साजोग प्रकरणाने राज्यभर बदनामी; मुख्यमंत्री गंभीर; विकेट मुंडेंची पडणार की घड्याळाची

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

बीड जिल्ह्यातील परळी येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येमुळे अवघा महाराष्ट्र हादरला असून मारेकऱ्यांसह या प्रकरणातील सूत्रधारांवर तातडीने कठोर कारवाईसाठी आणि बीड-परळी परिसरातील माफियाराज मूळासकट संपुष्ठात आणून गुंडागर्दीचा नायनाट करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलने सुरु आहेत. सामाजिक संघटना, कार्यकर्ते यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या आमदार, लोकप्रतिनिधी व नेत्यांनी हे प्रकरण खूपच गांभीर्याने घेतलेले असून दोषींवर कठोर कारवाईसाठी दररोज आंदोलने आणि आरोपांच्या फैरी झडत आहेत.

विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हे प्रकरण खूपच गंभीरपणे घेतल्याने या प्रकरणात पारदर्शी आणि कठोर कारवाई होणार हे आता स्पष्ट झालेले आहे. दरम्या या प्रकरणी राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव चर्चेत आल्याने महायुतीवर बदनामीच्या नामुष्कीचे संकट ओढावले आहे. याप्रकरणी मंत्री मुंडे यांची विकेट पडणार का थेट घड्याळाच महायुतीला मुकावे लागणार हे मात्र या प्रकरणी सुरु असलेल्या तपासावर आणि निष्कर्षावरच अवलंबून आहे. कारण याप्रकरणात सातत्याने आका आणि त्यांचा आका याचे सूतोवाच होत आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घण हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील माफिया राजचे अनेक किस्से आणि प्रकरणे बाहेर येवू लागली आहेत. परळी येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पाची फ्लाय ऍश, वाळू माफिया, लॅन्ड माफिया, पीक विमा, हार्वे स्टिंग अनुदान प्रकरण आदी सध्या राज्यभर गाजू लागली आहेत. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास पोलिस यंत्रणांच्या विविध विभागांकडून वेगाने आणि पारदर्शीपणे सुरु असल्याने लवकरच याप्रकरणात मोठे काही तरी बाहेर पडेल अशी स्थिती आहे. याप्रकरणातील बहुतांश आरोपींना मोकोका कायदा लागला असून सीआयडीने देखील न्यायालयात सांगितले आहे की, हे प्रकरण गंभीर असून सामुहिक गुन्हेगारीचा प्रकार आहे.

दरम्यान या गंभीर प्रकरणात वाल्मिक कराड याचे नाव समोर आल्याने आणि त्याच्यावर खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल होवून अटक झाल्याने या प्रकरणाला आता वेगळीच कलाटणी मिळालेली आहे. वाल्मिक कराड आणि राष्ट्रवादीचे मंत्री मुंडे यांचे घनिष्ठ संबंध उघड झालेले असून मंत्री मुंडे यांनी देखील कराड आपल्या जवळचे असल्याचे कबुल केलेले आहे. याप्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी नेहमीप्रमाणे बेधडकपणे सहभाग घेवून बीड जिल्ह्यातील माफियाराज यावर काही पुराव्यानिशी प्रकाश टाकला आहे. कराड आणि मुंडे यांचे संबंध कसे दृढ आहेत हे देखील त्यांनी पुढे आणले आहे. बीड जिल्ह्यात अनेकांना बंदूकीचे शस्त्र परवाने खिरापतीसारखे वाटलेले आहेत. विशेष म्हणजे दमानिया यांच्या पुराव्यामुळे जवळपास पाऊणशे शस्त्र परवाने प्रशासनाने रद्द केल्याने बीड जिल्ह्यात खरोखर माफिया राज होते हेच स्पष्ट होते आहे. भाजपाचे बीड येथील आमदार सुरेश धस यांनी मात्र कौतुकास्पद भूमिका घेत याप्रकरणी उघडपणे आरोपांचे सत्र सुरुच ठेवले आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी देखील याप्रकरणी थेट मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेत हे प्रकरण धसास लावून बीड जिल्ह्यातील माफियाराज

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

### आणखी एका सरपंचाचा अपघाती मृत्यू!

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण महाराष्ट्रभर गाजत असतानाच परळी परिसरातील आणखी एका सरपंचाचा अपघाती मृत्यू झाला आहे. हा मृत्यू आहे की घातपात असा संशय आ. सुरेश धस यांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातील माफियाराज महाराष्ट्रभर इतक्या मोठ्या प्रमाणात गाजत असतानाच एका सरपंच अभिमन्य पवार यांचा संशयास्पद अपघाती मृत्यू होतो हे देखील धक्कादायक आहे. विशेष म्हणजे राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परच्या घडकेने हा मृत्य झाला. नक्कीच बीड प्रकरणात कठोर कारवाई होणे आता काळाची गरज असल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे.

संपुष्ठात आणण्यासाठी प्रयत्न सुरु केलेले आहेत. मराठा नेते मनोज जरांगे यांच्यासह विविध मराठा समाजाच्या संघटनांनी देखील सरपंच संतोष देशमुख हत्तेप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईसाठी आंदोलने सुरु केलेली असून ती महाराष्ट्रभर पसरलेली आहेत. खा. शरद पवार यांनी देखील याप्रकरणी लक्ष घालून गंभीर कारवाईसाठी सरकारवर दबाव आणलेला आहे. आ. जितेंद्र आव्हाड यांनी देखील याप्रकरणी सडेतोड भूमिका घेत अनेक आरोपांच्या फैरी झाडलेल्या आहेत.

एकूणच हा गंभीर प्रकार आणि यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव आल्याने आपसूकच याप्रकरणाचे टेंशन महायुतीचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आलेले असणार आहे. मस्साजोग सरपंच देशमुख हत्या प्रकरण आणि बीड जिल्ह्यातील माफियाराज यामुळे महायुतीवर बदनामीच्या नामुष्कीचे संकट ओढावल्याचे चित्र आहे. राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी सरकारवर दिवसेंदिवस दबाव वाढत आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याप्रकरणी कोणालाही पाठिशी घालणार नसून तपासाअंती कोणीही दोषी आढळल्यास त्यावर कठोरात कठोर कारवाई होणारच असे ठामपणे सांगितले आहे. तर भाजपपाच्या काही मंत्र्यांनी मंत्री मुंडे यांच्या राजीनाम्याबद्दल देखील सूतोवाच केलेले आहे. नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अचानक दिल्ली वारी केल्याने बीडचे प्रकरण दिल्ली दरबारात पोहचल्याचे स्पष्ट होते.

याप्रकरणी मंत्री मुंडे यांच्या मंत्रिपदाची विकेट पडणार का? अजित पवार यांची भूमिका याप्रकरणी कठोर असणार का? अथवा केंद्राने हे प्रकरण खूपच गांभीर्याने घेतल्यास महायुतीतून राष्ट्रवादीचीच विकेट पडणार याकडे महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात आहे.

---



## राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्यावतीने मनपा उपायुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

**प्रलंबित मेडिकल बिलासह विविध मागण्यांचा समावेश**

महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र ाज्य शिक्षक संघटनेच्या वतीने महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या मनपा शिक्षकांचे प्रलंबित प्रश्नासंदर्भात राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी यांना निवेदन देण्यात आले. सातव्या वेतन आयोगाचा मनपा कडून मिळणारा दुसरा हप्ता, मुख्याध्यापक पदोन्नती, पदवीधर पदोन्नती, प्रलंबित मेडिकल बिल हे प्रश्न मांडण्यात आले. प्रलंबित मेडिकल दोनच दिवसात देण्याचे मान्य केले तसेच इतर प्रश्प लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी अध्यक्ष नागेश गोसावी, उपाध्यक्ष अझर पंजेवाले, सचिव अमोल भोसले कोषाध्यक्ष संदीप घोळवे, सहसचिव कल्लाप्पा कुंभार, आप्पासाहेब पाटील, संतोष सुतार, किरण शेळगे, विशाल मनाळे, विजय टेकाळे, संतोष सुतार, बसवराज माळी, अजीम शेख आदी शिक्षक उपस्थित होते.

## सदाशिवराव माने विद्यालयाने तिन्ही गटात मारली बाजी

### अकलूज येथील भव्य लेझीम स्पर्धेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ जानेवारी-**

संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या १९ व्या भव्य लेझीम स्पर्धेत सदाशिवराव माने विद्यालय अकलूजच्या शहरी मुले, मुली व प्राथमिक या तीनही गटाने प्रथम क्रमांक पटकावला. बक्षीस वितरणाने या स्पर्धेचा समारोप झाला.

विजय चौक अकलूज येथे संपन्न झालेल्या स्पर्धेसाठी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, कार्याध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील, शंकरराव माने-देशमुख, दीपक खराडे-पाटील, सतिशराव माने-देशमुख, अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे-पाटील, नितीन निंबाळकर, महादेव अंधारे, सुभाष दळवी, नारायण फुले, पांडुरंग एकतपुरे, रामचंद्र गायकवाड, अनिल कोकाटे, आप्पासाहेब मगर यांच्यासह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास रुपये ५ हजार, चषक व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक ४ हजार, तृतीय क्रमांकास रुपये ३ हजार सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र अशी बक्षिसे देण्यात आली. याचबरोबर उत्कृष्ट प्रशिक्षक सुभाष चव्हाण, उत्कृष्ट हलगी वादक विकास कांबळे, उत्कृष्ट घुमके वादक प्रदीप मस्के, उत्कृष्ट सनई वादक बंडू केंगार व उत्कृष्ट झांज वादक सदाशिव आरडे यांना रोख रक्कम बक्षीस,सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तीन दिवसात या स्पर्धेमध्ये एकूण ५५ संघातून सुमारे २१५० खेळाडूंनी आपला खेळ सादर केला.

मंडळाचे सर्व पदाधिकारी,सदस्य यांनी ही स्पर्धा उत्कृष्टपणे पार पडण्यासाठी परिश्रम घेतले. जयसिंह मोहिते-पाटील व स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्यासह उपस्थित महिला पालकांनीही लेझीमचा डाव सादर केला. हलगीच्या तालावर त्यांनी ठेका धरला. उपस्थितांनीही त्यांना मनमुराद दाद दिली. ही स्पर्धा पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.



### स्पर्धेचा निकाल : प्राथमिक गट

**प्रथम-** सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग अकलूज, द्वितीय महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग यशवंतनगर, तृतीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक विभाग मांडवे.

**खुला गट -(मुली)** श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील महिला वसतिगृह अकलूज. (मुले) प्रथम कर्मवीर बाबासाहेब माने पाटील विद्यार्थी वसतिगृह मोरोची व विजय विद्यार्थी वसतिगृह अकलूज आणि शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज.

**ग्रामीण गट- (मुले)** प्रथम मोरजाई विद्यालय मोरोची, द्वितीय श्री सावता माळी विद्यालय माळेवाडी, तृतीय सदाशिवराव माने विद्यालय माणकी व श्री बाणलींग विद्यालय फोंडशिरस.(मुली) प्रथम सावतामाळी विद्यालय माळेवाडी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला नातेपुते, द्वितीय श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस, तृतीय श्री चक्रेश्वर माध्यमिक विद्यालय चाकोरे.

**शहरी गट-(मुली)** प्रथम जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, सदाशिवराव माने विद्यालय अकलूज व महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, द्वितीय लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, प्रोत्साहनपर श्री हनुमान विद्यालय लवंग. (मुले) प्रथम सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, द्वितीय महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, तृतीय श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय वाघोली व कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर.

## अर्शीन कुलकर्णीच्या शानदार शतकामुळे महाराष्ट्र उपांत्य फेरीत

### विजय हजारे ट्रॉफी क्रिकेट : अर्शीन सामनावीर

**वडोदरा, दि. १२ जानेवारी -**

सोलापूरचा अर्शीन कुलकर्णी (१०७), अंकित बावणे (६०), निखिल नाईक (नाबाद ५२) आणि मुकेश चौधरी (३-४४) यांच्या अफलातून कामगिरीच्या बळावर महाराष्ट्र संघाने पंजाब संघाचा तब्बल ७० धावांनी पराभव करुन विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. शतकवीर अर्शीन कुलकर्णी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. त्याने एक गडीही टिपला.



कोटम्बी स्टेडियमवर महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यात बाद फेरीचा सामना झाला. आयपीएल स्टार खेळाडूंचा समावेश असलेल्या पंजाब संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र संघाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात सहा बाद २७५ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना पंजाब संघ ४४.४ षटकात २०५ धावांवर सर्वबाद झाला. महाराष्ट्र संघाने ७० धावांनी शानदार विजय साकारत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या महाराष्ट्र संघाच्या डावाची सुरुवात खराब झाली. आठ धावांवर महाराष्ट्राचे दोन खंदे फलंदाज तंबूत परतले होते. त्यानंतर युवा आक्रमक फलंदाज अर्शीन कुलकर्णी आणि अनुभवी अंकित बावणे या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १४५ धावांची भागीदारी करून डावाला आकार दिला. अंकित बावणे याने ८५ चेंडूत ६० धावांची महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी करून बाद झाला. अर्शीन आणि निखिल नाईक यांनी धावगती कायम ठेवली. ४५व्या षटकात अर्शीन याची आक्रमक शतकी खेळी संपुष्टात आली. अर्शीनने या महत्त्वाच्या सामन्यात धमाकेदार फलंदाजी करत बहारदार शतक ठोकले. अर्शिनने १३७ चेंडूंचा सामना करत १०७ धावा फटकावल्या. त्याने चौदा चौकार ठोकले, निखिल नाईकने त्याला अप्रतिम साथ दिली. निखिलने अवघ्या २९ चेंडूत नाबाद ५२ धावांची स्फोटक खेळी साकारली. अखेरच्या काही षटकांमध्ये निखिल व सत्यजीत यांनी धमाकेदार फलंदाजी करत अर्शीन कुलकर्णी, अंकित बावणे यांनी सामन्यावर संघाला वर्चस्व मिळवून दिले.

पंजाब संघाकडून अर्शदीप सिंग याने ५६ धावांत तीन विकेट घेतल्या. नमन धीर याने २९ धावांत दोन बळी टिपले. अभिषेक शर्मा याने ४२ धावांत एक गडी बाद केला. आयपीएल स्टार खेळाडूंचा समावेश असलेल्या पंजाब संघाला विजयासाठी २७६ धावांची आवश्यकता होती. पंजाब संघाची एकवेळ सहा बाद ११९ अशी बिकट स्थिती झाली होती. अनमोलप्रीत सिंग (४८), सनवीर सिंग (२४) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. अर्शदीप सिंग याने ३९ चेंडूत ४९ धावा फटकावत सामन्यात चुरस आणण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत सामना पंजाबच्या हातातून निसटला होता. त्याने तीन षटकार व तीन चौकार मारले. सिद्धेश वीर याने रघु शर्माला धावबाद केले. प्रदीप दचे याने अर्शदीपला बाद करत संघाच्या दिमाखदार विजयावर शिक्कामोर्तब केले. महाराष्ट्र संघाकडून मुकेश चौधरी याने ४४ धावांत तीन विकेट घेत सामना गाजवला. प्रदीप दधे याने ३१ धावांत दोन गडी टिपले. रजनीश गुरबानी (१-४४), अर्शीन कुलकर्णी (१-७), सत्यजीत बच्छाव (१-४१), अजीम काझी (१-२४) यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

---

## औसा तालुक्यातील कमालपुरात अल्पवयीन मुलाची निर्घृण हत्या

**आरोपींना अटक केल्याशिवाय मृत्तदेह ताब्यात घेण्यास नातेवाईकांचा नकार; गावात तणावाचे वातावरण**


### गय करणार नाही : भोळ

अल्पवयीन मुलाची हत्या करणाऱ्यांवर व या प्रकरणात मदत करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन मयताच्या कुटुंबाला न्याय मिळवून देणार असल्याचे भादा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजकुमार भोळ यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा**
**औसा दि. १२ जानेवारी-**

औसा तालुक्यातील कमालपूर येथील अल्पवयीन तीन मित्रांपैकी दोघांनी मिळून रितेश विरेंद्र गिरी (वय १४ वर्षे) याची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करुन प्रेत सोयाबीनच्या गुळीत लपवून ठेवल्याची घटना रविवार दि. १२ रोजी उघडकीस आली. यानंतर भादा पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करुन उजनी येथील आरोग्य केंद्रात रविवार दि. १२ रोजी रात्री उशीरापर्यंत शहविच्छेदन करण्यात आले.

मात्र नातेवाईकांनी आरोपीसह या हत्येत मदत करणाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. यामुळे रात्री उशीरापर्यंत गावासह परिसरात तणावाचे वातावरण दिसून आले. कमालपूर येथील अल्पवयीन तीन मित्र मिळून दुपारी विजया विठ्ठल गिरी यांच्या शेतात गेले. रात्री उशीरापर्यंत मयताच्या आई-वडिलांनी मुलाची शोधाशोध केली. सकाळच्या सुमारास दोघांपैकी एकाला विचारपूस केल्यानंतर घडलेली घटना समजली. यामुळे नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा सोयाबीनच्या गुळीत नग्नावस्थेत अल्पवयीन मुलाचा मृतदेह दिसून आला. या घटनेमुळे लहान मुलाकडे हत्यार कोठून आले. सोयाबीनच्या गुळीत लपविल्यानंतर मृताच्या अंगावरील कपडे काढून गुळीचा ढिगारा का बदलण्यात आला. असे अनेक प्रश्न आज अनुतीर्ण असले तरी यासाठी कोणी मदत केली. या सर्वांवरच हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मृताच्या नातेवाईकांनी केली. यामुळे गावात व उजनी येथील आरोग्य केंद्रात रविवारी रात्री उशीरापर्यंत तणावाचे वातावरण होते तर उशीरापर्यंत शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरु होती. राज्यामध्ये बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण गाजत असताना परळीत एका सरपंचाचा टिप्परच्या धडकेत मृत्यू झाला. अशा घटना घडत असताना चिमुकल्याच्या खुनामुळे महाराष्ट्र हादरुन गेला आहे.



## सामाजिक ऐक्याच्या जडणघडणीत मुस्लिम संतांचे योगदान महत्त्वाचे

### साहित्यिका मलाहेका शेख-सय्यद; तिसरे युगस्त्री फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

समाजिक ऐक्याच्या जडण-मुस्लीम मराठी संतांचे योगदान आज ही सर्वासाठी प्रेरणादायी आहे. हीच परंपरा चालविण्याचे कार्य सर्व मुस्लीम मराठी साहित्यिक पुढे नेत आहे. फातीमाबी शेखच्या नावांने हे आज तिसरा संमेलन होत आहे. सावित्रीबाई फुले यांच्या सोबतीण फातिमांबी शेख हया शिक्षणाचा पवित्र कार्य केले. त्यांच्या शिक्षणाचा दिवा कायम ठेवण्याचा आम्ही सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. तर सावित्रीबाई व फातिमाबीचे शिक्षणा विषयीचे स्वप्न पूर्ण होणार आहे, असे मत सुप्रसिध्द साहित्यिका, लेखिका मलेका महेबूब शेख -सय्यद यांनी व्यक्त केले.

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा लातूर आयोजित तिसरे राज्यस्तरीय फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. सर्वप्रथम स्वागत अध्यक्ष कवि इस्माईल शेख यांनी सर्वांचे मनपूर्वक स्वागत करून सर्व मान्यवरांना शाल बुके रेऊन सन्मानित केले. या संमेलनाचे उद्घाटन प्रसिध्द विचारवंत माजी प्राचार्य नागोराव कुंभार यांनी वृक्षाला जलदान देऊन केले. हे संमेलन सावित्रीबाई फुले यांच्या सोबतीण भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आले होते.



एकदिवसीय साहित्य संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून मोईज शेख, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ज्येष्ठ साहित्यिक फ.म.शहाजिंदे, अय्यूब नल्लामंदू, ॲड. हाशम पटेल, प्रा. मैनोद्दीन मुल्ला, संस्थापक कवी शेख शफी बोल्डेकर, पहिल्या संमेलनाध्यक्षा कवयित्री अनिसा सिकंदर शेख, कवी खाजाभाई बागवान, डॉ. इ. जा. तांबोळी, अफसर शेख, डॉ. एहसानुल्ला कादरी, विजय वडेराव, जाफरसाहाब शेख उपस्थित होते यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते स्पंदन या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. संमेलनाध्यक्षा मलेका शेख-सय्यद लिखीत अक्षर अक्षर शिकूया या बालकवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी वर्तमानातील मुस्लिम मराठी साहित्याची भूमिका ह्या विषयावर डॉ. जयद्रथ जाधव यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. यात रामराजे आत्राम , नसीम जमादार , मुतवल्ली मैजोद्दीन एम.,नौशाद उस्मान यांनी आपले विचार मांडले. उद्घाटन सत्रात स्व. ॲड. सिकंदर शेख यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा युगस्त्री फातिमाबी शेख समाजसेवा पुरस्कार कवयित्री नूरजहाँ शेख आणि स्व. हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक व लेखक गौसपाशा शेख यांना देण्यात आला. पुणे येथील ज्येष्ठ कवी बा. ह. मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली शंभर कवींनी कवीसंमेलनात सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन नसीम जमादार यांनी तर कवी संमेलनाचे सूत्रसंचलन उमाकांत अदमाने यांनी केले. संमेलन यशस्वी करण्यासाठी स्वागताध्यक्ष इस्माईल शेख,लातूर जिल्हाच्या अध्यक्षा तहेसिन सय्यद, कार्याध्यक्ष नदिम कादरी, उपाध्यक्ष ॲड. एकबाल शेख, सचिव ॲड. सिमा पटेल, रमेश हनमंते, कासार रशिद, रसुल पठाण, कलिम शेख, अशफाख शेख, खालेद शेख, सत्तार शेख, मतिन अब्बासी, नजिर शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# लॉस एंजेलिसच्या अग्निकांडाचा धडा

मनोरंजनाची जागतिक राजधानी मानले जाणारे हॉलिवूड ज्या ठिकाणी आहे, अशा लॉस एंजेलिसमधील अलिकडच्या अग्निकांडाने नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याच्या मानवी मर्यादांचे पितळ पुनः एकवार उघडे पाडले आहे. लॉस एंजेलिस अमेरिकेत आहे आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानात अमेरिका हा मानदंड व मापदंड आहे, असा साऱ्या दुनियेचा समज आहे. त्यामुळेच एवढी मोठी आग आणि तीदेखील अमेरिकेत लागते, याचे सर्वांना आश्चर्य वाटते आहे. लॉस एंजेलिसला लागून असलेल्या वनक्षेत्राशेजारील संपूर्ण परिसर जळून राख झालेला आहे. हजारो कुटुंबे विस्थापित झाली आहेत, त्यांची उपजीविका विस्कळीत झाली आहे आणि हॉलिवूड चित्रपट उद्योगाला जणू ब्रेक लागला आहे. जॉन गुडमन, ब्रिटनी स्पियर्स, पॅरिस हिल्टन, बिली क्रिस्टल, रिकी लेक, हायडी मॉंटॅग, सर अँथनी हॉपकिन्स, टॉम हॅंक्स, बेन अफ्लेक, मँडी मूर, स्टिवन स्पिलबर्ग अशा अनेक सेलिब्रिटींना या अग्निकांडाचा फटका बसला. कुणाचे घर जळाले तर कुणाचे घर वाचूनही त्याला विस्थापित व्हावे लागले.

लॉस एंजेलिसचा प्रदेश भूमध्य सागरीय हवामानाचा आहे. तो तसा वणव्यांबाबत अपरिचित नाही; किंबहुना कुपरिचित आहे. कोरडे वातावरण, जोराने वाहणारे वारे आणि विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींच्या विस्तृत पट्ट्यांमुळे या प्रदेशात आगी लागण्यासाठी आणि वेगाने पसरण्यासाठी अनुकूल परिस्थिती असते. कॅलिफोर्नियामधील वणवे ही तशी हंगामी घटना आहे. परंतु, अलिकडच्या दशकांमध्ये वणव्यांची वारंवारता आणि तीव्रतेत चिंताजनक वाढ झाली आहे. वाढते जागतिक तापमान, दीर्घकाळ दुष्काळ आणि सहज आग लागू शकेल अशा भागांत मानवाने केलेले अतिक्रमण ही त्याची कारणे. विस्तीर्ण उपनगरे आणि जंगली क्षेत्रांच्या जवळ असल्याने लॉस एंजेलिस हा भाग तसा असुरक्षितच मानला जातो. 'व्हर्डुगो ब्लेझ' अशा नावाची ही आग जानेवारीच्या सुरुवातीला कोरड्या संध्याकाळी लागली. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, दाट वनस्पती असलेल्या भागात दोषपूर्ण विद्युत तारांमुळे ही आग लागली असावी. सांता आना वाऱ्यांमुळे आग वेगाने पसरली आणि पहिल्या ४८ तासांत ५० हजार एकरपेक्षा जास्त भागात अग्निकांड घडले. सारे काही जळून खाक झाले. लॉस एंजेलिसच्या बाहेरील भागातील लोकांना स्थलांतर करण्याचा आदेश देण्यात आला. आपत्कालीन सेवांना मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागला. अनेक आघाड्यांवर संसाधनांचा अभाव होता. हेलिकॉप्टर आणि पाणी टाकणारी विमाने वरून आग विझवण्यासाठी प्रयत्न करीत होती, तर अग्निशमन दलाच्या जवानांनी जमिनीवर अथक परिश्रम करून नियंत्रण रेषा तयार केल्या होत्या. ते आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. तरीही आगीचे थैमान घडलेच. मनोरंजन उद्योगाचे केंद्र असलेले हॉलिवूडही यातून सुटले नाही. आगीच्या धुराने हा संपूर्ण टापू व्यापल्यामुळे अनेक स्टुडिओजमध्ये कामकाज थांबवावे लागले. एव्हाना ही आग ८० टक्के आटोक्यात आलेली आहे, असे म्हणतात. या आगीत आतापर्यंत पाच हजारांवर घरे व इमारती नष्ट झाल्या आहेत. एक लाखावर रहिवासी विस्थापित झाले आहेत. त्यांना तात्पुरता निवारा आणि रेड क्रॉससारख्या संस्थांकडून मिळालेल्या मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे. अग्निकांडात झालेल्या आर्थिक नुकसानीचा अंदाज तीन अब्ज डॉलर्सहून अधिकचा आहे. यात झालेले पर्यावरणाचे नुकसान तितकेच विनाशकारी आहे. जंगलांचा मोठा भाग जळून खाक झाला आहे आणि त्यामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. कार्बन उत्सर्जन प्रचंड वाढले आहे. या प्रदेशाचे पर्यावरण पूर्वस्थितीला येण्यासाठी किमान एक दशक लागू शकेल, असे तज्ज्ञ म्हणतात.

यावरून या अग्निकांडाचे गांभीर्य लक्षात यावे. दृश्य असलेल्या नुकसानाव्यतिरिक्त या अग्निकांडाचा फटका बसलेल्या लोकांवर झालेले भावनिक आणि मानसिक परिणामही फार गंभीर आहेत. त्या भागात केवळ सेलिब्रिटिज राहत नाहीत. सामान्य माणसेही राहतात. त्यांना त्यांचे जीवन पुन्हा नव्याने उभे करण्याचे आव्हान पेलावे लागेल. अनेकांसाठी तात्पुरते घर मिळविणे आणि नोकरशाहीच्या ढिसाळ कारभारातून दिलासा मिळविणे, हे त्रासदायक ठरणार आहे. उपजीविकेचा प्रश्न वेगळा. अमेरिकेवर टीका करायची तर कितीही मुद्दे सापडतील. पण, लोकांच्या आर्थिक नुकसानासह मानसिक नुकसानीबद्दलही तिथले सरकार, समाज जागरूक आहे. आग अजून पूर्णतः आटोक्यात यायची असताना तेथे मानसिक स्वास्थ्याच्या स्थितीचा अभ्यास झाला. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, वणव्याचा फटका बसलेल्या अनेकांना पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (पीटीएसडी) चिंता आणि नैराश्याने ग्रासलेले आहे. विस्थापित लोकांमध्ये वृद्ध व्यक्ती, आजारी लोक आणि मुले आहेत. काही अपंग आहेत. या साऱ्यांचे पुनर्वसन हे आव्हानात्मक काम आहे. त्यासाठी शासन-प्रशासन कामाला लागलेले आहे. मात्र, अशा आपत्तींचा पूर्णपणे प्रतिबंध करणे आणि त्या आल्याच तर त्यांचा प्रभाव कमी करणे या दोन्ही गोष्टी अत्यंत कठीण असल्याचे एव्हाना सर्वांना पटलेले आहे. तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापनात जागतिक आघाडीवर असलेला युनायटेड स्टेट्स नावाचा देश या अग्निकांडाने पुरता हादरलेला आहे. कोणत्याही प्रमाणात संसाधने किंवा तयारी असली, तरी निसर्गाने निर्माण केलेल्या धोक्यांना आपण पूर्णपणे रोखू शकत नाही, हे शासकांच्या लक्षात आलेले आहे. यातील दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या घटनेला जागतिक हवामान बदलाचेही पदर आहेत. अग्निशमन व्यवस्थेत कितीही गुंतवणूक केली तरी कार्बनचे उत्सर्जन मर्यादित करणे, जमिनींच्या वापराबाबत सजगता दाखवणे, बांधकामाचे नियम अधिक कठोर करणे हे सारे आवश्यकच असते. भारतात यातले काहीही होत नाही. लोक कुठेही कसेही बांधकाम करतात आणि सरकारी यंत्रणा परवानग्या वाटत फिरते. आपल्याकडील आपत्तींची तीव्रता नेहमी अधिक असते ती त्यामुळे. वनस्पतींचे आच्छादन कमी झाले की त्या त्या प्रदेशाची कार्बन डाय ऑक्साईड शोषण्याची क्षमता कमी होते. अशा आपत्तींना अनुकूल असलेले हवामान त्यामुळे निर्माण होते. साऱ्या जगभर अशीच स्थिती आहे. वन्यजीव अधिवास नष्ट झाले आहेत, असंख्य प्राणी विस्थापित झाले आहेत आणि त्यांच्या परिसंस्था विस्कळीत झाल्या आहेत. अशात असे अग्निकांड घडते तेव्हा ते तात्पुरते नसते. ते अनेक नव्या प्रश्नांना जन्म देत असते. लॉस एंजेलिस परिसरातील लोकांसाठी संपूर्ण सामान्य स्थितीला पोहोचण्याचा मार्ग लांब पल्ल्याचा आहे. घरे आणि पायाभूत सुविधांची पुनर्बांधणी करण्यासाठी अनेक वर्षे लागतील. शहराच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असलेला मनोरंजन उद्योग अधिक वेगाने पुन्हा सुरू होण्यासाठीही काही काळ जावा लागेल. लॉस एंजेलिसमधील वणव्यामुळे हे स्पष्टपणे दिसते आहे की, जगभरातील कोणत्याही शहराला असा धोका होऊ शकतो. मग ते जंगलाला लागून असो वा नसो. कॉंक्रिटमुळे सर्वत्र आलेला कोरडेपणा हे आगीसाठी अनुकूल असलेला एक कारक आणि दाट लोकवस्त्यांमुळे ती वेगाने पसरते हा दुसरा मुद्दा. लॉस एंजेलिसमध्ये शहरी नियोजनाचा मुद्दा आता चर्चेला आलेला आहे. ते अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे (पहिला नंबर न्यू यॉर्कचा) शहर आहे. पाणी, जंगल, डोंगर-खोरे सारे आजूबाजूला. तरीही जे घडायचे ते घडले. लॉस एंजेलिसमधील आगीचा भडका निसर्गाच्या शक्तीची जशी आठवण देतो, तसा तो आपल्या असुरक्षिततेचेही स्मरण करून देतो. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात असे घडत असेल तर भारतात काय घडू शकेल, याचाही अंदाज यावरून करता येतो. त्यामुळे या घटनेतून भारताने धडा घेतला पाहिजे. आपली सर्व शहरे दाट लोकवस्त्यांची, कोंदट गल्ल्यांची, अस्वच्छतेची माहेरघरे आहेत. नागपूर-पुण्यासारख्या नगरांत जुन्या वस्त्यांमध्ये अग्निशमनाचे वाहन जाऊच शकत नाही, अशी स्थिती आहे. तरीही तिथली बांधकामे वैध आहेत. तिथला जमिनींचा वापर वैध आहे. निसर्ग अवैध कधीच नसतो. त्याला मर्यादा सोडून केलेले काम आवडत नाही आणि त्यामुळेच तो मानवाला अशा प्रसंगांतून मर्यादा दाखवून देतो. त्या ओळखून त्यातून धडा घ्यायचा आणि कामाला लागायचे की असा प्रसंग आपल्या गावात, वस्तीत घडेपर्यंत वाट पाहायची, एवढेच आपल्याला ठरवायचे आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# दिल्लीची 'दंगल' सुरू!

अखेर दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली. ५ फेब्रुवारी रोजी दिल्लीत मतदान होईल आणि ८ रोजी निकाल घोषित होतील. मागील १० वर्षांपासून सत्तेत असलेला आम आदमी पक्ष, १० वर्षांपासून सत्तेबाहेर असलेली कॉंग्रेस आणि मागील २६ वर्षांत सत्ता न मिळविता आलेली भाजपा अशी ही तिरंगी लढत असेल. यात आणखीही काही पक्ष-अपक्ष निवडणूक लढविणार असले, तरी मुख्य लढत भाजपा, आप व कॉंग्रेस यांच्यात होईल.

**तुल्यबळ लढत** : दिल्लीने एक-दोन अपवाद वगळता आजवर एकतर्फी निवाडे दिले आहेत. मग, ती लोकसभा निवडणूक असो की विधानसभा, ज्या पक्षाला कौल दिला तो भरभरून दिला आहे. लोकसभा निवडणुकीत सर्व सातही जागा भाजपाला दिल्या तर विधानसभेत केजरीवाल यांच्या पक्षाला छप्परफाड बहुमत दिले. यावेळी दिल्लीचा मतदार काय करणार, याचा अंदाज आज तरी लावता येणार नाही.

**जमेची बाजू** : लोकसभा निवडणुकीत भाजपा व कॉंग्रेस-आम आदमी पक्ष यांच्यात सरळ लढत झाली होती. आम आदमी पक्षाने चार जागा लढविल्या होत्या तर कॉंग्रेसने तीन जागांवर लढत दिली होती. पण, भाजपासमोर या युतीचा टिकाव लागला नाही आणि सातही जागा भाजपाने जिंकल्या. लोकसभेतील विजय ही भाजपाची जमेची बाजू आहे. शिवाय राज्यात सरकार नसल्याने सरकारविरोधात असलेल्या वातावरणाचा फटकाही भाजपाला बसणार नाही. पक्षासाठी ही जमेची बाजू मानली जाते. दुसरीकडे आम आदमी पक्षाची जमेची बाजू म्हणजे केजरीवाल यांची अटक. आम्हाला लक्ष्य केले जात आहे, असा सूर केजरीवाल लावणार आहेत. याच्या जोडीला त्यांची उपलब्धी म्हणजे शिक्षण, आरोग्य या दोन क्षेत्रात या सरकारने बजावलेली कामगिरी. सामान्य नागरिक दिल्ली सरकारच्या या दोन कामगिरींवर खूश असला, तरी केवळ या शिदोरीवर केजरीवाल यांना दिल्ली जिंकता येणार नाही. केजरीवाल यांनी आणखी दोन योजना घोषित केल्या आहेत. महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची योजना त्यांनी समोर आणली आहे तर ऑटोरिक्षा चालकाचा अपघातात मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास १० लाख रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली आहे. या दोन्ही घोषणांचा काही फायदा केजरीवाल यांना मिळू शकतो. मात्र, सत्तेत असल्याचे तोटेही त्यांच्या पदरात पडणार आहेत. केजरीवाल यांनी सरकार चालविण्यासाठी जनतेच्या पैशाची उधळपट्टी केली आहे, असेही काही लोकांना वाटते. केजरीवाल यांनी स्वतःची प्रतिमा तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जाहिराती केल्या, त्यासाठी सरकारी पैसा वापरला, असेही एक वातावरण आहे. केजरीवाल यांच्या जाहिरातबाजीवर सर्वोच्च न्यायालयानेही काही प्रसंगी टिप्पणी केली आहे. या साऱ्यांची गोळाबेरीज काय असेल यावर विधानसभा निकाल अवलंबून राहणार आहेत.

**जातीय समीकरण** : केजरीवाल हे स्वतः बनिया समाजाचे आहेत. या वर्गाचा त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आला आहे. याही निवडणुकीत तो मिळेल, असे मानले जाते. याशिवाय मुस्लिम त्यांना एकगठ्ठा मतदान करतील. लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस तर विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्ष असे धोरण मुस्लिम समाजाने आजवर अवलंबिलेले आहे. तेच या निवडणुकीतही होणार असे मानले जाते. दलित मते भाजपा, केजरीवाल व कॉंग्रेस या तीन भागांत विभागली जाण्याची शक्यता आहे.

**मायावतीही मैदानात** : उत्तरप्रदेशाच्या राजकारणातून जवळपास बाद झालेल्या बसपा नेत्या मायावती यांनीही दिल्ली विधानसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत काही मतदारसंघात बसपा उमेदवारांनी चांगली मते घेतली होती. पण, आता एकूणच बसपाचा राजकीय भाव घसरला असल्याने दिल्लीत बसपाचे उमेदवार किती-कितपत कामगिरी बजावू शकतात, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. मात्र, काही मतदारसंघात बसपा उमेदवारांनी चांगली मते घेतल्यास ते अन्य पक्षांना प्रभावित करू शकतात.

**बिहार-उत्तरप्रदेश** : बिहार-उत्तरप्रदेशातून आलेल्या मतदारांचा पाठिंबा भाजपाला मिळण्याची शक्यता आहे. कधीकाळी हा मतदार कॉंग्रेसकडे होता□□. त्याच शिदोरीवर मूळच्या उत्तरप्रदेशाच्या असलेल्या शीला दीक्षित यांनी दिल्लीवर तब्बल १५ वर्षे राज्य केले होते. हा सारा मतदार मागील काही वर्षांत भाजपाकडे वळला आहे. याचा भाजपाला चांगला फायदा मिळेल, असे मानले जाते. दिल्लीतील शीख समाज आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यात विभागला जाईल असे दिसते. पंजाबात आम आदमी पक्षाचे सरकार आहे. याचा काही फायदा दिल्लीत केजरीवाल यांना मिळू शकतो तर जाट, गुजर हे समाज भाजपाला एकगठ्ठा मतदान करू शकतात. जातीय समीकरणाचा विचार केल्यास भाजपा व आम आदमी पक्ष दोघेही तुल्यबळ असल्याचे दिसून येते. दिल्लीत अगदी जातीच्या आधारावर मतदान होत नसले, तरी त्याचा थोडाफार परिणाम तर प्रत्येक निवडणुकीवर होत आला आहे. तसा तो यावेळीही होणार आहे. कधीकाळी दिल्लीवर पंजाबी समाजाचे वर्चस्व राहात होते. आता ती स्थिती राहिलेली नाही. उत्तरप्रदेश-बिहारमधून आलेल्या मतदारांनी दिल्लीत आपले बस्तान बसविले आहे. ते निवडणूक निकालांना प्रभावित करू लागले आहेत.

**भाजपाचा चेहरा?** : भाजपाने या निवडणुकीत आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित केलेला नाही. मागील काही निवडणुकीत भाजपाने चेहरा घोषित न करण्याचे धोरण स्वीकारले आहे. राज्यात पक्षाला बहुमत मिळाल्यास एखादा नवा चेहरा मुख्यमंत्री म्हणून घोषित करण्याची तयारी पक्षाने ठेवली आहे. आप आदमी पक्षासाठी केजरीवाल यांचा चेहरा एक जमेची बाजू ठरू शकतो. मात्र, स्वतः केजरीवाल यांच्यासाठी नवी दिल्ली विधानसभा मतदरसंघातील लढत तुल्यबळ ठरण्याची चिन्हे आहेत. भाजपाने त्यांच्याविरोधात माजी खासदार परवेश वर्मा यांना उभे केले आहे. वर्मा जाट आहेत. नवी दिल्लीत जाट समाजाचे फार मतदार नाहीत, तरीही वर्मा केजरीवाल यांच्यासाठी डोकेदुखी ठरू शकतात. विशेष म्हणजे केजरीवाल यांच्याजवळ यावेळी मुख्यमंत्रिपदाचे वलय नाही. याचा काही परिणाम तर त्यांच्या निवडणुकीत दिसणार आहेच.

**व्यक्तिगत प्रतिष्ठा** : दिल्ली विधानसभेची ही निवडणूक केजरीवाल यांच्यासाठी व्यक्तिगत प्रतिष्ठेची ठरणार आहे. दिल्ली सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आहेत. दिल्ली मद्य घोटाळ्यात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजयसिंग या तिघांना तुरुंगात जावे लागले. आगामी निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यास, त्यासाठी दिल्ली मद्य घोटाळा जबाबदार ठरणार आहे, म्हणजेच केजरीवाल जबाबदार ठरणार आहेत. त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला ग्रहण लावणारी ही घटना ठरेल. शिवाय दिल्ली निकालांचा परिणाम केवळ दिल्लीपुरता मर्यादित न राहता, पंजाबवरही त्याचा परिणाम होणार आहे. दिल्ली हातातून गेल्यास पंजाब किती काळ आपच्या हातात शाबूत राखता येईल, हे आव्हान केजरीवाल यांना पेलावे लागणार आहे. राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा असलेला प्रादेशिक नेता हे केजरीवाल यांच्या राजकारणाचे वास्तव आहे. पण, हे वास्तव ते स्वीकारण्यास तयार नाहीत.

दिल्लीचे निकाल केजरीवालांना राजकीय वास्तवाच्या जवळ नेणारे ठरतात की त्यांच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेला बळ देणारे ठरतात हे तर ८ फेब्रुवारीलाच दिसणार आहे.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# पतंगबाजी करा पण नायलॉन मांजा नकोच!

मकरसंक्रांत येताच भारतात पतंगबाजीला उधाण येते. आता तर ही पतंगबाजी व्यावसायिक आणि लोकांचे गळे कापणारी झाली आहे. यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल सुरू झाली आहे. एखाद्या विषयातून रोजगार निर्मिती होत असेल तर त्यात काहीही वावगे नाही. मात्र यातून लोकांचे जीवन संकटात येत असेल तर नक्कीच त्यावर मंथन आणि कठोर उपाय करणे अगत्याचे आहे. २५ वर्षांपूर्वी जेव्हा घरीच मांजा घोटून पतंगबाजी व्हायची तेव्हा तेवढा धोका नव्हताच. पण चीननिर्मित नायलॉन मांजा आला अन् पतंगबाजी बदनाम झाली. कारण मकरसंक्रांतीला पतंगांनी आकाश झाकले जाते अन् कटलेल्या पतंगीचा नायलॉन मांजा खाली आल्यावर लोकांचे गळे कापून जातो. ज्या लोकांचा त्याच्याशी काहीही संबंध नाही ते विनाकारण रुग्णालयात चकरा मारतात. काही जण तर गळे कापल्याने यमाघरीही गेले आहेत. मग अशी पतंगबाजीची खरोखरच आपल्या देशाला गरज आहे का? मूठभर लोकांनी मजा मारायची अन् 'ओऽऽ काऽऽट' असे म्हणत रस्त्याने जाणाऱ्या हजारो लोकांना यमाघरी पाठवायचे, हेच त्यांचे ध्येय आहे का? शासनाने तर नायलॉन मांजावर प्रतिबंध घातला आहे. पण आपल्या देशातील लोकांची मानसिकता विचित्र आहे.



ज्यावर प्रतिबंध असतो, त्याच वस्तूचा खप वाढत असतो. अगदी तसाच प्रकार नायलॉन मांजाच्या संदर्भात घडत आहे. शहरात सोडा आता ग्रामीण भागातही नायलॉन मांजा खुलेआम विकला जात आहे. पोलिस नायलॉन मांजा विकणाऱ्यांना पकडतात आणि गुन्हा दाखल करून मोकळे होतात. पण नायलॉन मांजा खरेदी करणारे आणि त्याची निर्मिती करणारे तर मोकाटच फिरतात ना? त्यांचे काय, त्यांनाही आरोपी बनवून कारागृहात टाकण्याची गरज आहे. वस्तुतः नायलॉन मांजा हे देशावरचे फार मोठे संकट आहे. त्याला कुणीही हलक्यात घेण्याचा प्रयत्न करू नये. समजा जी मंडळी नायलॉन मांजा वापरणाऱ्यांची बाजू घेत असतील तर त्यांचे गळे कापा आणि नंतर त्यांना यातना झाल्यावर विचारा, दादा, आता कसे वाटते! जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे या युक्तीचा वापर आपण आता करायलाच हवा. माझ्या मते हिंदू धर्मात जे काही सण आहेत, त्यांना बदनाम करण्याचे आंतरराष्ट्रीय कट कारस्थानच सुरू झाले आहे. पूर्वी धूलिवंदन पवित्र मानले जायचे. आज त्या दिवशी केमिकलयुक्त रंग चेहऱ्याला फासून लोकांना विद्रूप केले जाते. त्यात अनेकांचे डोळे खराब होतात. दिवाळीलाही अशाच स्वरूपात बदनाम केले जात आहे. एकीकडे हिंदू सणांच्या बळावरच पैसे कमवायचे आणि याच लोकांना बदनाम करायचे याही षडयंत्राला संपविण्यासाठी सतर्क होण्याची गरज आहे.

त्रेतायुगातील मकर संक्रांतीच्या दिवशी प्रभू श्रीरामाने लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि हनुमानासह पतंग उडवली होती. तेव्हापासून मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडविण्याची परंपरा भारतात सुरू झाली. पण आज त्याच प्रभू रामचंद्रांच्या देशात भक्त नायलॉन मांजा वापरून काय साध्य करीत आहेत, याची विचारणा त्यांना करायला हवी. तसे पाहता पतंगाचा उपयोग चांगल्या कार्यासाठी सहज करता येते. संदेश पाठवणे, हवामानाचा अभ्यास करणे याकरिता तिचा उपयोग पूर्वी करण्यात आला आहे. मग या पतंगबाजीत नायलॉन मांजा आलाच कुठून? हेही आंतरराष्ट्रीय विशेषतः चीनचे षडयंत्र समजून भारतातील समस्त रामभक्तांनी तरी नायलॉन मांजा विकण्याच्या, खरेदी करण्याच्या भानगडीत पडू नये, असेच मला वाटते. आपली पतंग कटू नये याकरिता आम्ही नायलॉन मांजा वापरतो अशीही बाजू मांडली जाईल. पण राजेहो, पतंग कटण्यासाठीच असते. पतंग कटलीच नाही तर खेळात मजा कशी येईल? विशेष म्हणजे साधा दोरा वापरून जो पतंगबाजी करतो अन् यश संपादन करतो तोच खरा शूरवीर ठरतो. नायलॉन मांजा वापरायचा आणि लोकांची पतंग कापून रस्त्याने जाणाऱ्या दुचाकी चालकांना यमाघरी पाठविणारा शूरवीर कसा? तो तर गुन्हेगार आहे. तेव्हा येणाऱ्या मकरसंक्रांतीच्या दिवशी आपल्याला शूरवीर बनायचे की गुन्हेगार याचा निर्णय पतंगबाजी करणाऱ्यांनी करायलाच हवा. ज्या चीनने समस्त जगावर कोरोनारूपी संकट टाकले, त्याच देशाला नायलॉन मांजाच्या रूपातून फायदा होईल अशी कृती भारतीयांनी सोडायलाच हवी. जी मंडळी आपल्या देशावर, देशातील बांधवांवर प्रेम करतील ते नक्कीच नायलॉन मांजा आयुष्यातून हद्दपार करतील, अशीच अपेक्षा आज आपण करायला हवी, नाही का?

९८८१७१७८५९

## कानोसा


अमोल पुसदकर

# विवेकानंदांचा तरुणांना संदेश

स्वामी विवेकानंद युवकांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. भारताच्या चालीरीती, भारताचे जनजीवन, भारताची श्रद्धा केंद्रे, भारताचे महापुरुष या सर्वांचा अभ्यास करून त्यांच्या मनात आपल्या देशवासीयांबद्दल काही भावना उमटल्या. त्यांच्या वेगवेगळ्या भाषणांमध्ये त्यांनी या भावनांचे प्रकटीकरण केलेले आहे. यातून तरुणांना एक अतिशय उत्तम संदेश मिळतो. तरुणांनी विवेकानंदांचा हा संदेश जर ग्रहण केला तर त्यांच्याही जीवनाला एक चांगली दिशा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

विवेकानंद ज्यावेळेस शिकागोच्या सर्वधर्म परिषदेमध्ये बोलायला उभे राहिले, त्यावेळेला त्यांनी स्वतःबद्दल 'मी कोण आहे' हे सांगताना म्हटले की, लाखो वर्षं जुन्या संन्यासी परंपरेचा प्रतिनिधी म्हणून मी आपल्यासमोर उभा आहे. म्हणजे त्यांनी आपले नाते लाखो वर्षं जुन्या संन्यासी परंपरेशी जोडले आहे. स्वामी विवेकानंदांच्या मनामध्ये भारताविषयी अतिशय पूज्य भाव होता. ते म्हणतात की, पूर्वी सगळ्या हिंदूंप्रमाणे मलाही वाटत होते की, भारत ही पुण्यभूमी आहे. भारत जन्मभूमी आहे. परंतु आज मला असे वाटू लागले आहे की, पृथ्वीच्या पाठीवर जर असा कोणता देश असेल की ज्याला 'पुण्यभूमी' हे गोड नाव देता येईल, जर असे एखादे कोणते ठिकाण असेल की जिथे जगामधील सर्व जीवांना आपल्या कर्मफलाचा उपयोग घेण्यास यावे लागेल, तर ती भूमी म्हणजे ही आपली मायभूमी 'भारत'च होय.

स्वामीजी म्हणायचे की, इंग्लंडचा जन्म कदाचित वेगवेगळ्या पद्धतीच्या भौतिक सुविधा शोधण्यासाठी झाला असेल, अमेरिकेचा जन्म कदाचित वेगवेगळ्या पद्धतीच्या नागरिक सुधारणांसाठी झाला असेल, मात्र भारताचा जन्म हा जगाला आध्यात्मिकतेचे पसायदान देण्यासाठी झालेला आहे. स्वामीजी म्हणतात की, प्रत्येक समाजामध्ये काही चांगल्या व काही वाईट गोष्टी असतात. आमच्याही समाजामध्ये काही दोष आहेत. एखादा लहान मुलगा व्यासपीठावर उभा राहून आमच्या समाजातील दोषांचा पाढा वाचू शकेल. परंतु मानव जातीचा मित्र तोच आहे की, जो हे करण्याचा दूर करण्याचा मार्ग दाखवतो. मागील १०० वर्षांत समाज सुधारणेच्या नावाखाली जे साहित्य निर्माण झालेले आहे, त्यामध्ये इतके शिव्याशाप भरलेले आहेत, सनातनी लोकांवर इतके प्रहार त्यांनी केलेले आहेत की, संपूर्ण देशाने हे साहित्य पाहून शरमेने मान खाली घालावी. ही काय सुधारणा झाली? यामुळे राष्ट्राला वैभव प्राप्त होईल का? स्वामीजी म्हणतात की, भारताला कधीतरी सुधारकांची उणीव पडली आहे काय? आपण भारताचा इतिहास पाहिला आहे का? रामानुजाचार्य कोण होते? शंकराचार्य कोण होते? गुरुनानक कोण होते? चैतन्य महाप्रभू कोण होते? कबीर व दादू हे कोण होते? रामानुजाचार्यांना दलित वर्गाबद्दल कळवळा नव्हता का? आमच्या देशातील महापुरुषांनी समाजसुधारण्याचे कार्य केलेले आहे. परंतु आजच्या सुधारकांप्रमाणे त्यांच्या तोंडी शिव्याशाप नव्हते. त्यांच्या तोंडी होते ते केवळ आशीर्वाद. शिव्याशाप व निंदा यांच्यामुळे काहीही चांगले निष्पन्न होणार नाही. शेकडो वर्षांपासून अशा उपायांचा अवलंब करण्यात आलेला आहे. पण त्यापासून कोणताही चांगला परिणाम घडून आलेला नाही. प्रेम व सहानुभूती यांच्याद्वारे चांगले परिणाम घडवून आणता येईल. पुढे ते म्हणतात की, आपल्या ज्या राष्ट्ररूपी जहाजाने कित्येक शतके हिंदू जातीला परतीराला पोहोचविले आहे; आज कदाचित या जहाजाला काही छिद्रे पडली असतील, कदाचित ते नादुरुस्त झाले असेल आणि जर असे असेल तर ही छिद्रे बुजविणे हे तुमचे, माझे, सर्वांचेच कर्तव्य आहे. चला, आपल्या देश बांधवांना आपण या धोक्याची जाणीव करून देऊ.



आपल्या शास्त्रातील सत्यांचा भारतात व भारताबाहेर प्रसार करण्याकरिता तरुण प्रचारकांना शिक्षण देणाऱ्या संस्था आपल्या देशात सुरू करण्याची माझी योजना आहे. माणसे हवी आहेत. माणसे हवी आहेत. सशक्त, उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशी तरुण माणसे हवी आहेत. असे शंभर तरुण मिळाले तरी सर्व जगात क्रांती घडविता येईल.

देशभक्तीविषयी स्वामीजी म्हणतात की, देशभक्तीवर माझाही विश्वास आहे. देवतांचे व ऋषींचे लाखो वंशज आज पशुतुल्य बनले आहेत, हे बघून तुमच्या हृदयाला पीळ पडतो का? कोट्यवधी लोक आज भुकेने तडफडत आहेत, हे पाहून तुमच्या हृदयाला चरे पडतात का? आपला देश अज्ञानाच्या काळ्याकुट्ट मेघांनी झाकाळून गेला आहे हे बघून तुमचे हृदय पिळवटून निघते काय? तुम्ही अस्वस्थ झाला आहात काय? तुमची झोप उडाली आहे काय? ही जर तुमची अवस्था असेल तर देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे. समजा, देशाविषयी तुमच्या हृदयात तळमळ आहे, पण केवळ व्यर्थ बोलण्यात शक्ती खर्च न करता आपल्या देशबांधवांची दुर्दशा थांबविण्याकरिता तुम्ही काही प्रत्यक्ष मार्ग शोधून काढला आहे काय? देशभक्त होण्याची ही दुसरी पायरी आहे. पर्वत प्राय विघ्नांना तोंड देता येईल असा दृढ निश्चय तुमच्या ठायी आहे का? सर्व जग हाती तलवार घेऊन तुमच्या विरोधात उभे झाले तरी तुम्हाला जे सत्य वाटते ते करण्याचे धैर्य तुमच्यात आहे का? आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करीत धीराने तुम्ही वाटचाल करू शकता का? अशी चिकाटी जर तुमच्याजवळ असेल तर देशभक्त होण्याची ही तिसरी पायरी आहे.

स्वामीजी म्हणतात, आता आपल्या सगळ्यांनाच कठोर परिश्रम करावे लागतील. खूप खूप झटावे लागेल. आता झोपायला वेळ नाही. आपल्या कार्यावरच भारताचा भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली ही भारत माता हळूहळू नेत्र उघडीत आहे. ती काही काळ निद्रिस्त झाली होती इतकेच. उठा, तिला जागे करा आणि या नवजागृतीच्या संजीवनीने तिला पूर्वीपेक्षाही अधिक गौरवान्वित करून भक्तिभावाने तिची तिच्या चिरंतन सिंहासनावर स्थापना करा.

स्वामीजींचे हे अनमोल विचार आजही तरुणांना देशभक्तीचा संदेश देणारे आहेत. स्वामीजींनी सांगितलेल्या मार्गावर जर तरुणांनी चालायचे ठरविले तर भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ जवळच उभा राहील, यात काही संशय नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### श्रीराम जन्मभूमी आणि समर्थ रामदास स्वामी

टाकळी येथे १२ वर्षांच्या कठोर तपश्चर्येनंतर समर्थ तीर्थयात्रेस निघाले. या यात्रेदरम्यान चित्रकूट येथे प्रत्यक्ष हनुमंतांनी मानव रूपात समर्थांना दर्शन दिलं. या भेटीत हनुमंतांनी समर्थांना स्वसंरक्षणार्थ एक कुबडी दिली. यामध्ये दुधारी शस्त्र होते. या यात्रेदरम्यान काही संकट आल्यास हे शस्त्र स्वतःचा जीव वाचवण्यासाठी समर्थांच्या कामी येणार होते. ती व्यक्ती दुसरी-तिसरी कुणीही नसून प्रत्यक्ष हनुमंत होते, हे नंतर समर्थांनी ओळखले. यात्रेचा एकेक टप्पा पार पाडत समर्थ रामजन्मभूमीच्या वेशीवर येऊन पोचले. रामनामाच्या संकीर्तनात न्हाऊन गेलेली ही पुण्यभूमी. जिकडे तिकडे रामनामाचा गजर सुरू होता. सगळीकडे प्रसन्न वातावरण होते. अचानक धावपळ सुरू झाली. आरडाओरड वाढली. मुगलांची जिहादी फौज समोर येईल त्याला भोसकू लागली. असाच एक जिहादी समर्थांवर तुटून पडला. क्षणाचाही विलंब न करता समर्थांनी कुबडीतील शस्त्र त्याच्यावर उगारले व त्याला संपवले. नंतर समर्थ थेट मथुरेस गेले. तेथील परिस्थितीही काही वेगळी नव्हती. ही परिस्थिती बदलली पाहिजे हा विचार समर्थांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यामुळे येथे कुणी समविचारी भेटतो का याचा शोध घेताना समर्थांना हरिकृष्ण सापडला. त्याला सोबत घेऊन समर्थांनी मथुरेला मठाची स्थापना केली. मथुरेप्रमाणे अयोध्येतही आपल्या संप्रदायाचा मठ स्थापन झाल्यास रामजन्मभूमीच्या संरक्षणासाठी तरुणांची एक संघटना उभी करता येईल, असे समर्थ हरिकृष्णाजवळ बोलले. त्यावर अयोध्येचा रामकृष्ण या कामी आपली मदत करेल, असे हरिकृष्णांनी समर्थांना सांगितले. तीर्थयात्रेवरून परत येताना आपण त्याची भेट घेऊ, असे मथुरेतील मुक्कामात समर्थांनी सांगितले आणि परतीच्या प्रवासात हरिकृष्णासह समर्थ अयोध्येस आले. ठरल्याप्रमाणे रामकृष्णाची भेट झाली आणि अयोध्येतील कार्य सुरू झाले. आंदोलनाचे विविध टप्पे आणि न्यायव्यवस्थेच्या ऐतिहासिक निकालानंतर रामजन्मभूमीच्या ठिकाणी भव्य मंदिर तयार होऊन ऐतिहासिक प्राणप्रतिष्ठा सोहळा संपूर्ण जगाने अनुभवला. त्याच ऐतिहासिक सोहळ्याची वर्षपूर्ती साजरी करताना पुन्हा एकदा संपूर्ण देश राममय झालाय.

**अखिल देशपांडे**/अकोला

## वाचक पत्रे

### ग्रामीण भागात इंटरनेट नेटवर्कची समस्या

ग्रामीण भागातील बीएसएनएलसह खाजगी इंटरनेट नेटवर्क सेवा देणाऱ्या कंपनीचे जाळे पोहोचले असले, तरी नेटवर्क समस्या कायम आहेत. नेटवर्क इंटरनेट सुविधांमध्ये गतिशील वाढ होण्याचे कंपनीद्वारे केलेले दावे फोल ठरत आहेत. गतिशील सुविधा सोशल माध्यमाद्वारे दाखविण्यात येते आहे, परंतु आजही ४-जी पासून ५-जी पर्यंतच्या नेटवर्क दर्जात सुधारणा झालेली नाही. मोठमोठ्या शहरात नेटवर्क इंटरनेट रेंज वाढली, परंतु ग्रामीण भागात ४-जी इंटरनेट नेटवर्क सेवेचा अभावच आहे. त्यामुळे इंटरनेट नेटवर्क चालवणारा ग्राहक वर्ग मोठा असून त्यामध्ये नेटवर्कअभावी नागरिकांना विद्यार्थ्यांना, व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंटरनेट नेटवर्क सेवा ठप्प झाल्यासारखे आहे. ५-जी जलद सेवा देणाऱ्या कंपन्या ग्रामीण भागात जलद सेवा देत नसल्याने इंटरनेट नेटवर्क सेवा ठप्प होत असल्याने ग्राहकांना याचा आर्थिक फटका बसतो आहे. नेटवर्क इंटरनेट सुविधेचे वाढते दर यामुळे ग्राहकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड भरावा लागत आहे. बीएसएनएलसह खाजगी इंटरनेट नेटवर्क सुविधेचे जाळे पसरले, परंतु जलद सुविधांकडे नेटवर्क इंटरनेट कंपनीचे दुर्लक्ष करतात. कंपनीद्वारे शुल्क वाढविण्यात आले, परंतु नेटवर्क इंटरनेट सुविधांमध्ये मात्र गती देण्यात आली नाही. ग्राहकांना त्रास होणार नाही याची काळजी नेटवर्क इंटरनेट कंपनीने घेतली पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### दुर्लक्षित माहूर रेणुका देवी गड

मी दोन दिवसांपूर्वी माहूरला गेलो होतो. लहानपणापासून मी दरवर्षी जात असतो. माझ्यासारखे बरेच भाविक मुंबई, पुणे व मध्यप्रदेशमधून दर्शनाला येतात. येथे घोषित केलेले स्काय



वॉकचे काम अगदी प्राथमिक टप्प्यातच आहे. दोन वर्षांपासून काम सुरू आहे. वयस्क व दिव्यांग भाविकांना अजूनही पालखीत बसून जावे लागते. अर्धवट कामामुळे इतर भाविकांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. काम रेंगाळायचे कारण एक तर पैशाची कमतरता, ते शक्य वाटत नाही किंवा अशा कामाकरिता जे कुशल मनुष्यबळ लागते त्याचा अभाव असावा. पण एक गोष्ट पक्की आहे की माहूर गड पहिलेपासून दुर्लक्षित आहे तो आजपावतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना या कामाला प्राधान्य दिले जावे. काही दिवसांपूर्वी मी वणीच्या सप्तशृंगी गडावर जाऊन आलो. तेथे सुद्धा स्काय वॉकची सोय आहे. माहूर गडाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, ही अपेक्षा.

**राजेंद्र वाडी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# महिन्याच्या दोन शनिवारी चालणार स्वच्छता मोहीम

## सात सूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकारी यांना १०० दिवस उद्दिष्टपूर्ती बाबत सात सूत्री कार्यक्रम देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शासकीय कार्यालय व परिसर हा आपल्या घराप्रमाणे स्वच्छ ठेवण्याचा संकल्प सोलापूर प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केला असून, महिन्याच्या दोन शनिवारी ही स्वच्छतेची मोहीम चालणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन आपले कार्यालय व आपला कार्यालय परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार शनिवार, दि. ११ जानेवारी रोजी जवळपास २० अधिकारी व ९० कर्मचारी यांनी एकत्रित येऊन



सांघिकपणे इमारत परिसराची स्वच्छता मोहीम सुरू केली. सकाळी आठ ते दहा या कालावधीत सर्वांनी एकत्रितपणे झाडू हाती घेऊन स्वच्छता मोहीम सुरू केली व दोन तासातच जवळपास चार टन कचरा गोळा केला. गोळा झालेला कचरा महापालिकेच्या गाडीतून नेण्यात आला. तर २५ जानेवारी रोजी होणाऱ्या स्वच्छता मोहिमेत सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्यासह त्यांचा संपूर्ण स्टाफ १०० टक्के उपस्थित राहील यासाठी दक्ष रहावे, असे

### पहिल्या शनिवारी होती 'या' अधिकाऱ्यांची उपस्थिती

या स्वच्छता मोहिमेमध्ये अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाचे प्रबंधक प्रशांत तावडे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहसंचालक नलिनी टेंभेकर, नगर भूमापन संचालक गजानन पोळ, भूजलचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉक्टर मुस्ताक शेख, अन्न औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त एस. डी. जितूरकर, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी एस. बी. देशमुख, भूसंपादन क्रमांक ११ चे सहाय्यक महसूल अधिकारी बी.व्ही.वाघ, नेहरू युवा केंद्राचे सुभाष चव्हाण, मत्स्य व्यवसाय विभागाचे मत्स्य विकास अधिकारी राजम, राजेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोलापूर ग्रामीण पोलीस निरीक्षक जी. ए. बिराजदार, आदी व अन्य अधिकारी कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

### या इमारतींमध्ये स्वच्छता मोहीम

या प्रशासकीय इमारतीमध्ये व परिसरात उच्च व तंत्र शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर ग्रामीण उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगर भूमापन विभाग, अन्न औषध प्रशासन, नागरी समूह, अन्नधान्य वितरण अधिकारी, कृषी विभाग, मत्स्य व्यवसाय, वरिष्ठ भूवैज्ञानिक, जिल्हा उपनिबंधक प्रकल्प संचालक नेहरू युवा केंद्र, जिल्हा तक्रार निवारण मंच हे विभाग कार्यरत आहेत. या सर्व कार्यालय अंतर्गत जवळपास २५ अधिकारी व १६० कर्मचारी कामकाज करत आहे.

### कार्यालयीन वेळेत विशेष स्वच्छता मोहीम

या प्रशासकीय इमारत परिसरात जवळपास २५ अधिकारी व १६० कर्मचारी कार्यरत आहेत परंतु त्यातील काही अधिकारी व कर्मचारी हे बाहेर जाऊन येजा करतात त्यामुळे शनिवार रविवार त्यांना स्वच्छता मोहिमेत सहभाग घेणे शक्य झालेले नाही. तरी अशा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मागणी नुसार त्यांच्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवसात विशेष स्वच्छता मोहीम राबवली जाणार असून, त्याबाबतचा संदेश सर्वांना देण्यात येईल, अशी माहिती या स्वच्छता मोहिमेचे मुख्य समन्वयक उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त



### खा. प्रणिती शिंदे यांनी घेतले मानाच्या नंदीध्वजांचे दर्शन

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेस आज सकाळी तैलाभिषेकाने सुरुवात हिरेहब्बू वाडा येथून झाली. यावेळी 'एकदा भक्तलिंग हर बोला हर्र... श्री सिद्धरामेश्वर महाराज की जय...'च्या जयघोषात हिरेहब्बू वाडा दणाणला. सिद्धेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगाना आज तैलाभिषेक करण्यात येणार असून, या यात्रेनिमित्त खा. प्रणिती शिंदे यांनी उपस्थिती दर्शविली आणि नंदीध्वजाची पूजा करून दर्शन घेतली. यावेळी मानकरी हिरेहब्बू बंधुसह इतर मानकरी, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, केदार उंबरजे, मनोज यलगुलवार, सिद्धाराम चाकोते, रेवनसिद्ध आवजे, राहुल वर्धा, जितु वाडेकर यांच्यासह भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुरेखा पांढरे यांना जिजाऊ गौरव पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड च्या वतीने सुरेखा पांढरे यांना राष्ट्रमाता जिजाऊ जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. राष्ट्रमाता जिजाऊ यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविले व रयतेचे स्वराज्य निर्माण केले त्यांच्या कर्तृत्वाचा प्रेरणा घेऊन सुरेखा पांढरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती वर मात करून आपल्या मुलाला सनी पांढरे यांना चांगले संस्कार करून उच्च शिक्षण देऊन केन्द्र शासनाच्या भाभा आणूभट्टी संशोधन प्रकल्पात २१ व्या वर्षी अभियंता केले. त्यामुळे संभाजी ब्रिगेड च्या वतीने या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. यावेळी. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, संभाजी राजे भोसले, शत्रुघन माने, मोनाली धुमाळ, महेश भंडारे, रमेश चव्हाण, सचिन वनमाने, पिंटू कोरे, शेखर चौगुले, राजनंदिनी धुमाळ, शेखर कंटेकर इत्यादी उपस्थित होते.



### सनराईज स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सनराईज इंग्लिश मिडीयम स्कूल,चे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि. ११ जानेवारी रोजी उत्साहात पर पडले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, सपोनि सुरज देवकर यांची उपस्थिती होती. तर यावेळी विचारमंचावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपाचे तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, आनंद बोबडे, पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्ता शिंदे, ऑस्टिन, पत्रकार संतोष मगर, शाळेचे सचिव ज्ञानेश्वर बोबडे, रूपाली बोबडे आदी मान्यवर व शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व सर्व विद्यार्थी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजनाने व स्वागत गीताने करण्यात आली. याच समारंभात जिल्हा व राज्यस्तरीय किक बॉक्सिंग, वेट लिफ्टींग तसेच वार्षिक क्रीडा सप्ताह व शाळेत झालेल्या विविध सण व उत्सव यादिवशी आयोजित केलेल्या स्पर्धा मधील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सर्टीफिकेट देऊन अभिनंदन करण्यात आले. स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शन व कला सादर करण्यात आल्या. यामध्ये डोळ्यांचे पारणे फेडणारे नृत्याविष्कार, प्रेक्षकांचे आकर्षण ठरलेले छत्रपती संभाजी महाराज चरित्र, शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराज, नंदीकोल व गड्डा यात्रा, राजमाता जिजाऊ चरित्र इ. तसेच आपल्या शाळेचे क्रीडा शिक्षक दिनकर रोकडे व सहकारी विद्यार्थी यांनी चित्तथरारक कराटे प्रकारांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन भरले व ढेकळे यांनी केले.

## बहुजन शिक्षक महासंघातर्फे सावित्री-जिजाऊ जयंतीनिमित्त महिलांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्या वतीने महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर महानगरपालिका हिरवळीवर क्रांतीज्योती सावित्रीबाई फु ले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त संघटनेतील म हिलांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये प्रारंभी डॉ. श्रुतिका उडानशिव यांची वैद्यकीय सेवेत डॉक्टरपदी रुजू झाल्यानिमित्त तसेच स्वप्नजा कसबे, निर्मला मौळे, पृथ्वी शिंदे, फरीदा बेलीफ, महानंदा शिंदे आदी महिलांचा सत्कार करण्यात आला. यानंतर जिल्हाध्यक्ष प्रा. युवराज भोसले व मराठवाडा विभाग प्रमुख प्राचार्य किशोर बनसोडे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार मि ळाल्याबद्दल आणि राज्य संघटक अशोक पाचकुडवे यांची मोहोळ तालुका पत्रकार संघटनेच्या सचिवपदी निवड झाल्यानिमित्त टाळ्या वाजवून अभिनंदन करण्यात आले. प्रास्ताविक राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड यांनी केले.

सूत्रसंचालन रवी देवकर यांनी केले तर उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष मुख्याध्यापक नितीन गायकवाड यांनी मानले. यावेळी दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष दत्तात्रय शिंदे, आगतराव बनसोडे, रामन्ना गायकवाड, इन्नुस बाळगी, अरुण गणपा, यशपाल आकाडे, नागेश सातपुते, प्रा. अभिजित भंडारे, महिबूब तांबोळी, शुभम इंगळे, एकोराम चौगुले, नागनाथ गायकवाड, सिद्धेश्वर धुरले आदी उपस्थित होते.





## स्वामी विवेकानंदांचे जीवनचरित्र युवकांसाठी प्रेरणादायी

### अंबादास यादव यांचे प्रतिपादन

### राष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा संवाद आणि रक्तदान शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

स्वामी विवेकानंदांनी तरुणांच्या हृदयाला जवळून स्पर्श केला होता. त्यांनी आपल्या देशवासीयांचे जीवन समृद्ध करणे हे आपल्या जीवनाचे ध्येय बनवले होते. त्यांनी एक सखोल विचारवंत, आध्यात्मिक गुरू आणि संत म्हणूनही ओळख आहे. विवेकानंद यांचे अनमोल विचार आजही तरुणांसाठी प्रेरणास्रोत आहेत, असे प्रतिपादन सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव यांनी केले.

माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, सोलापूर व विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी यादव बोलत होते. यावेळी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय युवा दिन दरवर्षी १२ जानेवारी स्वामी विवेकानंदांच्या जयंती दिनी साजरा केला जातो. हा दिवस तरुणांची क्षमता आणि त्यांची ऊर्जा देशाच्या प्रगतीत योगदान म्हणून साजरा करतो. यावेळी व्यासपीठावर नगर प्रमुख रवी कंटली, उद्योजक पेंटप्पा गड्डम, विभागीय प्रांत प्रमुख विकास कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून रेल्वे लाईन्स शाखेच्या वतीने सकाळी ६.३० ते ७.३० यावेळेत श्री हनुमान मंदिर पटांगण, माधवनगर येथे मदगोंडा पुजारी, श्रुतिक दासरी यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांसाठी सामूहिक सूर्यनमस्काराचा अभ्यास घेण्यात आला. सकाळी १० ते ३ वाजे पर्यंत युवकांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५ युवा-युवतींनी रक्तदान केले. काल वैद्यकीय आयुष अधिकारी डॉ विलास सरवदे यांच्या हस्ते स्वामीजींच्या योग व अन्य विषयवारील पुस्तकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले होते. सदर प्रदर्शन दिनांक १२ ते १६ जानेवारी पर्यंत दररोज संध्याकाळी ५ ते ९ वाजे पर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात केंद्राच्या सहना ववतू प्रार्थनेने करण्यात आली. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रमात दिलेल्या व्याख्यानावर आधारित प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली. प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांची नावे - संस्कार भस्मे, राहुल दिंडोरे, ऐश्वर्या राजमाने, गजानन परळकर आणि शंकर पेद्दी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती कदम यांनी केले. विकास कुलकर्णी यांनी आभार मानले.

## स्वामी विवेकानंदांच्या विचारांची गरज : मुगळे

### दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनकडून युवक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १२ जानेवारी-**

भारतीय संस्कृतीची जगाला ओळख करून देणारे स्वामी विवेकानंद हे तरुणांसाठी दिशादर्शक आहेत. तरुणांनी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांचे विचार आत्मसात केल्यास जीवनात यश निश्चित मि ळते. स्वतावर विश्वास ठेऊन कार्य केल्यास समाजासाठी प्रेरणादायी ठरते. आजच्या हिंसाचाराच्या युगात स्वामी विवेकानंद यांच्या



विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे यांनी केले.

मळसिध्द मंदिर येथे दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनकडून आयोजित स्वामी विवेकानंद व जिजाऊ यांच्या जयंती कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मंदिराचे पुजारी ओगसिध्द पुजारी, माजी सभापती अप्पाराव कोरे, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, चंद्रकांत ख्वाडे, भाजपाचे युवा मोर्चा माजी तालुकाध्यक्ष गौरीशंकर मेंडगुदले, तंटामुक्ती अध्यक्ष रेवणसिध्द मेंडगुदले, मळसिध्द पुजारी, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, चंद्रकांत देशमुख, मिथुन मुगळे, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमटे, इंजिनिअर गुरुनाथ जोडमोटे, शिवराज कालदे, मळसिध्द म्हेत्रे, निलेश हेळकर, प्रविण कुंभार, भीमाशंकर लच्याणे, बाबूशा हेळकर, अप्पासाहेब शिळ्ळे, नागनाथ कुंभार, अमोगसिध्द तड्डे यांच्यासह पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. यावेळी अप्पाराव कोरे म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांच्या नावामधूनच युवकांना प्रेरणा मिळते. युवकांनो उठा, जागे व्हा आणि ध्येयसिध्दी होईपर्यंत थांबू नका या विचाराने युवकांनी प्रयत्न केल्यास जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग सुकर होतो असे कोरे म्हणाले. प्रास्ताविक दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष अमोगसिध्द मुंजे यांनी केले. तर सुरेश टेळे यांनी आभार मानले.

## ऐतिहासिक इमारत परिसर केला चकाचक


### मच्छिंद्रमामा साखरे फाउंडेशनतर्फे स्वच्छता उपक्रम

### महिला, युवकांसह अनेकांनी केले श्रमदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पारतंत्र्यात तिरंगा ध्वज फडकवलेल्या ऐतिहासिक अशा नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या इमारत परिसरात मच्छिंद्रमामा साखरे सोशल फाउंडेशनच्या वतीने हुतात्मा दिनी स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या संकल्पनेतून शहरात नुकतीच ११७ मुख्य रस्त्यांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे प्रेरणा घेऊन फाउंडेशनने राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती आणि हुतात्मा दिनानिमित्त ही मोहीम घेतली. महापालिका घनकचरा, स्वच्छता विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी



### लोकसहभागातून होणारी स्वच्छता महत्त्वाची

फाउंडेशनने हेरिटेज इमारत परिसराची स्वच्छता करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. प्रत्येक नागरिकांनी स्वच्छता करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या फाउंडेशनने दिला आहे. नागरिकांनी कचरा इतरत्र न टाकता घंटागाडीत टाकावा, असे आवाहन महापालिकेचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी केले.

शुभारंभ केला. यावेळी कामगार नेते चांगदेव सोनवणे, आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शशिकांत शिरसट, फाउंडेशनचे संस्थापक भालचंद्र साखरे, शांताबाई साखरे, डॉ. हिराकांत जाधव, प्रा. नवनाथ कुचेकर, नैना पलंगे, करबा माने, श्रावण भंडारे, चंद्रकांत बनसोडे, संगीता ओव्हाळ, शशिकला डावरे, राजश्री साखरे, संयोगिता ओव्हाळ, सतीश वाघमारे, दत्ता ओव्हाळ, संजय गायकवाड, मनोज गोडवे, रतन साळवे, आशिष लोखंडे, आनंद निकाळजे, संस्कार पलंगे, बुद्धभूषण कांबळे, मोहन जाधव, विश्वरत्न कांबळे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### नरसप्पा गडगी



**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

माधवनगर येथील रहिवासी नरसप्पा तायप्पा गडगी (वय ७५) रविवार, दि. १२ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. १२ रोजी दुपारी शांती चौक येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली व नातवंडे असा परिवार आहे. कारखानदार व श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे विश्वस्त जनार्दन गडगी यांचे ते वडील होत.

### नारायण काशीद



**वैराग, दि. १२ जानेवारी-**

पिंपरी सा. (ता. बार्शी) येथील रहिवाशी नारायण गणपती काशीद (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते तंटामुक्तीचे अध्यक्ष प्रदीप काशीद यांचे वडील होत.

### नारायण कुलकर्णी



**पंढरपूर, दि. १२ जानेवारी-**

निवृत्त कृषी अधिकारी नारायण महादेव कुलकर्णी जवळेकर (वय ९३) यांचे शासकीय वसाहत येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, सुन, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. द. ह. कवठेकर प्रशालेचे निवृत्त तंत्रशिक्षक संजय कुलकर्णी यांचे ते वडील होत.


## श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SHRIRAM HOUSING FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र.११, दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाले प्लाझा, डफरिनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१
**वेबसाइट:** www.shriramhousing.in

### भौतिक ताबा सूचना

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एसएचएफएल) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदार/ सह-कर्जदार/ तारणकर्ता यांनी या रक्कमेची परतफेड न केल्याने याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार/ तारणकर्ता यांना व तमाम सूचना देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीदाराने एसएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफेसी कायदा ) चे कलम १३ (४) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ चा नियम ८ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील तक्त्यातील इतर सर्व तपशिलांसह विशिष्टपणे नमूद केलेल्या तारखांना भौतिक ताबा घेतला आहे

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्री. लिसनुल हक अब्दुल सत्तार बेलीफ (कर्जदार),**
**२. श्री. उमरा लिसानुल हक बेलिफ (सह-कर्जदार),**
**सर्वांचा निवासाचा पत्ता : प्लॉट क्रमांक१४, पहिला मजला, बिलाल नगर, एस. बी. हाईटच्या मागे, कल्याण नगर, मीरा फ्लोअर मिल जवळ, सोलापूर, उत्तर, जिल्हा सोलापूर –४१३००३ आणि येथे देखील: फ्लॅट क्र ७०२,७वा मजला, अलाव्वाल उंची, प्लॉट क्र १०८, माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉल जवळ, होतीगी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०७/०३/२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000410 अंतर्गत रु. २९,७०,३७१/-(रुपये एकोणतीस लाख सत्तर हजार तीनशे एकहत्तर फक्त) सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत कराराच्या दराने पुढील व्याजासह.
मागणी सूचना दिनांक: ११.०३.२०२४
भौतिक ताबा तारीख: ८ जानेवारी २०२५

**मालमत्तेचे वर्णन**

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्रमांक ७०२, मनमोहक क्षेत्रफळ ५२.९२ चौ. मीटर (बांधलेले),७ व्या मजल्यावर,"अलावल हाइट्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत,प्लॉट क्रमांक १०८,नवीन सर्वे क्रमांक ११/१बी/२ए/२बी पैकी (जुना सर्वे क्रमांक २८१/१बी/२ए/२बी) च्या जमिनीवर बांधलेले,माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉलजवळ, होतागी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४, येथे स्थित आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध. उत्तर:प्लॉट क्रमांक१०७,दक्षिण: प्लॉट क्रमांक १०९,पूर्व: फ्लॅट क्रमांक७०१,पश्चिम: रस्त्याने आणि समोरील मार्जिनने

विशेषकरून कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांना आणि तमाम जनतेला सावध करण्यात येत आहे कि , त्यांनी या मालमत्तेबाबत व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार उपर्दिरिष्ट रक्कम तसेच पूर्ण व अंतिम रक्कम प्रदान होईपर्यंत संविदात्मक दराने पुढील व्याज यासाठी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या अधिभाराच्या अधीन असेल. सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी , उपलब्ध वेळेच्या संबंधात कर्जदार/जामीनदार /तारणकर्ता यांना कायद्याचे कलम १३ च्या उपकलम (८) कडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे .

**ठिकाण :** सोलापूर
**दिनांक :** ०८-०१-२०२५

**स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी**
**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

## क्षणचित्रे.....



सोलापूर : श्री सिध्देश्वर यात्रेतील नंदीध्वज मिरवणुकीत शासकीय मान देशमुख परिवारातर्फे हिरेहब्बू यांना देण्यात आला.



सोलापूर : हिंदूहदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मरणार्थ शहर शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख महेश धाराशिवकर व प्रताप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ६८ लिंग पदयात्रा करणाऱ्या सिद्धरामेश्वर भक्तांना दूध वाटप करण्यात आले. यावेळी उपशहर प्रमुख शिवा ढोकळे, बंटी बेळमकर, सुरेश जगताप, संताजी भोळे, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



सोलापूर : ६८ लिंग पदयात्रेत सहभागी झालेले पीएमसीसी क्रिकेट क्लबचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर माळगे, धर्मराज नाशी, कौस्तुभ स्वामी, श्रीकांत पाटील, महांतेश झेंडेकर आदी.



नंदीध्वज मिरवणुकीत सहभागी झालेले भाजपाचे आ. विजयकुमार देशमुख.



## स्वहस्ते ६८ लिंगाचे चित्र रेखाटून लिंगांना केले अर्पण; पहिलीतली सान्वी शिरशीकर हिची अनोखी सिद्ध सेवा

सोलापूर : संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये पहिलीमध्ये शिकणारी सानवी प्रतिक शिरसीकर हिने श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेनिमित्त ६८ लिंगांची ६८ चित्रे रेखाटून ठेवली होती. रविवारी तैलाभिषेक सोहळ्यात सान्वी सहभागी झाली. प्रत्येक लिंगावर बिल्वपत्र आणि त्या लिंगाचे चित्र अर्पण करून तिने सिद्धरामांच्या चरणी अनोखी सेवा रुजू केली. तिच्या या सेवेप्रसंगी तैलाभिषेक सोहळ्यात उपस्थित भाविकांनी तिचे कौतुक केले.

# ‘सोन्नलगी’ भू कैलास बनविणारे अधिपती : शिवयोगी सिद्धरामेश्वर

सृष्टी नियंत्याची एक निश्चित स्वरुपाची योजना असते. कोणाच्या रुपाने कोणते काम करुन घ्यावे, पृथ्वीला स्वर्गाचे अधिष्ठान बनवावे याचा आराखडा तयार असतो. त्या संदर्भातील सूचकता वेगवेगळ्या माध्यमातून विश्वाधिपती भक्तांच्यापर्यंत पोचवित असतो. याची प्रचिती जगातील अनेक घडामोडीतून व्यक्त होत असते.

बाराव्या शतकाच्या पूवार्धात अशीच घटना सोन्नलगीत घडली. जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर धर्म प्रचारासाठी सोन्नलगी मार्गे जात असतांना सोन्नलगी म्हणजे आजचे सोलापूरच्या सरहद्दीवर आल्यावर पालखीतून उतरुन जमिनीवर नतमस्तक होऊन या भूमीला वंदन करु लागले.

या प्रसंगाने भक्तगणांनी पूज्य जगद्गुरुंना विचारणा केल्यावर ते म्हणाले, या भूमीत साक्षात ‘शिव’ अवतार धारण करणार असून या भागाचे कल्याण होणार आहे. हे ऐकूण सर्व भक्तगणांनी भूमीला वंदन करुन सोलापूरच्या हद्दीत प्रवेश केला. सोलापुरातील एक प्रतिष्ठित घराणे असलेल्या मुद्दगौडा व सुग्गलदेवी यांच्या घरी आले. उभयतांनी जगद्गुरुंचे स्वागत केले. याप्रसंगी जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर म्हणाले, तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. ती म्हणजे तुमच्यासाठी साक्षात शिव अवतार घेणार आहे, हे ऐकून सुग्गलदेवी जगद्गुरुंना म्हणाल्या, आज माझे वय ६० वर्षाचे आहे. आई होण्यासाठी आता माझे शरीर कशी साथ देणार, माझे वय झाले आहे. पूज्य रेवणसिद्धेश्वर जगद्गुरु म्हणाले की, भगवतांच्या मनात आले तर सर्व काही शक्य आहे. ईश्वरी संकेत असल्याने तुमचे भाग्य आहे. तुमच्या पोटी शिवअवतार आहे. मुद्दगौडा व सुग्गलदेवी या दोघांनी ही गोष्ट हसण्यावारी नेले. आदरातिथ्य स्वीकारुन पूज्य जगदगुरू रेवणसिद्धेश्वर मार्गस्थ झाले.



काही दिवसांनी जगद्गुरुंच्या भविष्य वाणीची प्रचिती येण्यास सुरुवात झाली. मला सुग्गलदेवीना डोहाळेची अनुभूती येऊ लागली. संपूर्ण कुटुंबात आनंदाची लहर उमटली. आता काय होणार अशी काळजी वाटत असतांना प्रसिद्ध कवी रांघवांक यांनी वर्णन केल्याप्रमाणे स्वर्गीय देवतांच्या उपस्थितीत माता सुग्गलदेवी माता बनल्या. एक तेजस्वी बाळ कुशीत अवतरले हा आनंद सोहळा स्वर्गीय देवतांच्या बरोबर गावकऱ्यांनी अनुभवला.

या बाळाचे नामकरण कुलदैवत घुळीमहांकाळेश्वर, सिद्धरामा असे करण्यात आले. इतर बालकाप्रमाणे या बाळाला कशाची ही गरज भासली नाही. डोळ्यांची उघडझाप नाही. अन्न सेवन नाही. मलमूत्र विसर्जन नाही. असे बालक जन्मले म्हणून आई काळजी करताना जगद्गुरु, रेवणसिद्धेश्वरांच्या भविष्यवाणीची कल्पना आली. साक्षात शिव अवतार होणार आहे.

त्याला भूक नाही, तहान नाही, झोप नाही. तोच निर्मिक, त्याला कशाची गरज नाही. हे बाळ कुणाशीही संभाषण करीत नाही. यामुळे मुद्दगौडा व सुग्गलदेवी व कुटुंबातील सदस्य काळजी करत असाताना हे बालक मात्र दिवसेंदिवस वाढू लागले. त्याच्या चेहऱ्यावरील तेज सात्विक भाव बघून लोक आपोआपच त्या बालकापुढे नतमस्तक होऊ लागले.

या बालकाला कोणत्या तरी कामात गुंतवावे म्हणून घरातील गाई शेतावर नेऊन आणण्याची जबाबदारी या बालकावर म्हणजे सिद्धरामेश्वर सोपविण्यात आली.

घरातील गाई चरण्यासाठी शेतात सोडून सिद्धरामेश्वर शेतातील मातीचे शिवलिंग करुन ध्यान करु लागले. संध्याकाळ झाली की पुन्हा गाई घरी आणण्याचे कार्य नित्यकर्म म्हणून सुरु झाले.

भगवान शिवाला वाटले की आता अवतार कार्याची प्रचिती भक्तांना येणे आवश्यक आहे. यामुळे ‘श्रीशैल मल्लय्या’ जंगम वेशात आले. सिद्धरामेश्वर ज्या शेतात शिवलिंगाची आराधना करीत होते. तेथे जंगम वेशात आलेल्या श्रीशैल मल्लयाशी भेट झाल्यावर वयाच्या आठव्या वर्षापर्यंत मौन धारण केलेल्या सिद्धरामेश्वरांनी मौन सोडले. स्वत:चा संवाद स्वत:शी व्हावा, असे जंगम ाबरोबर संवाद सुरु झाला.

आपण माझ्या शेतात आलात शिव आराधना करताना आलात आपण कोण आहात? शिव आराधना करताना आहात आपण कोण आहात?

मी श्रीशैलचा मल्लय्या आहे. मला भूक लागली आहे. काही तरी खायला दे म्हटल्यावर सिद्धरामेश्वरांनी जंगमाला हुरडा खाऊ घातला. मला आणखी भूक लागली आहे. दही भात खायला मिळाले तर आनंद वाटेल, हे ऐकून सिद्धरामेश्वरांनी जंगमरुपी मल्लय्याला म्हणाले, तुम्ही येथेच थांबा मी घरू जाऊन दही भात घेऊन योते. जंगम म्हणाले, ठीक आहे. लवकर ये. एवढे ऐकूण धावत पळत सिद्धरामेश्वर घरी आले.

ऐन दुपारी सिद्धरामेश्वर घरी आल्याने आई सुग्गलदेवींना आश्चर्य वाटले. मौन असलेल्या सिद्धरामेश्वर मातेला म्हणाले शेतात श्रीशैलवरुन एक जंगम आला आहे. त्याला खूप भूक लागली आहे. शेतातील हुरडा त्याला खाऊ घातला आहे. तरी आणखी भूक लागली आहे. दही भात आणायला सांगितला आहे. वयाच्या ८व्या वर्षापर्यंत मौनी बुवा असलेल्या सिद्धराम ेश्वरांची दहीभात दे ही वाणी ऐकून माता सुग्गलदेवी खूप खूप आनंदित झाल्या. लगेच सिद्धरामेश्वरांच्या मागणीनुसार दही भात बांधून दिला. श्रीशैलच्या जंगमाना खूप भूक लागली आहे. म्हणून धावत पळत सिद्धरामेश्वर शेतावर आले तर दहीभात मागणारे जंगम तेथे नव्हते.

नाराज होऊन जंगम गेले का? आपल्याला यायला उशीर झाला का? या प्रश्नानी सिद्धरामेश्वर चिंतीत झाले. शोधाशोध सुरु झाली. मल्लय्या... मल्लय्या, अशी हाक सिद्धरामेश्वर देऊ लागले. त्याना प्रतिसाद मिळेना. शोधणे सुरु राहिले. सिद्धरामेश्वर गाई घेऊन घरी गेले नाही. गाई मात्र, सिद्धरामेश्वरांची वाट पाहून घरी पोहोचल्या. गाई आल्या सिद्धरामेश्वर नाही आले. सिद्धराम ेश्वर मल्लय्याच्या शोधात तर मुदूगौडा, सुग्गलदेवी भाऊ बोमण्णा सिद्धरामेश्वरांच्या शोधात अशी अवस्था निर्माण झाली.

याच काळात उघे मल्लय्या, उघे मल्लय्या असा जयघोष करीत भक्तगण श्रीशैल प्रतिवर्षाप्रमाणे चालले होते. त्यांचा जयघोष ऐकूण सिद्धरामेश्वर त्यांना मल्लय्या विषयी विचारले असता ते म्हणाले की आम्ही श्रीशैलला चाललो त्यावर सिद्धरामेश्वर त्यांना म्हणाले मला ही मल्लय्याला भेटायला यायचे आहे. मी तुमच्याबरोबर येतो. आई वडीलांची परवानगी नाही. सोबत नाही. व्यवस्था नाही. हे बालक भक्ताबरोबर श्रीशैलला निघाले. तेथे पोहोचल्यावर देवळात मूर्तीच्या स्वरुपातील मल्लय्याचे दर्शन घेण्यास भक्तांनी सिद्धरामेश्वरांना सांगितल्यावर सिद्धरामेश्वरांनी जंगम वेशातील मल्लय्या हवा हा मल्लय्या नको म्हणून जंगलात मल्लय्यांना भेटण्यासाठी, शोधण्यासाठी निघाले. दऱ्या खोऱ्यात, जंगलात मल्लयाला शोधून, हाक मारुन सिद्धरामेश्वर थकले. आवाज क्षीण झाला. शेवटचा पर्याय म्हणून जंगम वेशातील भेटलेल्या मल्लय्यांना उद्देशून सिद्धरामेश्वर आर्ततेने मल्लय्यांना आवाहन केले. म्हणाले तीन वेळा देवा तुम्हाला हाक मारतो, भेटलात तर ठीक नाही तर तुमच्यासाठी आत्मसमर्पण करतो. श्रीशैलच्या ‘कमरीकोळ्ळ’ या ठिकाणी उभे राहून मल्लय्या अशी आर्त किंकाळी देऊन तिसऱ्या आरोळीला आत्मसमर्पण करणार त्याच क्षणी श्रीशैलच्या मल्लयांनी अलगद सिद्धरामेश्वरांना पोटाशी धरले. जीव शिवाचे मिलन झाले. काय पाहिजे ते माग, असे सांगितल्यावर तुम्हीच पाहिजे, अशी जगवेगळी मागणी सिद्धरामेश्वरांनी भगवंताकडे यातून सिद्धरामेश्वरांनी सोन्नलपूर (सोलापूर) साठी भूकैलास करण्यासाठी जगाच्या नियंत्याकडे त्याचीच शक्ती, भक्ती, अनुभूती व सर्वस्व घेऊन सोन्नलपूरला भू कैलास बनविले. अशा महान शिवयोगी सिद्धरामेश्वरांना मकरसंक्रांती, अक्षता सोहळा या निमित्ताने कोटी कोटी वंदन करुन सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांच्या चरणी प्रार्थना करतो. श्री सिद्धरामायनमः

**- प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार**
**मो. ८८०५४५८७७१**

## रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संस्कार भारतीची प्रबोधनात्मक रांगोळी

### ५० पोती पांढरी रांगोळी तर १ हजार किलो रंगीत रांगोळीचा होणार वापर

### आकर्षक नक्षीदार पायघड्यातून साकारणार मांगल्याची चिन्हे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्देश्वर महाराजांच्या अक्षता सोहळ्यासाठी संस्कार भारतीच्या वतीने यंदा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त प्रबोधनात्मक रांगोळी साकारली जाणार आहे. यासाठी संस्कार भारतीच्या वतीने विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्रासह गुजरात आणि इतर राज्यातून सुमारे दीडशे ते दोनशे नवे व जुने कार्यकर्ते गेल्या अनेक दिवसांपासून कार्यरत आहेत.



दरवर्षी संस्कार भारतीच्या वतीने ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्या अक्षता सोहळ्यासाठी नक्षीदार रांगोळीच्या पायघड्या साकारल्या जातात. यासाठी संस्कार भारतीचे कार्यकर्ते अनेक दिवसांपासून तयारीत मग्न असतात. यासाठी रांगोळी काढण्याचा दररोज सराव केला जातो. मार्किंग करून त्यावर पांढरी रांगोळी आणि आकर्षक रंगसंगती मध्ये नक्षी काढून रांगोळीला अंतिम स्वरूप दिले जाते. त्याच अनुषंगाने यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध ठिकाणाहून जुने आणि नवीन दीडशे कार्यकर्ते अक्षता सोहळ्यासाठी सोलापुरात दाखल झाले आहेत. समाज प्रबोधनात्मक रांगोळीच्या माध्यमातून नवीन संकल्पना मांडली जाणार आहे. त्यासाठी एक दिवस अगोदर मिरवणूक मार्गावर रांगोळीसाठी मार्किंग केली जाणार आहे. त्यावर पांढरी आणि रंगीत रांगोळीच्या माध्यमातून नक्षी साकारली जाणार आहे. हिरेहब्बू यांच्या वाड्यापासून ते कुंभारवाडा, दाते गणपती, दत्तचौक, माणिक चौक, विजापूर वेस, पंचकट्टा, सिद्धेश्वर पेठ, सिद्धेश्वर प्रशाला, संमती कट्टा या मार्गावर या रांगोळीच्या पायघड्या, विविध मांगल्यांची चिन्हे साकारली जाणार आहेत.

संस्कार भारतीचे यंदाचे हे रोप्य महोत्सवी वर्ष आहे. या वर्षानिमित्त विविध ठिकाणाहून कार्यकर्ते सोलापुरात दाखल झाले आहेत. विशेषत: माहेरवाशीन महिलांचा यात मोठा समावेश आहे. तसेच तरुण-तरुणी आणि ज्येष्ठ स्वयंसेवक यांचा देखील समावेश आहे. हिरेहब्बू यांच्या वाड्यापासून ते संमती कट्टा पर्यंत साडेतीन किलोमीटरच्या मार्गावर रांगोळीच्या पायघड्या साकारण्यासाठी ५० पोती पांढरी रांगोळी तर १ हजार किलो रंगीत रांगोळी यांचा वापर होणार आहे. सदरची रांगोळी ही सर्वांसाठी आकर्षक व लक्षवेधी ठरणार आहे.

**- अनंत देशपांडे, संस्कार भारती**

## सोलापूरची गड्डा यात्रा

**सर्व जयंत्या, उत्सव अन सर्व जातींचे सणवार सगळे मिळून साजरे करणारे आमचे हे मायेच्या माणसाचे तरीही थोडेसे उग्र बोलीभाषेचे सगळ्यांच्या मनामनातले गाव, सोलापूर!!! अशा या मुलुखावेगळ्या गावाची दर वर्षी भरणारी हौसेची - नवलाची यात्रा म्हणजे 'गड्डा यात्रा'!! सिद्धेश्वर महाराजांचा अड्डु (पालखी) यात्रा महोत्सव म्हणजेच गड्डा यात्रा! सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची गड्डा यात्रा फार मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.**

मकर संक्रांतीच्या वेळी पाच दिवस सोलापूरात शिवयोगी सिद्धरामेश्वरांची मोठी जत्रा भरते. त्यावेळी नंदीध्वजाची मिरवणूक निघते त्यावेळेचा उत्सव पाहण्यासारखा असतो. नंदीध्वज हे या यात्रेचे मुख्य आकर्षण असतात. यासच श्री सिद्धरामेश्वरांच्या काठ्या अथवा योगदंड म्हणण्याचा प्रघात आहे. यामागची पार्श्वभूमी श्री सिद्धरामेश्वरांची वचन खंड-१ या पुस्तकात यात्रा व परंपरा या प्रस्तावनेत सिद्धेश्वरांच्या विवाहाविषयीची माहिती व अक्षता सोहळ्याचे वर्णन केलेले आहे. कुंभारकन्येची सिद्धरामांबरोबर लग्न करण्याची इच्छा होती. तेव्हा योगदंडाशी लग्न करावे असे सिद्धराम सांगताच तिचे लग्न योगदंडाशी केले जाते व सिद्धरामांनीच मंगलाष्टके म्हटली असा उल्लेख आहे. म्हणूनच योगदंडाचे प्रतिक म्हणून नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. योगदंडाचा मान शहरातील विविध जातीतील लोकांना मिळालेला आहे. सिद्धरामेश्वरांची पहिली काठी (नंदीध्वज) ही सिद्धेश्वर देवस्थानची असते. दुसरी काठी कसब्यातील देशमुखांची, तिसरी काठी लिंगायत माळी समाजाची,चौथी काठी ब्राम्हणांची, पाचवी काठी सुतार लोकांची, सहावी काठी मातंग समाजाची, आणि सातवी काठी महार समाजाची असे प्रतिनिधीत्व सर्व समाजाला देण्यात येते. अंगात पांढरी शुभ्र बाराबंदी घालून, धवलशुभ्र धोतर नेसून डोईला घेरदार मुंडासे बांधलेले भक्तगण अन त्यांच्या भक्कम हातात अलगद विराजमान असलेले उत्तुंग देखणे नंदीध्वज जेव्हा ६८ लिंगांना तैलाभिषेक करून प्रदक्षिणा घालण्याच्या निमित्ताने शहरपरिक्रमाच पूर्ण करतात तेव्हा सगळे शहर त्या शुभ्ररंगात न्हाऊन निघते अन भक्तीशक्तीचा हा सोहळा पुढे पुढे जात राहतो. भक्तलिंग हर्र बोला हर्र, सिद्धेश्वर महाराज की जय या जयघोषात शहर दुमदुमते. समंती कट्ट्यावरचे विधी असोत वा होमकुंडातले विधी असो वा वासराकडून केल्या जाणार्या भाकणूकीचा कानोसा घेणं असो, ते विहंगम दृश्य आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी सारं शहर लोटलेले असते. या यात्रेचे गारूड काही औरच असते, इथला जल्लोष न्याराच असतो हे सगळेजनच मान्य करतात. १२ जानेवारीच्या हुतात्मा दिवसापासून यात्रेची सुरुवात होते. असे म्हणतात की, ब्रिटीशांनी सोलापूरच्या स्वातंत्र्य सैनिकांना फाशी देण्यासाठी मुद्दाम ही यात्रा सुरू होण्याचा दिवस निवडला. त्या वर्षी अर्थातच सोलापूर इतके सुन्न झाले होते की यात्रा झालीच नाही. त्यानंतर दरवर्षी मात्र हुतात्मांच्या स्मरणाने यात्रा सुरू होते. १२ तारखेच्या दुपारी नंदीध्वजाची पहिली नगरप्रदक्षिणा होते. सिद्धेश्वरांनी स्थापलेल्या गावाच्या सीमेवरची ६८ लिंगे यावेळी पूजली जातात. १३ तारखेला भोगी अक्षतेचा दिवस. १४ तारखेला मकर संक्रांतीदिवशी होम आणि वासराच्या भाकणूकीचा कार्यक्रम असतो. जो कृषी संस्कृतीशी आपल्याला जोडतो. १५ तारखेला दारूकामाने यात्रेची सांगता होते. पण यात्रेतील धार्मिक कार्यक्रम संपले तरी दुकाने पुढे २६ जानेवारीपर्यंत सुरूच असतात. सोलापूरातली मंडळी रमत गमत गड्डा यात्रा अनुभवतात. होम मैदान अन तिथे भरणारी ग्रामदैवत सिद्धेश्वरांची गड्डा यात्रा ही आम्हा सोलापूरकरांची ओळख आहे. प्रसिद्ध असलेला, भाग्यश्री बटाटावडा, लक्ष्मीप्रसाद चिवडा, रसपानगृहे, विविध खाद्यपदार्थांची रेलचेल असणारी दुकाने, शेतीमालाचे देखणे प्रदर्शन, हस्तकलांच्या सामग्रीची दुकाने, धार्मिक-शासकीय ग्रंथ प्रदर्शन, भले मोठाले वेगवेगळ्या आकारातील पाळणे, विविध मनोरंजनाची पुरेपूर हमी देणारी आनंदनगरी, सौंदर्यप्रसाधनापासून ते खेळण्यांपर्यंत अनेक वस्तूंची बाजारपेठ ही यात्रेतली नेहमीची वैशिष्टे असतात. पण तरीही ती इथल्या प्रत्येकास ओढ लावत राहते जानेवारीच्या थंडीच्या मोसमात तलावाच्या पाण्यात सिद्धरामेश्वरांच्या मंदिराचे देखणे प्रतिबिंब रात्र वाढेल तसतसे पसरत जाते अन होम मैदानाकडे आलेली पावले समाधान मनाने तृप्त होऊन घरी परततात हा इथला शिरस्ता पिढी दर पिढी चालू आहे, लहानपणीच्या गड्डा यात्रेच्या आठवणी हा प्रत्येक सोलापूरी माणसाचा हळवा कोपरा असतो यातच या यात्रेचे अन सिद्धरामेश्वरांच्या आस्थेचे यश सामावले आहे हे सांगताना माझी छाती अभिमानाने फुलून येते. या यात्रेस महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील विविध प्रांतातून लोक हजेरी लावतात. त्यामुळे या यात्रेस राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. म्हणूनच महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात एक महिनाभर चालणारी शिवयोगी सिद्धरामेश्वरांची गड्डा यात्रा अद्वितीयच आहे.



**- प्रमोद हंचाटे, मुख्याध्यापक,**
**हिंगुलांबिका प्राथमिक शाळा**
**मो. ८१४९१८२१३५**

## संक्षिप्त वृत्त



### आर्या पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**माढा, दि. १२ जानेवारी-**

विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) संचलित, आर्या पब्लिक स्कूल, माढा या सीबीएसई मान्यताप्राप्त स्कूलमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य सागर जाडकर व प्राचार्य सागर थोरात यांनी प्रतिमापूजन केले. प्रा. संध्या सरडे, प्रा. संजीवनी ढोबळे, प्रा. रागिणी शिंदे यांनी विचार व्यक्त केले. यावेळी प्राचार्य सागर थोरात, प्रा. दत्तात्रय चव्हाण, प्रा. मनोज नागटिळक, प्रा. जयदेव गायकवाड, प्रा. शुभम पुरवत, अतुल लंकेश्वर, प्रा. वंदना गोसावी, प्रा. कृष्णा जठार, प्रा. सारिका यादव, प्रा. मेघा भांगे, प्रा. प्रियंका काशीद, प्रा. तेजस्विनी कवठे उपस्थित होते. सूत्रसंचालन आर्या शिरतोडे, अनुष्का चव्हाण व आभार आरोही चव्हाण यांनी मानले.



### अक्कलकोटमध्ये वाहतुकीची कोंडी; नागरिकांतून संताप

**अक्कलकोट, दि. १२ जानेवारी-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोटी शनिवारी भाविकांची प्रचंड गर्दी झाल्याचे दिसुन आले. यामुळे वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसरात भाविकांच्या वाहनांची प्रचंड कोंडी होत असल्याने वाहतुक नियंत्रण पोलीसाचे नियोजनाचे पुन्हा उणीवा स्पष्ठ झाले आहेत. श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ एसटी वाहनतळ ते पांदीतील जुना निमगाव रस्ता त्वरीत विकसीत करून चारपदरी राज्य मार्गला जोडावे यामुळे मंदिर परिसरातील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होईल असे नागरिकातुन मत व्यक्त होत आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्री वटवृक्ष स्वामी मंदिर परिसरात भाविकांच्या वाहनांची वारंवार प्रचंड कोंडी होत असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास येत आहे. शनिवार रविवार पोर्णिमा सलग सुट्टी या दिवशी मंदिर परिसरात प्रचंड वाहनाची कोंडी होत आहे. यामुळे भाविकाना येथुन चालत जाणे धोक्याचे होत आहे. यावर तात्काळ नियोजन करणे गरजेचे आहे.



### वागदरी जि. प. शाळेत हुतात्मा दिन, जिजाऊ माँसाहेबांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळेत राजमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिन, स्वामी विवेकानंद जयंती युवक दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे होत्या. जिजाऊमातेच्या प्रतिमेचे पूजन अर्चना गिरी तर सोलापूरच्या हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन मनिषा कुणाळे यांनी केले. अर्चना गिरी यांनी राष्ट्रमाता जिजाऊ मातेच्या कार्याची माहिती दिली. मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या कार्याला त्रिवार अभिवादन करत मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी सोलापूरच्या चार हुतात्म्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानासह माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची माहिती दिली.

### ‘सलातेसलानाते’ चित्रपटाच्या टीजरचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पर्यावरण, पत्रकारिता, प्रेम, नातेसंबंध, राजकारण, गुन्हेगारी, पैसा, प्रशासन अशा मुद्द्यांवर भाष्य करणाऱ्या ‘स ला ते स ला ना ते’ या चित्रपटाचा धमाकेदार टीजर नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते प्रकाशित झाला.याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकार आवर्जून उपस्थित होते. विदर्भ आणि ख़ानदेशात लोकपरंपरेत वाघ नाचविण्याची परंपरा प्रसिद्द आहे.याच पारंपरिक पद्धतीने या कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पाहुणे आणि कलाकारांचे स्वागत करण्यात आले.लक्षवेधी नाव असलेल्या या चित्रपटाच्या टीजरमुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली असून हा चित्रपट ७ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. विदर्भातील चंद्रपूरमधील न्यूज चॅनेलचा पत्रकार, पर्यावरणप्रेमी तरुणी यांच्या नात्याची गोष्ट या चित्रपटातून उलगडणार आहे. त्याशिवाय पर्यावरणाचे प्रश्न, गुन्हेगारी, राजकारण असे मुद्देही या चित्रपटाच्या केंद्रस्थानी असल्याचं टीजरवरून दिसून येतं.

### एनओसी देण्याकरिता एक लाखांची मागणी करत दमदाटी; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सोसायटीची एनओसी देण्याकरिता फिर्यादी मीनाक्षी संजय जगताप (वय-५९, रा. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) यांच्याकडून एक लाख रुपयांची मागणी करत दमदाटी केल्याची फिर्याद मीनाक्षी जगताप यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद रामचंद्र गायकवाड (रा. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सदर जागेची एनओसी न देता त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ही घटना १४ नोव्हेंबर २०११ ते आजतागायत पर्यंत सिद्धार्थ हौसिंग सोसायटी येथे घडली. तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

# शाकंभरी पौर्णिमेनिमित्त लागणाऱ्या भाज्यांना सोन्याचा भाव

## एक नाही, दोन नाही तर तब्बल ८७ प्रकारच्या भाज्या मार्केटमध्ये विक्रीस, एक ते दीड हजार इतकी सर्व भाज्यांची मिळून किंमत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ जानेवारी-**

शाकंभरी देवीची पौर्णिमा अर्थात शाकंभरी पौर्णिमा सोमवारी (ता.१३) असल्याने या दिवशी शाकंभरीदेवीस साठ प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य दाखविला जातो. यासाठी पंढरपुरातील इंदिरा गांधी भाजी मार्केटमध्ये एक नाही दोन नाही तर तब्बल ८७ प्रकारच्या भाज्या विक्रीसाठी आल्या आहेत. या सर्व भाज्यांची किंमत १ हजार २१० रुपये इतकी आहे. शाकंभरी पौर्णिमेसाठी लागणारी भाजी खरेदीसाठी मार्केट मध्ये नागरिकांनी मोठी गर्दी केली असल्याचे दिसून आले.

पंढरपुरातील अनेक घरांमध्ये शाकंभरी देवीचा नवरात्र महोत्सव साजरा केला जातो. बऱ्याच वर्षा नंतर या वर्षी शाकंभरी पौर्णिमा आणि संक्रांतीच्या सणातील महिलांसाठी महत्वाचा असलेला भोगीचा सण एकाच दिवशी अर्थात सोमवारी (ता.१३) आला आहे. त्यामुळे महिलांमध्ये विशेष उत्साह दिसत आहे. दरम्यान शाकंभरी पौर्णिमे दिवशी शाकंभरीदेवीस एक नाही दोन नाही तर तब्बल साठ भाज्याचा नैवेद्य दाखविला जातो. या भाज्यांची पंढरपुरातील देवमारे कुटुंबीय गेल्या अनेक वर्षापासून विक्री केली जात आहे. सोलापूर, पुणे आणि लातूर तीन जिल्ह्यातून या सर्व भाज्या गोळा केल्या जातात. शाकंभरी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी पंढरपुरात या भाज्यांची विक्री केली जाते.



### महिलांकडून एकत्रितरित्या भाज्यांची खरेदी

मार्केट मध्ये काही महिला स्वतंत्र्यरित्या तर अनेक जणी चार ते पाच महिलांचा ग्रुप करुन एकत्रित सर्व ८७ भाज्यांची खरेदी करताना दिसत होत्या. या भाज्यांची एकत्रित खरेदी झाल्या नंतर त्या एकीच्या घरी बसून महिला आपसात समप्रमाणात वाटून घेताना दिसत होत्या. त्यामुळे शाकंभरी भाज्यांच्या किंमती जरी जास्त असल्या तरी महिलांनी या सर्व भाज्यांची खरेदी अगदी आपल्या बजेट बसविल्याचे बोलले जात होते. सकाळपासून सुरु झालेली भाज्यांची खरेदी रात्री उशिरापर्यंत चालू होती. भाजी मंडईमध्ये प्रचंड गर्दी झाली होती.

आमच्या भादुले परिवाराचे शाकंभरी हे कुलदैवत आहे. त्यामुळे सहाजिकच आमच्याकडे शाकंभरी नवरात्रोत्सव कुळधर्म म्हणून दरवर्षी उत्साहात संपन्न होत असतो. वर्षातून एकदा येणाऱ्या या कुळधर्म उत्सवाची आम्ही अगोदर पासूनच तयारी करतो. पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती. मात्र आता आमचा परिवार देखील विभक्त झालेला आहे. जरी आम्ही विभक्त झालो असलो तरी शाकंभरी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी आम्ही भादुले परिवारातील सर्व महिला एकत्रित येवून शाकंभरी पौर्णिमेसाठी लागणाऱ्या सर्व भाज्यांची मार्केट मध्ये जावून सर्वजण एकत्रितच खरेदी करतो. भाज्यांची खरेदी झाल्या नंतर एकीच्या बसून आपसात आम्ही त्या भाज्या सर्व वाटून घेतो. स्वतंत्ररित्या सर्व भाज्या खरेदी केल्या तर त्या संपत तर नाहीतच. त्यामुळे आम्ही एकत्रित सर्व भाज्यांची खरेदी केल्यामुळे महागाईच्या काळात प्रत्येकीच्या बजेट मध्ये सर्वांना भाज्या समप्रमाणात पुरेशा मिळु शकतात. शाकंभरी पौर्णिमेचा कुळधर्म देखील उत्साहात साजरा करता येतो.

**- सुशिला भादुले, गृहिणी**

### भोगी आणि शाकंभरी पौर्णिमा एकाच दिवशी

या वर्षी सक्रांत सणातील महत्वाचा समजला जाणारा भोगीचा सण आणि शाकंभरी पौर्णिमा ही एकाच दिवशी सोमवारी (ता.१३) आली आहे. त्यामुळे बऱ्याच वर्षानी हा योग जुळून आल्याने या वर्षी महिलांमध्ये कमालीचा उत्साह देखील दिसत आहे.

दरम्यान शाकंभरी देवीच्या पौर्णिमा उत्सवा निमित्त लागणाऱ्या भाज्यांची रविवारीच पंढरपुरातील इंदिरा गांधी भाजी मार्केट मध्ये विक्री करण्यात आली. येथील इंदिरा गांधी भाजी मार्केट येथे ८७ भाज्यांची विक्री करण्यात आली.

या सर्व भाज्यांना साधारणपणे एक हजार ते दीड हजार रुपये ऐवढी मोठी किंमत आकारण्यात आलेली होती. यामध्ये ४५ प्रकारच्या रानभाज्या किंवा पालेभाज्या व तब्बल ४२ प्रकारच्या फळभाज्यांचा समावेश होता. या भाज्या खरेदी करण्यासाठी पंढरपुरात नागरिकांची गर्दी दिसून आली.





# अकलूज येथे अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेला प्रारंभ

## यंदाचे ४६ वर्षे; राज्यासह दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेशातील मल्लांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ जानेवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर येथे दि. १२ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेला प्रारंभ झाला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील प्रमुख उपस्थित होते.

जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील व स्पर्धाप्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन, आखाड्याचे पूजन व वजनगटातील कुस्ती लावून स्पर्धेचा प्रारंभ झाला. यावेळी महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, राष्ट्रकुल विजेते रामचंद्र सारंग, भीमराव काळे, पांडुरंग एकतपुरे, विजय दोशी, रामचंद्र गायकवाड, नामदेव ठवरे, महादेव अंधारे, वसंतराव जाधव, मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, यांच्यासह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ६४० मल्ल सहभागी

वजनी गटासाठी २५ ते ८५ किलो पर्यंत एकूण १५ वजनगटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही बक्षीसे देण्यात येत आहेत. या स्पर्धेत एकूण सुमारे ११ लाखाची रोख बक्षीसे आहेत. स्पर्धेत वजनी गटासाठी ५७८ व खुल्या त्रिमूर्ती स्पर्धेसाठी ६२ असे एकुण सुमारे ६४० मल्ल या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचे हे ४६ वे वर्ष आहे. स्पर्धेत दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र येथील राष्ट्रीय स्तरावरील मल्ल सहभागी झाले आहेत.

त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धेसाठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड लाख रुपये, तृतीय क्रमांकासाठी एक लाख रुपये व चतुर्थ क्रमांकासाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहेत. स्पर्धेचा प्रारंभ २५ किलो गटातील धनराज पवारविरुद्ध धुळदेव बोडरे यांच्यात होऊन धनराज पवार विजयी झाला.

८० किलो गटात हर्षद सावंतविरुद्ध राहुल चव्हाण यांच्यात होऊन हर्षद सावंत विजयी झाला. सायंकाळी उशिरापर्यंत दोन मैदानावर वजनी गटाच्या स्पर्धा सुरू होत्या. सूत्रसंचालन अशोक धोत्रे व आर. आर. पाटील यांनी केले.

# पिलीव येथे भोगीच्या खरेदीसाठी महिलांची लगबग



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मकर संक्रांतीच्या सणानिमित्त खरेदीसाठी महिलांची प्रचंड गर्दी सध्या बाजारपेठेत दिसत आहे.येत्या मंगळवारी महिलांचा पवित्र सण मकर संक्रांत आहे.

सोमवारी भोगीचा सण या सणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व भाजीपाला ,गाजर,ज्वारीचे कणीस,हरभरा, बोरे, वांगी, तीळ यासाठी मोठी गर्दी झाली होती तर मकर संक्रांत सणासाठी आवश्यक असणाऱ्या सुगड व इतर साहित्य खरेदीसाठी व बांगड्या भरण्यासाठी पिलीव बाजारपेठेत गेल्या दोन दिवसापासून मोठी गर्दी दिसून येत आहे.

मकर संक्रांतीच्या सणानिमित्त पिलीव बाजारपेठेत सध्या महिलांची मोठी गजबज दिसत आहे तर मंगळवारी मकर संक्रांतीनिमित्त सर्व ग्रामदैवत पंढरपूर येथील विठ्ठलाला किंवा इतर देवांना वाण घेऊन ओवासण्याची परंपरा आहे. महिला घरोघरी जाऊन हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करतात तसेच आप आपल्या ऐपतीप्रमाणे महिला वाण लुटतात. या सणाला महिला मोठ्या संख्येने खरेदीसाठी बाजारपेठेत येतात त्यामुळे पिलीव बाजारपेठेत सध्या महिलांची मोठी गजबज दिसत आहे.

# सांगोल्यात रस्ता सुरक्षा अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ जानेवारी-**

शनिवार दि.११ जानेवारी रोजी महामार्ग पोलिस उपकेंद्र, सांगोला व सांगोला आगार यांच्या संयुक्त विद्यमानाने सांगोला आगार एसटी वर्कशॉप मध्ये रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महामार्ग सुरक्षा पथकाचे एपीआय मनोज बाबर, पोलिस हवालदार नवले, सांगोला पोलिस स्टेशनचे नितीन घुले, एनएचए आयचे गौरव सिंग, शर्मा, जी आर इन्फ्राचे चंदन कुमार, ज्ञानेश्वर कांबळे, सामाजिक कार्यकर्ते नागेश जोशी, आगार व्यवस्थापक विकास पोपळे, स्थानक प्रमुख पंकज तोंडे, सहाय्यक अधीक्षक विकास पारसे, वाहतूक निरीक्षक सागर कदम, सहा. वाहतूक निरीक्षक समाधान काशीद, वरिष्ठ लिपीक टकले यांच्याहस्ते द्वीप प्रज्वलन करून व फित कापून सदर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित प्रमुख मान्यवरांनी मनोगतात अपघात नक्की कशामुळे होतात, यात अती घाई, वाहन चालवताना मोबाईलचा वापर, वाहनाचा बिघाड, व्यसन करून वाहन चालवणे, वाहतूक नियमाचे पालन न करणे हे मूळ अपघाताची कारणे आहेत व अपघात टाळण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे याबद्दल कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विना अपघात सेवा बजावणाऱ्या चालकांचा अभिनंदन करून सत्कार करण्यात आला तसेच अपघात झालेल्या चालकांना मार्गदर्शन करण्यात आले व भविष्यात अपघात होऊ नये याबद्दल कशी काळजी घ्यावी याची सूचना देण्यात आली.




# धसपिंपळगावातील सभा मंडपाचे महाशिवरात्रीला लोकार्पण

## जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ जानेवारी-**

आपल्या गावावरचे निस्सीम प्रेम व्यक्त करत एकत्र आलेल्या धस पिंपळगावच्या युवकांनी जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून ग्रामविकासाला नवे वळण देत लोकसहभागातून साकारलेल्या पुरातन शिवालयाच्या सभा मंडपाचा लोकार्पण सोहळा महाशिवरात्रीच्या पवित्र मुहूर्तावर आयोजित केल्याची माहिती जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांनी दिली.

पिंपळगावचे उपसरपंच अण्णासाहेब धस यांची राष्ट्रीय सरपंच संसदेच्या जिल्हा समन्वयकपदी निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्यावतीने जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आयोजित केलेल्या घरगुती सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रगतशील बागायतदार बाबासाहेब पाटील, माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, माजी उपसरपंच शिवाजी भोळे, दादासाहेब चिपडे, बाळासाहेब जगदाळे, अण्णासाहेब धस, विजयसिंह पाटील, नवनाथ जगदाळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होती.



### निरपेक्ष भावनेने काम करणार : धस

उपसरपंच धस यांनी गावकऱ्यांनी मनापासून केलेल्या सत्कारामुळे काम करण्याचा हुरुप वाढला असून भविष्यातही गावाच्या हितासाठी असाच निरपेक्ष भावनेने झटणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी धस यांचा जन्मभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शाल, फेटा व भव्य सन्मानचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

यावेळी नानासाहेब धस यांनी राष्ट्रीय सरपंच संसदेच्या माध्यमातून राज्यातील सरपंचांचे एकत्रीकरण होत असून यातून आदर्श ग्रामविकास चळवळीला गती मिळणार आहे. जिल्ह्यामध्ये समन्वयकपदाच्या माध्यमातून सरपंच संसदेचे कार्य जिल्ह्यात सर्वत्र पोहोचविण्याचा मान अण्णासाहेब धस यांच्या रुपाने पिंपळगावला मिळाला आहे यातून प्रेरणा घेत पिंपळगाव सर्व सोयीसुविधायुक्त आणि शांतता सद्भाव एकता यांच्या माध्यमातून देशाच्या नकाशावर मानाने गाजावे हे स्वप्न डोळ्यासमोर ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

गावचे शिवमंदिर हे पुरातन आणि ऐतिहासिक असून महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर या देवालयाचा भव्य सभामंडप लोकार्पण होणार असून तीन दिवसांच्या भक्ती सोहळ्यातून गावकऱ्यांसाठी धार्मिक मेजवानीच मिळणार आहे. या मंदिराचे धार्मिक महत्व लक्षात घेऊन तीर्थक्षेत्र विकास निधीतून या देवळाचा अधिक भव्य काय पालट होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्व गावकऱ्यांना बरोबर घेत ग्रामविकासाची ही चळवळ अशीच उत्साहाने पुढे नेणार असल्याचे त्यांनी सांगितले. यातून पिंपळगावला गावहिताचे नवे वळण मिळणार असून यातून निर्माण झालेला पॅटर्न गावचा चेहरा मोहरा बदलेल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे सचिव स्वप्निल धस यांनी नेटकेपणाने केले. तसेच आभार पुणेस्थित अभियंता वैभव जगदाळे यांनी मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सोलापूर : एमआयटी कॅम्पस येथे प्रयागराज उत्तर प्रदेश महाकुंभसासाठी एमआयटी सोलापूर समुहाकडून १००० कापडी पिशव्या स्वीकारण्यात आल्या. यावेळी एमआयटीचे कार्याध्यक्ष स्वाती चाटे-कराड, कुलगुरु गोपाळकृष्ण जोशी, रजिस्टर प्राणेश मृणाल, कार्यालयीन अधिकारी महेश देशपांडे, वास्तुविशारद असीम सिंदगी, अजित कोठारी, प्रा. पुरुषोत्तम बगळे, विजय काशीद, वृक्ष आयाम सहप्रमुख, प्रांत मंडल सदस्य तथा जिल्हा संयोजक, पर्यावरण संरक्षा गतिविधीचे प्रविण तळे उपस्थित होते.

# दरमहा ५० हजार नागरिकांचा 'रेशन कोटा' वाटपाविना शिल्लक

## जिल्ह्यात १०० टक्के धान्य वाटप करा

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या पुरवठा विभागाला सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

जिल्हा पुरवठा विभागाकडून जिल्ह्यात रास्त भाव धान्य दुकानदारांकडे पाठविलेल्या मालाचा कोटा दुकानदारांकडून १०० टक्के वितरित होत नाही. जिल्ह्यातील ५ ते ६ टक्के ग्राहक माल घेवून जाण्यासाठी येत नाहीत. अशा जवळपास ५० हजारापर्यंत नागरिकांचा राशन कोटा दुकानदारांकडे शिल्लक राहतो. ही बाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांच्याशी संवाद साधून हा धान्य कोटा का वितरित होत नाही? अशी विचारणा करीत सर्व



मालाचे १०० टक्के वितरण करण्याचे आदेश दिले. इतकेच नाहीतर शिल्लक कोटा का राहतो? याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे.

जिल्ह्यात रेशन दुकानदारांना राशन वाटपाचा कोटा देण्यात आल्यानंतर त्यातील ५ ते ६ टक्के कोटा शिल्लक राहत आहे.




### ई-केवायसीचे काम अजून प्रलंबितच

जिल्हाभरातील राशन दुकानांतून ई-केवायसीचे काम अद्यापही सुरूच आहे. दरम्यान, मध्यंतरी सर्व्हर प्राब्लेममुळे हे काम थांबले होते. आता या ई-पॉस मशीन सुरू झाल्या असल्यातरी अजूनही अधून-मधून बंद पडू लागल्याने ई-केवायसी कामाला अडथळा निर्माण होत आहे. ही ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यातील स्थलांतरीत नागरिक, लग्न होवून गेलेल्या मुली, मयत यांची युनिट आपोआप कमी होतील आणि कोटा वाटपातील योग्य नियोजन लागेल.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

याचे कारण ऊसतोड कामगार, विटभट्टी कामगार व इतर काही नागरिकांचे नोकरी-व्यवसायासाठी झालेले स्थलांतरीत युनिट, मयत, लग्न होवून गेलेल्या मुलींचाही हा कोटा शिल्लक राहण्याची शक्यता आहे. तसेच ऑनलाईन कोटा वाटप करताना अनेकांचा ई-पॉस मशीनला अंगठा उमटत नसणे असेही कारण सध्या समोर येत आहे. तरीही जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी जिल्ह्यातील राशन दुकानदारांची एक बैठक घेवून शिल्लक कोट्याची कारणमिमांसा शोधण्यास सांगितले आहे. इतकेच नाहीतर याची लिखीत स्वरूपात कारणे मागितली आहेत. यामुळे आगामी महिन्यात या शिल्लक कोट्याची कारणे मिळतील आणि हा शिल्लक कोटा ज्या गरजू लोकांना धान्य मिळत नाही; त्यांच्याकडे वळविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी दिली.


## संक्षिप्त वृत्त



### शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने बलिदान दिनी चार हुतात्म्यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

बलिदान दिनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सोलापूरचे चार हुतात्मे मल्लपा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे व किसन सारडा यांना स्वातंत्र्यपूर्व काळात १९३१ मध्ये स्वातंत्र्याची लढाई इंग्रजांविरुद्ध लढताना १२ जानेवारी यादिवशी फाशी देण्यात आली. त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवण्यासाठी, आणि हुतात्मा दिनानिमित्त सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, यांच्या हस्ते शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार विश्वनाथ चाकोते, प्रदेश चिटणीस संजय हेमगड्डी, कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, माजी नगरसेवक विनोद भोसले, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अल्पसंख्यांक अध्यक्ष जुबेर कुरेशी, प्रवक्ते नागनाथ कदम, भीमाशंकर टेकाळे, सुशील बंदपट्टे, तिरूपती परकीपंडला, अशोक कलशेट्टी, अनिल मस्के, केशव इंगळे, बसवराज म्हेत्रे, रुपेश गायकवाड, परशुराम सतारेवाले, लखन गायकवाड, राजन कामत, इलियास शेख, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, राजेश झंपले, सुमन जाधव, नागनाथ शावने, अप्पा सलगर, पृथ्वीराज नरोटे, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, चंदा काळे, छाया हीरवटे, हणमंतू रुपणर, रुकैया बिराजदार, लता गूंडला, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

राहत्या घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.सीएक्स.७३९० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ते ८ जानेवारी दरम्यान लक्ष्मी अपार्टमेंट ब्लॉक नंबर ८ तिसरा मजला येथे घडली.याप्रकरणी जयश्री ऑगस्टिंग वाघमारे (वय-४८,रा.लक्ष्मी अपार्टमेंट) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सरतापे हे करीत आहेत.

### सभासदाची नोंदणी न करता पैशाची मागणी; एकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सभासदाची नोंदणी न करता वारंवार पैशाची मागणी केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० जुलै २०१२ रोजी ते आज तागायत पर्यंत सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटी येथे घडली.याप्रकरणी सुशीला तिपण्णा पोतेनवरु (वय-६५,रा.उत्तर सदर बझार,सिद्धार्थ सोसायटी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद रामचंद्र गायकवाड (रा. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या राहत्या घराची जागा त्यांच्या नावावर होण्याकामी हस्तांतरण पत्र दिले असून,त्यामध्ये त्यांनी त्यांच्या सोसायटी सभासद




तत्वाचा राजीनामा मंजूर करून तसे पत्र दिले होते.ते हस्तांतरण पत्र सन २०१२ चे चेअरमन तेनाळीकर यांच्याकडे गेले असता,त्यांनी फिर्यादी यांचे पती यांना वरील संशयित आरोपी यांच्याकडे पाठवून दिले.त्यावेळी प्रमोद गायकवाड याने फिर्यादी यांच्या पतीस सभासदत्व रद्द करण्यासाठी एक लाख रुपये व नवीन सभासद नोंदवून घेण्यास एक लाख रुपये अशी मागणी करून फिर्यादीस व फिर्यादीच्या घरच्यांना त्रास दिला.तसेच आज तगायतपर्यंत सभासद म्हणून नोंद केलेली नसून,वारंवार पैशाची मागणी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोहर हे करीत आहेत.

# मागेल त्याला मिळणार सोलर पॅनल

## उपजिल्हाधिकारी नाटेकर यांची माहिती

## जिल्हा प्रशासनाचा पीएम सूर्यघर योजनेवर फोकस

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

दिवसेंदिवस महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर विजेचे लोड शेडिंग चालू असल्याने याचा मनस्ताप सर्वांनाच होत आहे. आपले अति महत्त्वाचे जर काम असेल आणि त्याला जर लाईटची गरज असेल तर अशावेळी आपल्याला त्या लाईटची किंमत कळते. यासाठीच रूप टॉप सोलर योजनेवर जिल्हा प्रशासन फोकस करीत असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली. दरम्यान, मागेल त्याला आपल्या घरावर 'सोलर पॅनल' देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वीज निर्माण करण्यासाठी सरकारकडे वेगवेगळ्या पद्धती आहेत, वीज ही कोळशावर सुद्धा बनवली जाते तसेच वीज अणुऊर्जावर सुद्धा बनवली जाते. यासाठी फार मोठा खर्च लागतो. सगळ्यांना एकाच वेळी वीज सध्या तरी उपलब्ध होऊ शकत नाही. ही 'रूफ टॉप सोलर योजने' मार्फत सबसिडीवर सरकार तुम्हाला घरावर सोलर बसवून मिळणार आहे. त्यामुळे तुमच्या घरामध्ये लाईट असो किंवा नसो तरीही तुमच्या घरांमध्ये सौर ऊर्जा मार्फत लाईट राहणार आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर सोलर



पॅनल बसवण्यासाठी सोलर पॅनलच्या खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या घर, कार्यालय, कारखाना यांच्या छतावर सोलर पॅनल बसवून विजेची बचत करणे हा या योजनेचा उद्देश आहे. राज्यातील नागरिकांना कमी दरात वीज उपलब्ध करून देणे हा या योजनेमागचा उद्देश आहे. आपल्याही जिल्ह्यातील सर्व नागरिक या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेमुळे नागरिकांना कमी खर्चात वीज उपलब्ध होईल. या योजनेचे अर्ज प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने असल्यामुळे कुठलाही शासकीय कार्यालयात फेऱ्या मारण्याची आवश्यकता नाही.

**रुफटॉप योजनेंतर्गत अशी राहणार सबसिडी**

| रुफटॉप सौर ऊर्जा | किंमत |
|---|---|
| १ किलोवॅट | ४६,८२० |
| १ ते २ किलोवॅट | ४२,४७० |
| २ ते ३ किलोवॅट | ४१,३८० |
| ३ ते १० किलोवॅट | ४०,२९० |
| १० ते १०० किलोवॅट | ३७,०२० |

### सोलर रुफटॉप सबसिडी योजनेची कागदपत्रे

आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जमिनीचा ७/१२, बँक खाते पासबुक, मोबाईल नंबर, पासपोर्ट आकाराचा फोटो, विजेचे बिल, ज्या जागेवर सोलार पॅनल बसवायचे आहे त्या जागेचा तपशील.

### स्वत:च्या जागा आणि इतर काही राहणार अटी

महाराष्ट्र बाहेरील व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. एका व्यक्तीला एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल. ज्या गावात विजेची जोडणी झालेली नाही अशा गावांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारमार्फत अनुदान मिळते परंतु थोडीफार रक्कम ही लाभार्थ्याला देखील भरावे लागते. सोलर पॅनल खरेदी करण्यासाठी ज्या जागेत तो सोलर पॅनल बसवणार आहे ती जागा स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे बँक खाते असणे आवश्यक आहे. बँक खाते आधार कार्ड सोबत लिंक असणे आवश्यक आहे.

## 'मार्शल लॉ' मध्ये हौतात्म्य पत्करलेले

# नरसय्या त्यारला यांच्या स्मारकाचे भिजत घोंगडे

**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. १२ जानेवारी-**

'मार्शल लॉ' मध्ये हौतात्म्य पत्करलेले पद्मशाली समाजाचे नरसय्या त्यारला यांच्या त्यागाची नोंद इतिहासाने ज्या प्रमाणात घ्यावयाचे होते त्याप्रमाणात घेतली गेली नाही. पूर्वभागात त्यांचे भव्य, दिव्य स्मारक करण्याविषयी हालचाली सुरु करण्यात आल्या होत्या. परंतु गेल्या अनेक वर्षापासून हुतात्मा कै. नरसय्या त्यारला यांच्या स्मारकाचे प्रश्न भिजत घोंगडे पडल्याने तेलुगुभाषिकांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य उपभोगलेले शहर म्हणून सोलापूरची गणना होते. इंग्रजांना सळो की पळो करून सोडलेले हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा श्रीकिसनजी सारडा, हुतात्मा कुर्बान हुसेन यांना इंग्रजांनी १२ जानेवारी या दिवशी पासावर लटकाविले होते. या चार हुतात्म्यांनी केलेले कार्य आणि त्यांचे बलिदान पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरावे यासाठी त्यांचे पुतळे उभारण्यात आले.

महात्मा गांधी यांनी सन १९३० साली मिठाचा सत्याग्रह केला, देशभरात त्याचे पडसाद उमटले होते. त्यावेळी सोलापुरात तुळशीदास जाधव, रामकृष्णजी जाजू, आशण्णा इराबत्ती, कृ.भि. अंत्रोळीकर, नागप्पा नारा यांच्यासह अनेकांनेक सोलापूरकरांनी इंग्रज राजवटीचा तीव्र निषेध केला होता. तेव्हा, इंग्रजांनी प्रचंड गोळीबार केला होता. यात कै. शंकर शिवदारे हे पहिले तर कै. नरसय्या त्यारला हे दुसरे बळी ठरले होते.

इंग्रजांच्या विरोधात चवताळून उठलेल्या सोलापूरकरांनी शिंदीची झाडे तोडली. मंगळवार पेठ पोलीस चौकी जाळले. राजेंद्र चौक येथील कोर्ट (आता याठिकाणी कामगार कल्याण केंद्र आहे) जाळले. सोलापूरकरांनी धारण केलेल्या उद्रेकामुळे इंग्रज प्रचंड घाबरले होते. पूर्व भागातील कन्ना चौक येथे नरसय्या त्यारला यांच्यावर गोळ्या झाडून ठार मारले. मात्र, याची नोद काठेही घेतली जात नाही. याकडेही लक्ष वेधण्यात येत आहे.

# युनिक इंग्लिश स्कूलमध्ये मकर संक्रांत सण साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. १२ जानेवारी-** व्ही.जी.शिवदारे प्री-प्रायमरी आणि युनिक इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये मकर संक्रांत हा सण साजरा करण्यात आला. सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धरामेश्वराचे यात्रेचा देखावा युनिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी सिद्धरामेश्वराच्या फोटोचे व नंदीकोलचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी मुलांनी बाराबंदी ड्रेस मुलींनी परकर, पोलका असा गणवेश परिधान केला होता. विद्यार्थ्यांने विविध प्रकारचे खाद्यपदार्थ जसे की बाजरीची भाकरी, भजी भाजी, खीर, तिळगुळ अशा विविध खाद्यपदार्थांचा भोग सिद्धरामेश्वरांना दाखवण्यात आला. बाराबंदी वेशभूषितले विद्यार्थी नंदीकोल घेऊन शाळेच्या प्रांगणामध्ये मिरवणूक काढण्यात आली. शाळेच्या शिक्षिका अलका कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना सिद्धरामेश्वर यांची माहिती सांगितली. संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. डी.एस.टी.एस. मंडळाचे सर्व पदाधिकारी शेटे, अंजली तिवारी, शुभदा उपासे, किलजे, पूजा बाजपाई या सर्वांनी मुलांचे कौतुक केले. शाळेच्या समन्वयीका मानसी झळकीकर, पर्यवेक्षिका अश्विनी बिराजदार आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून मनीषा कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# क्षयरोगमुक्त मोहिमेत सोलापूर पालिकेचा समावेश

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वकांक्षी योजना

## राज्यातील 30 जिल्ह्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

पंतप्रधानांच्या महत्वाकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारतातून सन २०२५ अखेरपर्यंत क्षयरोगाला हद्दपार करण्याचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोगमुक्त मोहीम, निक्षय शिबिरे घेण्याची योजना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३० जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे. यामध्ये सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्राची निवड करण्यात आलेली आहे.

रविवार दि.१२ जानेवारीपासून सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यांची यात्रा चालू होत असून यात्रेमध्ये एक ते दिड लाख भक्तगण सहभागी होतात. दि.१३ ते १५ जानेवारी दरम्यान जनभागीदारीतील मकर संक्रांत व पोंगल सण याचे औचित्य साधून सोलापूर शहरातील नागरिकांना क्षयरोग विषयक माहिती होणे गरजेचे आहे. त्यासाठी शहर क्षयरोग केंद्र, सोलापूर महानगरपालिका व रोटरी क्लब



सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने होम मैदान समोर मदर तेरेसा पॉलिक्लिनीक या ठिकाणी १०० दिवसीय क्षयरोग मुक्त अभियानाचा आयईसी स्टॉल उभारून क्षयरोग विषयक जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे हस्ते करण्यात आले.

महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, रोटरी क्लब सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा डॉ. जान्हवी माखीजा, संचालक सुनिल दावडा, अ‍ॅड. स्वप्नील कोंडगुळे, दौलत सिताफळे, मनपा आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. आतिश बोराडे, कर्मचारी उपस्थित होते. आजचा दिवस ६८ लिगांना नंदीध्वज मिरवणूकीने तैलाभिषक करण्यात येतो. याचे औचित्य साधून मानाच्या काठयांसोबत चालणाऱ्या मानकऱ्यांना व भाविकांना सिध्दरामेश्वरांचे चित्र व क्षयरोग विषयक जनजागृतीचे स्टीकर्स असलेली प्रतिकात्मक लहान नंदिध्वज तयार करुन ती जनजागृतीसाठी वाटप करण्यात आली. कार्यक्रमात श्री सिध्देश्वर महाराजांच्या जयघोषासोबत टीबी हारेल देश जिंकेलचा नारा सदर स्टॉलवर दिवसभर देण्यात आला. कार्यक्रम स्थळी ६८ लिंगांना परिक्रमा घालणाऱ्या सोलापूर शहरातील डॉ. राजेंद्र घुली, अ‍ॅड. मिलींद थोबडे, वाले आदी मान्यवर व प्रतिष्ठीत नागरिकांनी १०० दिवसीय क्षयरोग मुक्त अभियानाच्या आयईसी स्टॉलला भेट दिली.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**सोलापूर : नंदीध्वज यात्रेत हिरेहब्बू निवास ते सिध्देश्वर मंदिर सरगीहळ्ळी परिवाराच्यावतीने पायघड्या घालत सेवा बजावत होते.**



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### अज्ञात चोरट्याने लॅपटॉपची बॅग पळवली

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

एसटी स्टँड येथून बस मधून खाली उतरत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत तरुणाजवळ असलेली लॅपटॉपची बॅग अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सचिन सुधाकर कुलकर्णी (वय-३६,रा.उद्धव नगर,विजापूर रोड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करीत आहेत.

### महिलेच्या पर्समधून ११ हजारांची रक्कम लंपास

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

कौंतम चौक ते कोंडा नगरकडे रिक्षात प्रवास करत असताना फिर्यादी सावित्रा मोहन यादव (वय-३०,रा.तुळजापूर वेस,विट गल्ली) व त्यांच्या दोन्ही मुल सोबत होते.त्यावेळी अज्ञात तीन महिलांनी फिर्यादी यांची नजर चुकवून त्यांच्या जवळील पर्समधील ११ हजारांची रोख रक्कम चोरून नेली आहे.ही घटना ११ जानेवारी रोजी सकाळी दहा ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी सावित्रा यादव यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तीन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल उबाळे हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ; पतीसह दहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना त्यांना सासरकडच्या लोकांनी टोमणे मारून व लग्नात मानपान केला नाही. तसेच पैशाची मागणी करत शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण केली. तसेच घरातून हाकलून दिले. अशा आशयाची फिर्याद मनीषा दिनेश भोसले



(वय-२९,रा.अंबिका नगर,जोशी गल्ली,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती दिनेश विलास भोसले, विलास दाजीराव भोसले,नणंद सारिका सुभाष सरवदे, नणंदेचा पती सुभाष सरवदे, चुलत सासू सुनिता उत्तम भोसले, चुलत सासरे उत्तम भोसले,भारत भुजंग भोसले, दिलीप भोसले, सुनील अंबादास भोसले, अरुण नरसु भोसले (सर्व.रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना सन २०१८ ते एप्रिल २०२४ च्या दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.

### बचत गटाच्या हप्त्यावरून मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

बचत गटाच्या हप्त्यावरून मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास साखरपेठ येथे घडली.याप्रकरणी श्रीनिवास हरिदास उडता (वय-३३,रा.साखरपेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून बसवराज पाटील व बसवराज यांचे दोन मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी अंकिता असे जेवण करत असताना कीर्ती पाटील यांचे पती बसवराज पाटील याने फिर्यादीस फोन करून सात्विक मिठाई साखरपेठ या ठिकाणी बोलवून घेतले. त्यावेळी बचत गटाचा हप्ता दे असे म्हणून बसवराज पाटील याने शिवीगाळ करत पडलेल्या पीव्हीसी पाईपने फिर्यादी यांच्या पायाला व हाताला मारहाण केली.तसेच बसवराज यांच्या मित्रांनी फिर्यादी यांच्या तोंडावर डोक्यावर मारहाण करून तुला जीवे ठार मारतो अशी धमकी दिली. दरम्यान फिर्यादी यांच्या खिशातून मोबाईल काढून घेऊन मोबाईल आदळून नुकसान केले. तसेच जेलरोड पोलीस स्टेशनच्या बाहेर भेटून केस मिटवून घे नाहीतर तुझ्यावर माझ्या बायकोला सांगून महिला बाबतची खोटी केस दाखल करीन व तुला अद्दल घडविन अशी धमकी दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोसई डेरे हे करीत आहेत.

# श्री सिद्धरामेश्वरांचा आज अक्षता सोहळा

## मंगलमय वातावरणात तैलाभिषेक करून सातही नंदीध्वज विसावले





**सोलापूर : रविवारी सकाळी मल्लिकार्जुन मंदीर परिसरात राजशेखर हिरेहब्बू यांच्या निवासस्थानी विधिवत पूजाअर्चा श्री. श्री होटगी मठ महास्वामी महाराज हस्ते करुन ६८ लिंगाना तैलाभिषेक करण्यात आला. यावेळी बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिरापासून मानाच्या काठ्यांची मिरवणूक काढण्यात आली. (छायाचित्र केवल तिवारी)**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

बोला एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र, श्री सिद्धेश्वर महाराज की जय... असा जयघोष करत पांढरा शुभ्र बाराबंदीचा पोशाख परिधान केलेल्या हजारो सिद्धेश्वर भक्तांच्या साक्षीने श्री सिद्धेश्वर महाराजांनी सोलापुरात स्थापन केलेल्या ६८ शिवलिंगाना रविवारी तैलाभिषेक करण्यात आला. पहिल्या दिवशी मानाच्या सातही नंदीध्वजांच्या भव्य मिरवणुकीद्वारे मंगलमय वातावरणात तैलाभिषेक करून सायंकाळी मानाचे सातही नंदीध्वज विसावले.

रविवारी सकाळी नऊ वाजता उत्तर कसबा येथील हिरेहब्बू यांच्या वाड्यात मानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या नंदीध्वजाची पूजा मानकरी हिरेहब्बू परिवारातील राजशेखर हिरेहब्बू, राजशेखर देशमुख, सुधीर देशमुख तसेच सुदेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी काशीपिठाचे डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, खा.प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख, यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर मानाच्या नंदीध्वजांच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला. सर्वात पुढे पंचरंगी ध्वज होता. त्यानंतर हलग्यांचे पथक, सनई चौघडा, बग्गी, आणि बँड पथक या मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. श्रीसिद्धरामेश्वरांच्या तैलाभिषेकाची मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा अबालवृद्ध व महिला भाविकांसह तमाम सोलापूरकरांनी गर्दी केली होती. जसजशी मिरवणूक मार्गस्थ होत होती तसतशी भाविकांची गर्दी श्रीसिद्धेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी वाढत होती. नंदीध्वज हिरेहब्बू वाड्यातून बाहेर पडल्यानंतर नंदीध्वजाचे दर्शन घेण्याबरोबरच नवस फेडण्यासाठीसुद्धा सिद्धेश्वर भक्तांची मोठी रीघ लागली होती. नंदीध्वजधारकाच्या पायामध्ये चिमुकल्यांना झोपवून त्यावरून मानाचे नंदीध्वज ओलांडण्याचे नवस फेडण्यात आले. तसेच नंदीध्वजाला खोबऱ्याचा हार आणि बाशिंग बांधण्याची परंपरा असून यंदाही हार आणि बाशिंग बांधून सिद्धेश्वर भक्तांनी नंदीध्वजांचे मनोभावे दर्शन घेतले. या मिरवणुकीत बालनंदीध्वजधारक बाराबंदीच्या पोशाखात सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

अभिषेकासाठी निघालेल्या नंदीध्वजांच्या मिरवणुकीत मातीच्या घागरीत तेल गोळा करण्याची परंपरा शिवशेट्टी परिवाराला आहे. त्यानुसार योगीनाथ शिवशेट्टी यांच्याकडे भाविक तेलाभिषेकासाठीचे तेल अर्पण करत होते. दुपारी मिरवणूक सिद्धेश्वर मंदिरात आल्यानंतर तेथे पहिल्या अमृत लिंगाजवळ शिवलिंगाला पहिला अभिषेक करून मिरवणूक मार्गस्थ झाली. पहिला अभिषेक झाल्यानंतर मानकऱ्यांना मानाचा विडा देण्यात आला. तत्पूर्वी मानाच्या सातही नंदीध्वजांची मिरवणूक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जुन्या फाटकाजवळ आल्यानंतर राजशेखर देशमुख, सुधीर देशमुख, सुदेश देशमुख यांच्या हस्ते मानकरी हिरेहब्बू यांना फेटा व उपरणे घालून सरकारी आहेर करण्यात आला. ब्रिटिश काळापासून सरकारच्या वतीने याच ठिकाणी आहेर देण्याची परंपरा आहे. शनिवारी नंदीध्वज रात्री उशिरा पोहोचले. सोमवारी दुपारी सिद्धेश्वर मंदिर परिसरातील संमती कट्ट्यावर श्रीसिद्धेश्वर महाराजांचा अक्षता सोहळा पार पडणार आहे.

### आज अक्षतांचा वर्षाव

भोगी दिवशी सकाळी नऊ वाजता यात्रा प्रमुख व पूजारी हिरेहब्बू यांच्या वाड्यातून हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होऊन मिरवणुकीने सिध्देश्वर मंदिरात अक्षता सोहळ्यासाठी संमती कट्याजवळ दाखल होतात. येथे सातही नंदीध्वज आल्यानंतर श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंडाच्या साक्षीने सुगडी पूजा हिरेहब्बू व देशमुख करतात. त्यानंतर कुंभार यांना हिरेहब्बू यांच्या हस्ते विडा दिला जातो. त्यानंतर श्री तम्मा शेटे संमती मंगल अष्टक हे हिरेहब्बू यांच्या स्वाधीन करतात. व त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख त्या संमतीची विधिवत पूजा करतात. हिरेहब्बू हे शेटे यांना विड्याचा मान देतात. त्यानंतर हिरेहब्बू ते संमती मंगल अष्टक तम्मा शेटे यांच्या स्वाधीन करतात ही रुढी परंपरा चालत आलेली आहे. त्यानंतर हिरेहब्बू देशमुख व तम्मा शेटे संमती कट्टयावर येऊन त्याठिकाणी श्री तम्मा शेटे संमती वाचन करतात. सत्यम सत्यम... दिड्डुम... दिड्डुमचा असा उच्चार होताच चारही दिशांनी अक्षतांचा वर्षाव सिद्धेश्वर महाराज आणि मानाच्या नंदीध्वज यांच्यावर होतो. अशाप्रकारे अक्षता सोहळ्याचा धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न होतो. त्यानंतर सातही नंदीध्वज अमृतलिंगाजवळ येतात. त्याठिकाणी हिरेहब्बू व शेटे यांच्या हस्ते अमृत लिंगाची पंचामृत अभिषेक करून विधिवत पूजा होते. त्यानंतर शेटे यांना हिरेहब्बू हे विडा देतात व इतर मानकऱ्यांना विड्याचा मान दिला जातो. त्यानंतर श्रीसिध्दरामेश्वरांच्या गदगीस अभिषेक करून हिरेहब्बू हे विधिवत पुजा करतात. तेथील विड्याचा मान तम्मा शेटे यांना दिला जातो. व पुन्हा नंदीध्वज ६८ लिंगास प्रदक्षिणा घालून परत हिरेहब्बू यांच्या वाड्यात परत येतात.



**शहरात ठिकठिकाणी सुहासिनींकडून नंदीध्वजाचे औक्षण करण्यात आले.**



**नंदीध्वज मिरवणुकीत बालगोपालांना बाराबंदी पोशाखात फेटा बांधताना.**



**सोलापूर : यात्रा कालावधीत नंदीध्वज मिरवणुकीत सलग ७० वर्षे नंदीध्वज मिरवणुकीचे नियंत्रण करणारे सेवेकरी.**

## ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेसाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त

### १९ ठिकाणी फिक्स पॉईंट असणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रा निमित्त १२ ते ३१ जानेवारी या कालावधीत सिद्धेश्वर महाराजांची महायात्रा होणार आहे.यातील १२ आणि १६ जानेवारी हे दिवस यात्रेचे महत्त्वाचे धार्मिक दिवस असून, या कालावधीत शहरातून सात ही नंदीध्वजाची मिरवणूक निघते. याच पार्श्वभूमीवर पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलिस निरीक्षक,सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार यांच्यासह पुरुष आणि महिला होमगार्ड यांचा तगडा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

दरम्यान, श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील १२ आणि १६ जानेवारी हे मुख्य दिवस आहेत.या कालावधीत महाराष्ट्रासह, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा येथून चार ते पाच लाख भाविक येतात.

**पोलिस आयुक्तालय सोलापूर शहर यांच्याकडून असा असेल बंदोबस्त**

३- पोलीस उपायुक्त, ५ सहाय्यक पोलीस आयुक्त, २१ पोलीस निरीक्षक, ७३ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १३०० पोलीस अंमलदार आणि ६०० पुरुष व महिला होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### फिक्स पॉईंट आणि बंदोबस्त

शहरात १९ ठिकाणी फिक्स पॉईंट असतील. तसेच मंदिरांच्या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला आहे. मिरवणूक मार्गावरील बंदोबस्त, पालखी बंदोबस्त, मिरवणूक मार्गावरील संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त असेल. शहर वाहतूक शाखेकडीलही बंदोबस्त असणार आहे. दामिनी पथकाचीही असेल नेमणूक.

## मुस्लिम बांधवांच्यावतीने मानाच्या सात नंदीध्वजांवर पुष्पवृष्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवरी-**

मराठा सेवा संघ प्रणित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही विजापूर वेस येथील चौकात मानकरी आणि मानाच्या सात काठ्या आणि पालखीवर पुष्पवृष्टी करत आपली दरवर्षीची परंपरा जपली.

हिंदू मुस्लिम एकता टिकावी, जातीय तेढ वाढू नये, समतेचा संदेश जावा यासाठी दरवर्षी मराठा सेवा संघ प्रणित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने हा उपक्रम राबविण्यात येतो. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज त्यांची यात्रा सध्या सुरू असून आज ६८ लिंगाच्या तेलाभिषेकसाठी मानाचे साथही नंदीध्वज हिरेहबू वाड्यातून निघाले होते. दरम्यान विजापूर वेस येथून जाताना सातही नंदीध्वजाचे छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून स्वागत करण्यात आले. या वेळी अध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, राजू हुंडेकरी, तन्वीर गुलजार, बशीर सैय्यद, गफुर शेख, लक्ष्मण भोसले, रिजवान शेख, सादिक मुजावर, अनिल उकरांडे, मुख्तार लालकोट, रियाज पैलवान, सरफराज शेख, मौला शेख व छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे मावळे उपस्थित होते.



**सोलापूर : रविवारी सकाळी श्री सिध्देश्वर यात्रा नंदीध्वज मिरवणूकत विजापूर वेस परिसरात मुस्लीम समाजबांधव गुलाब फुलांचा वर्षाव करत स्वागत केले.**

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेला प्रारंभ झाला आहे. तैलाभिषेकासाठी मानाची पालखी व सात ही नंदीध्वज यांचे स्वागत करण्याचे भाग्य लाभले. या माध्यमातून समाजामध्ये एकात्मता आणि समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न आहे. हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये एकात्मतेची भावना रुजवण्यासाठी नेहमीच प्रत्येक उपक्रमात कार्यक्रमात सहभागी होतो. यापुढे देखील असे उपक्रम घेऊन समतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणार आहोत.

**- मतीन बागवान, शहराध्यक्ष छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेड.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# साखर मालवाहतुकीतून सोलापूर रेल्वे विभागाला ७० कोटींचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या समाप्तीला तीन महिने शिल्लक असताना साखरेच्या लोडिंग मध्ये लक्षणीय वाढ साधली आहे, मालवाहतुकीत झालेल्या या वाढीमुळे कृषी व्यापाराला चालना मिळत आहे. साखर मालवाहतुकीतून सोलापूर रेल्वे विभागाला ७० कोटींचे उत्पन्न मिळाला आहे.

साखरेच्या लोडिंग मध्ये वाढ झालेला तपशील पुढीलप्रमाणे - वाढलेले रेक लोडिंग - रेल्वे विभागाने एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन तिमाहीत साखरेचे १०८ रेक लोड केले. महसुलात वाढ - साखर लोडिंगमधून आर्थिक वर्ष एप्रिल २०२४ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत जवळपास ७० कोटी रुपये मिळाले आहेत. सोलापूर रेल्वे विभागातील अरग, लातूर, कुर्डूवाडी, पंढरपूर, ताज सुलतानपूर, तिलाटी, सोलापूर या मालधक्क्यावरुन आसाम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंड या राज्यांमधील विविध ठिकाणी साखर वाहतूक केली जाते. साखर मालवाहतुकीत वर दिलेली सोलापूर रेल्वे विभागातील स्थानके महत्त्वाचे केंद्र म्हणून काम करतात आणि या आवश्यक वस्तूचे विस्तृत बाजारपेठेत वितरण करण्यास मदत करतात. अशा प्रकारची मालवाहतूकचे जाळे आणखी वाढवण्यासाठी सोलापूर विभाग कटिबद्ध आहे. साखर लोडिंगमध्ये झालेली हि वाढ सोलापूर विभागाच्या कार्यक्षम नियोजन, पायाभूत सुविधा आणि भागधारकांशी असणाऱ्या मजबूत समन्वयाचा पुरावा आहे. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांना पाठिंबा देण्यासाठी सतत प्रयत्न करून, सोलापूर विभाग हा स्थानिक प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. तरी सोलापूर रेल्वे विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या सर्व साखर कारखान्यांनी सोलापूर रेल्वे विभागाच्या साखर वाहतूक करणाऱ्या मालधक्क्याचा वापर करून या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी केले आहे.

# ४० जोडप्यांनी केले जिजाऊंना अभिवादन

## आंतरराष्ट्रीय जिजाऊ जन्मोत्सवात सोलापूरच्या जोडप्यांचा सहभाग

## छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करुन मार्गस्थ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

मराठा सेवा संघाच्या वतीने सिंदखेडराजा येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर जिजाऊ जन्मोत्सवाचे आयोजन केले जाते. या जिजाऊ सोहळ्यामध्ये सहभागी होत सोलापूर शहरातील ४० जोडप्यांनी शनिवारी दोन विशेष गाड्यांनी सिंदखेड राजाला रवाना होऊन जिजाऊ माँसाहेबांना अभिवादन केले.

दरवर्षी मराठा सेवा संघातर्फे सिंदखेडराजा येथे आंतरराष्ट्रीय स्थळावर जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. या जन्मोत्सव सोहळ्यामध्ये महाराष्ट्रासह देशभरातील जगभरातील जिजाऊ भक्त व शिवप्रेमी लाखोच्या संख्येने सहभागी होत असतात. गेली दोन वर्ष कोरोना महामारीच्या विळख्यात सापडला होता. त्यामुळे हा जन्मोत्सव मर्यादित स्वरूपात साजरा केला जात होता. मात्र यंदाचा जिजाऊ जन्मोत्सव सोहळा भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरा करण्याचा निर्णय मराठा सेवा संघाच्या वतीने घेण्यात आला. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर त्यांच्या आदेशानुसार सर्व मराठा सेवा संघाच्या शाखांच्या बैठकांचे नियोजन करून जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यासाठी पती-पत्नी अशा जोडीने सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार मराठा सेवा संघाच्या प्रत्येक आपल्या शहरातून महिलांचा सहभाग वाढावा म्हणून नियोजन केले. पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख आणि सोलापूर शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी नियोजन केले होते. छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करून जय जिजाऊचा नारादेत जिजाऊ भक्त सहभागी झाले कोषाध्यक्ष आर. पी. पाटील, लक्ष्मण महाडिक, सदाशिव पवार, प्रकाश ननवरे यात्रेची नियोजनाची जबाबदारी पूर्ण केली.

> जिजाऊचा जन्म जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे १२ जानेवारी १५९८ रोजी झाला. हे जिजाऊंचे जन्मस्थळ मराठा सेवा संघाच्या माध्यमातून ऐतिहासिक स्थळ म्हणून पुढे आणले जात आहे. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जिजाऊ जन्मसृष्टीची निर्मिती सिंदखेड राजा येथे केली जात आहे.या मागची भूमिका आहे त्यामुळे प्रतिवर्षी जिजाऊ महासाहेबांचा जन्मदिन आणि लाखोंच्या उपस्थितीमध्ये साजरा केला जातो.

# संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

## अलक: (१९) महात्मा गांधी

१९३४ सालच्या डिसेंबर मध्ये वर्धा येथे संघाचे शिबिर होते. एकूण पंधराशे स्वयंसेवक होते. या शिबिराजवळच्या जागेवर महात्मा गांधीजींचा सत्याग्रहाश्रम होता. म. गांधींनी स्वतःहून शिबिराला भेट दिली होती. आणि अहो आश्चर्यम्- संघाचा तो सैनिकी पद्धतीचा तळ, स्वयंसेवकांच्या राहण्याच्या छपऱ्या, गणवेशधारी स्वयंसेवक, त्यांची वृत्ती, स्वयंपाकघर व तिथली स्वच्छता, घराघरातून आलेल्या पोळ्यांचा ढीग, सर्व जातींचे एकत्रित जेवण व संघाचा बँड पाहून महात्मा गांधी अवाक् झाले व नकळत पण उत्स्फूर्तपणे म्हणाले उभ्या देशातून असे प्रभावी दृश्य मी याआधी पाहिले नाही. त्यांनी मुद्दामून प्रवेश रजिस्टर पाहिले. त्यात जातीचा उल्लेख देखील नव्हता. याची आठवण त्यांनी १६ सप्टेंबर १९४७ च्या शिबिरात आवर्जून केली होती हे विशेष.

**क्रमशः**



## आदर्श बालक मंदिरात नृत्य कलाविष्काराचे सादरीकरण

**सोलापूर, दि. १२ जानेवारी -**

शिवाजी नगर, मोदी येथील आदर्श बालक मंदिर या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. या स्नेहसंमेलनास लेखक व दिग्दर्शक किरण लोंढे, नाट्य कलावंत सुशांत कुलकर्णी, संस्था अध्यक्षा शामला गायकवाड, संस्था सचिव अरुणराव गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुनिता गायकवाड, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन सांगळे, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक औदुंबर धोत्रे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रथमतः शाळेतील बालवाडी ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी श्री सिद्धरामेश्वर काठी व सर्वधर्म समभाव देखाव्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पालक वर्ग शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## शेती महामंडळाच्या जमिनींच्या अद्यावत माहितीसाठी जिओ टॅगिंग करावे : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१२ जानेवारी-**

शेती महामंडळाच्या जमिनीची व संयुक्त शेती क्षेत्राची सद्यस्थिती व अद्ययावत माहिती महामंडळाकडे असावी, यासाठी या जमिनीचे जिओ टॅगिंग करण्यात यावे व या कामाला प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे आयोजित बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आ. योगेश टिळेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक किशोर तावडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी रुपाली आवले यावेळी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या विविध जिल्ह्यांमध्ये जमिनी आहेत. या जमिनीची सद्यस्थितीचा आढावा घेता यावा, जमिनीवर झालेले अतिक्रमण याची अचूक माहिती प्रशासनाकडे असणे आवश्यक आहे. यासाठी महामंडळाच्या जमिनींचे जिओ टॅगिंग करणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने या जमिनींचे जिओ टॅगिंग करण्यास प्राधान्य द्यावे. शेती महामंडळाचे कार्यकारी संचालक तावडे यांनी बैठकीमध्ये महामंडळाच्या जमिनींची माहिती सादर केली. महामंडळाच्या ताब्यात एकूण ८५ हजार ५७३ एकर जमीन आहे. शेती महामंडळाकडे वर्ग झालेल्या जमिनीमधून आवश्यकतेनुसार विविध सार्वजनिक प्रयोजनांसाठी जमीन देण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

# श्री भगवान परशुराम चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

## दोन दिवस स्पर्धा; आठ टीम्सचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

श्री भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त येथील हरिभाई देवकरण शाळेच्या मैदानावर श्री भगवान परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठान आयोजित श्री भगवान परशुराम चषक क्रिकेट स्पर्धेचे शनिवारी (ता. ११) सकाळी सात वाजता थाटात उद्घाटन झाले. समाजातील नागरिकांनी उपस्थित राहून खेळाडूंचे प्रोत्साहन वाढवत जल्लोष केला.

स्पर्धेच्या उद्घाटनावेळी श्री भगवान परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानचे सल्लागार राम तडवळकर, रवी हलसगीकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन कुलकर्णी, उपाध्यक्ष निशिकांत खेडकर, सचिव श्रीकांत कुलकर्णी, सहसचिव रमण कुलकर्णी, सदस्य अमृता गोसावी, ड. उर्मिला जहागीरदार, बजरंग कुलकर्णी, प्रशांत कुलकर्णी, ऋषिकेश कुलकर्णी आदी उपस्थित होते. ब्राह्मण समाजातील युवकांनी एकत्र यावे. समाजातील प्रश्नांवर चर्चा करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले जावेत या उद्देशाने श्री भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त दरवर्षी क्रिकेट स्पर्धा भरविल्या जातात. दरवर्षी परशुराम जयंतीच्या आसपास या स्पर्धा भरविल्या जात होत्या. मात्र तेव्हा कडक उन्हामुळे खेळाडूंना त्रास होतो. त्यामुळे यंदा या स्पर्धा जानेवारीतच भरविण्यात आल्या आहेत. हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन झाले असून शनिवार आणि रविवार असे दोन दिवस या स्पर्धेचा जल्लोष आहे. एकूण आठ टीम्सनी सहभाग घेतला असून शनिवारी पाच सामने झाले. उर्वरित सहा सामने उद्या होणार असून सामने झाल्यानंतर लगेच बक्षीस वितरण होणार आहे. दोन दिवस खेळाडूंच्या चहा, नाष्ता, जेवणाचीही सोय प्रतिष्ठानने केली आहे. रविवारीही सकाळी सात वाजल्यापासून सामने सुरू होणार असून नागरिकांनी उपस्थित राहावे.

> **ज्येष्ठ नागरिकांसाठी आज सामना**
>
> श्री भगवान परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानकडून याच मैदानावर समाजातील ज्येष्ठ व हौशी नागरिकांचा आज (ता. १२) दुपारी दोन वाजता क्रिकेट सामना होणार आहे. कमी षटकांचा हा सामना होणार असल्याने ज्येष्ठ व हौशी नागरिकांनी सामन्यात सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रतिष्ठानने केले आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, भोगी, राजमाता जिजाऊ जयंती |
| दि. १३ जानेवारी २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - पौष | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| पौर्णिमा - (२७.५६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - शिशिर | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - आर्द्रा (१०.३७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - वैधृति (२८.३८) | |
| करण - विष्टि (१६.३६) | |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**वृषभ :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वाहन चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे. प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका. लोकप्रियता वाढणार आहे.



# राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना संभाजी आरमारतर्फे अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सालाबादप्रमाणे याही राष्ट्रमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघमचे अध्यक्ष वेणूगोपाल जिल्ला पंतलू यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी तुकाराम जाधव यांनी राष्ट्रमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाचरित्रावर विचार मांडले तसेच सोलापूरचे चार हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिसन सारडा, कुर्बान हुसेन यांच्या पुतळ्यास संभाजी आरमारच्या पदाधिकाऱ्यांचा हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गजानन जमदाडे, शशिकांत शिंदे, प्रकाश डांगे, अनंतराव नीळ, सागर ढगे, अमित कदम, राज जगताप, संतोष कदम, रेवन कोळी, राजू आखाडे, सुधाकर करणकोट, विकी ठेंगले, मल्लिकार्जुन पोतदार, मोहन येडलेल्लू, अविनाश विटकर, व्दारकेश बबलादीकर, सोमनाथ मस्के, बाळासाहेब वाघमोडे, रेखा व्हनखडे, अश्विनी गायकवाड उपस्थित होते.

# करंजकर विद्यालयाच्या इमारतीच्या नूतनीकरणाचे भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

तुळजापूर वेस चौकातील श्री करंजकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित करंजकर विद्यालयाचे लवकरच नवीन इमारत मनपा शिक्षण मंडळाची कन्नड शाळा क्र. पाच येथे स्थलांतर होत असून त्याचा शुभारंभ ष.ब्र.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते व आ. विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष निलकंठप्पा कोनापुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात शाळेच्या नूतनीकरणासाठी मदत करण्याची घोषणा आ. विजयकुमार देशमुख यांनी केली असून यापूर्वीच महास्वामीजींनी शाळेला पाच लाखांचा निधी खासदार निधीतून दिला आहे. नगरसेवक राजकुमार पाटील यांनी शाळेला बोर व मोटर बसवून देत असल्याची घोषणा केली असून सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित पाच लाखांचा निधी जमवून देण्याचा निर्धार लक्ष्मीकांत वेदपाठक राहुल बुरहाणपुरे प्रा. स्वीटी शिंदे यांनी व्यक्त केला मुख्याध्यापिका राजश्री तडकासे यांनी आभार मानले. प्रास्ताविक संतोष साठे, सूत्रसंचालन शिवाजी रानसर्जे यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थी डॉक्टर चंडक व अन्य विद्यार्थ्यांनी ५१ हजारांचा धनादेश मुख्याध्यापिका यांच्याकडे सुपूर्त केला तर अन्य विद्यार्थ्यांनी २६ जानेवारीला एकत्रित रक्कम जमा करून शाळेला दान करण्याचा निर्णय जाहीर केला. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष मल्लिकार्जुन बरडोल, अमित मद्धली, अजय मद्धली, सुशिल मद्धली आप्पासाहेब पाटील, नीता स्वामी, मनपा भूमी मालमत्ता अधीक्षक रजाक पेंढारी, कृष्णा हिरेमठ, रेड्डी, प्रसाद मसरे व १९९३ ते २०१७ या कालावधीत शिक्षण घेतलेले सर्व माजी विद्यार्थी पालक उपस्थित होते. आभार अरुणा हणमगाव यांनी मानले.

# राष्ट्रमाता जिजाऊंनी संस्काराची आदर्श शिकवण दिली : दिलीप स्वामी

## राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त कर्तृत्ववान महिलांचा गौरव



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

राष्ट्रमाता जिजाऊंनी संस्काराची आदर्श शिकवण दिली. असे मत छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देश्यीय सभागृहात जिल्हा परिषद प्रशासन व मराठा सेवा संघाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत काम करणारे कर्तृत्ववान महिलांचा गौरव जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे हस्ते करणेत आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सीईओ कुलदीप जंगम हे होते. या प्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, मराठा सेवा संघाचे जी के देशमुख, म्हाडाचे उपसंचालक अजयसिंह पवार, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी २२ कतृत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला. मराठा सेवा संघ दिनदर्शीकाचे उद्घाटन करण्यात आले. स्वागत मराठा सेवा संघाचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी पवार यांनी केले तर आभार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, कार्यकारी अभियंता नरेद्र खराडे, कास्ट्राईबचे अरूण क्षीरसागर, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष तात्यासाहेब पाटील, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचा गौरव केला. जिजाऊ जयंतीनिमित्त झेडपी मराठा सेवा संघ शाखेतर्फे विविध कार्यक्रम करण्यात आले. दि. ११ जानेवारी रोजी बहुउद्देशीय सभागृहामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद मधील सर्व जिजाऊ-सावित्री लेकींचा सन्मान करण्यात आला. मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे अध्यक्षतेखाली मराठा सेवा संघ जि.प.चे अध्यक्ष अविनाश गोडसे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांचा सत्कार करण्यांत आला तसेच रक्तदान शिबीरामध्ये ३९ जणांनी सहभाग घेतला. यावेळी मिनाक्षी जगदाळे, सोमनाथ राऊत, सुनिल कटकधोंड, टी.आर. पाटील, निलेश देशमुख, सरडे, अरूण क्षीरसागर, राजेश देशपांडे, विवेक लिंगराज, दिनेश बनसोडे, गिरीष जाधव, समीर शेख, अनुरुद्ध पवार, रामराव शिंदे, संतोष माने, अनिल जगताप, संजय बाणूर, सचिन घोडके,सचिन चव्हाण, विकास भांगे, चेतन भोसले, ऋषिकेश जाधव, वासुदेव घाडगे,विशाल घोगरे, रणजीत गव्हाणे, विठ्ठल मलपे, सचिन पवार, रोहीत घुले, संतोष शिंदे, संतोष निळ, गणेश साळुखे अभिजीत निचळ, प्रकाश शेंडगे, सर्जेराव गाडेकर, उमेश खंडागळे, सचिन खराडे, प्रसाद काशीद, जयंत पाटील, महेंद्र माने, गणेश कलुबर्मे गोपाल शिंदे, संजय चव्हाण व्ही.आर. कदम आश्विनी सातपुते, अनिता भुसारे, अनुपमा पडवळे, भारती धुमाळ, सविता मिसाळ, ज्योस्ना साठे, प्रतिक्षा गोडसे, शितल भोसले, राजश्री रोजी, छाया क्षीरसागर, अर्चना निराळी, अनिता तुपारे, सविता चव्हाण, प्रतिक्षा कांबळे राजश्री कांगरे उपस्थित होते.

> **यांचा झाला सन्मान**
>
> लेखाधिकारी रुपाली रोकडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, वैदयकिय अधिकारी डॉ. अनिसा तांबोळी, गट शिक्षणाधिकारी जयश्री सुतार, प्रशासन अधिकारी पुष्पा भड, शाखा अभियंता उषा भोसले, कनिष्ठ अभियंता सना नदाफ, विस्तार अधिकारी (पं) स्वास्ती गायकवाड, विस्तार अधिकारी (कृषी) रेखा डोके, मुख्याध्यापिका ललिता मोरे, सहशिक्षिका उर्मिला माने, जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे-पवळे, ग्राम पंचायत अधिकारी मंजुश्री कारंडे,वरिष्ठ सहाय्यक सुजाता कांबळे, वंदना जाधव, कनिष्ठ सहाय्यक आरती माढेकर, आरोग्य सेविका मैना माने, परिचर वर्षा औदुर्ती, सविता काळे यांचा सन्मान करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त



### कुस्ती स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालयाला तिहेरी पदक

**सांगोला, दि. १२ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठा, सोलापूर यांच्या वतीने के.एन.भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत सांगोला महाविद्यालयातील खेळाडू गणेश कैलास गाडे याने (फ्री स्टाईल) ६५ किलो वजन गटामध्ये तसेच विक्रमसिंह भारत भोसले याने (ग्रीको रोमन) ९७ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. या दोघांची पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सोलापूर विद्यापीठ संघामध्ये निवड झाली. तसेच परमेश्वर भैरवनाथ गाडे याने (फ्री स्टाईल) ८६ किलो वजन गटांमध्ये व्दितीय क्रमांक मिळवला. खेळाडूंना डॉ.सुरेश भोसले, प्रा. जगदीश चेडे व जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा. पी. सी. झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी अभिनंदन केले.



### भाजपा युवा मोर्चाच्या करमाळा तालुकाध्यक्षपदी शुभम बंडगर

**करमाळा, दि. १२ जानेवारी-**

करमाळा तालुका भाजपच्या युवा मोर्चा तालुका अध्यक्षपदी शुभम शिवाजीराव बंडगर यांची निवड झाली. ही निवड भाजपा युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी आ. रामभाऊ सातपुते, सोलापूर भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, सोलापूर जिल्हा संघटक सरचिटणीस शशिकांत चव्हाण, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे यांच्या हस्ते पत्र देऊन घोषणा करण्यात आली. महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल यांनी अभिनंदन केले. शुभम बंडगर हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कार्यरत असताना प्रदेश कार्यकारणी सदस्य, जिल्हा संयोजक या पदांवर असताना विद्यार्थी प्रश्नांवर ते आवर्जून आवाज उठवणे तसेच विविध सामाजिक विषयांवरती यांनी काम केले आहे. ते बाजार समितीचे माजी सभापती प्रा. शिवाजीराव बंडगर यांचे चिरंजीव आहेत.



### सांगोल्यात लोकमंगल पतसंस्था, बँकेतर्फे पत्रकारांचा सन्मान

**सांगोला, दि. १२ जानेवारी-**

सांगोला येथील लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था व बँकेतर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांचा सन्मान केला. यावेळी लोकमंगल पतसंस्थेचे पालक संचालक ॲड. गजानन भाकरे, पत्रकार प्रा. राजेंद्र ठोंबरे, दत्तात्रय पवार, ॲड. रोहित सोनवणे, निसारभाई तांबोळी, संतोष येडगे यांचा सन्मान करण्यात आला. पतसंस्थेचे विभागीय अधिकारी वैभव लांबोरे यांनी प्रास्ताविक केले. शाखाधिकारी दत्तात्रय दिवसे यांनी आभार मानले. लोकमंगल बँक, शाखा सांगोला यांच्याकडून पत्रकार दिनानिमित्त पत्रकार हमीदभाई इनामदार, अरुण लिगाडे, दीपक भाकरे, किरण लवटे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी लोकमंगल बँकेचे संचालक विजय कुलकर्णी, सल्लागार ॲड. गजानन भाकरे उपस्थित होते.



### दत्तूआण्णा पाटील विद्यालयाने गुणवंत विद्यार्थी तयार केले : आ. राम कदम

**अणदूर, दि. १२ जानेवारी-**

आई वडील हे आपले पाहिले गुरू आहेत. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना अभिमान वाटेल एवढं कर्तृत्वाने मोठं व्हावं. आपल्याला गावच्या गावाच्या मातीचा स्वाभिमान असायला हवा, स्वप्न मोठी पहा, ग्रामीण भागातील दत्तूआण्णा पाटील विद्यालयाने दर्जेदार विद्यार्थी घडवले. चिवरी गावाला या शाळेचा अभिमान असल्याचे प्रतिपादन घाटकोपर पश्चिमचे भाजपा आमदार राम कदम यांनी केले. ते चिवरी येथील दत्तूआण्णा पाटील विद्यालयात आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी घाटकोपर येथून चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने राम कदम व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षाताई कदम यांचा भव्य सत्कार करण्यात आला. राम कदम यांनी चिवरीचे प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिरासपण भेट दिली. यावेळी संस्थेचे संस्थापक पोपटराव पाटील, अध्यक्ष मनीषा पाटील, प्रतीक पाटील, चिवरीचे सरपंच पिंटू बिराजदार, उपसरपंच लबडे, मेजर विठ्ठल होगाडे, अविनाश गंगणे, धनंजय गंगणे, बालाजी पाटील, मुख्याध्यापिका लक्ष्मी बिराजदार उपस्थित होते.

# अखेर क्रीडा संकुलच्या आरक्षित जागेवरील बेकायदेशीर व्यवहार रद्द

## आरपीआय नेते दीपक चंदनशिवे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यातील मौजे कासेगाव येथील गट नंबर १४/१/अ/२/अ, या क्षेत्राबाबतची नोंदणीकृत खरेदीखत बाबतची धरण्यात आलेली फेरफार क्रमांक ३१०१२/३१०१२/३१०२६ ही नोंद सुनावणीनंतर सदर जागेवर आरक्षण असल्याचे तसेच खरेदी खत व्यवहार करताना अनेक चुकीच्या पद्धतीने माहिती देण्यात आली आहे. यामुळे बेकायदेशीर खरेदी झाल्याचे सिद्ध झाल्याने अर्जदार आरपीआय नेते दीपक चंदनशिवे यांच्या तक्रारीवरून अखेर उताऱ्यावरील फेरफार नोंद रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पंढरपूर शहर व तालुक्यातील खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

> **आता शासनाच्या वतीने गुन्हे दाखल करण्यात यावे : दीपक चंदनशिवे**
>
> या प्रकरणा मध्ये प्राधिकरणाने आरक्षित केलेला भूखंड लाटण्याचा प्रयत्न केला गेला होता, खरेदी विक्री व्यवहार करताना झोन दाखला जोडला नाही,जमिन पड असताना बागायती क्षेत्र दाखवून शासनाची फसवणूक केली आहे. याबाबत शासनाने गुन्हा दाखल करणे बंधनकारक आहे अशी मागणी तक्रारदार दीपक चंदनशिवे यांनी केली आहे.

याबाबत कासेगावचे मंडल अधिकारी पंकज राठोड यांच्या न्यायालयात झालेल्या अपिलात तक्रारी अर्जदार आणि सामनेवाला यांच्यात झालेल्या युक्तिवादानंतर अर्जदार दीपक चंदनशिवे यांनी सदर जागेवर क्रीडा संकुलचे आरक्षण असल्याचे पुरावे सादर केले. अर्जदार यांचे तक्रारी अर्ज अंशतः मान्य करण्यात आला असून सदर जागेवरील खरेदी खताबाबत धरण्यात आलेली नोंद रद्द करण्याचे तसेच सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी संपल्यानंतर

> याचबरोबर पंढरपूर प्राधिकरणाने शहराच्या आसपास असणाऱ्या १०कि.मी.अंतरावरील ४१ गावांमध्ये अनेक प्रकारचे आरक्षण टाकलेली आहेत. ती आबाधित राहिली पाहिजेत.
>
> **-दीपक चंदनशिवे, नेते, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट**

करण्यात येणार असल्याचे आदेश मंडल अधिकारी यांनी काढले आहेत.

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील जागेवर क्रीडा संकुलचे आरक्षण असताना हि या जागेची खरेदी भास्कर लक्ष्मण कसगावडे, (रा. बोहाळी, ता. पंढरपूर), बिंदू मुकुंद गावंडे (रा. पिकोने, आवरे, जि. रायगड), दत्तात्रेय दादा खिलारे (रा. कासेगाव, ता. पंढरपूर), मंजुळा राजू पवार (रा. कडबे गल्ली, पंढरपूर) व कर्मयोगी एस. आर. परिचारक मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड पंढरपूर यांनी केली होती. या केलेल्या खरेदी खताबाबतची धरण्यात आलेली फेरफार नोंद अर्जदार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) गटाचे नेते दीपक जालिंदर चंदनशिवे (रा. तिसंगी, ता. पंढरपूर) यांच्या तक्रारीवरून रद्द करण्यात आली आहे. सुनावणी नंतर याबाबतचे आदेश २६ डिसेंबर २०२४ रोजी कासेगाव मंडलाधिकारी पंकज राठोड यांनी काढले आहे.

# शिवयोग पदयात्रेचे मंद्रुपमध्ये स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १२ जानेवारी-**

मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर स्मारक जागृती अभियान आयोजित रेवणसिद्धेश्वर मंदिर येथून १० जानेवारीपासून शिवयोग पदयात्रेस श्रीशैल हत्तुरे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला आहे. ही पदयात्रा मंद्रुपमध्ये आल्यानंतर भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिद्ध मुगळे व राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अप्पाराव कोरे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी मळसिद्ध मुगळे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकाचे काम पंधरा वर्षापासून प्रलंबित आहे. सरकारडून स्मारकाचे काम पूर्ण होण्यासाठी सर्व लिंगायत शरणार्थींनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. सरकारने महात्मा बसवेश्वर स्मारकाचे काम मार्गी लावावे, अशी मागणी केली.




> **पदयात्रेसाठी देणगी**
>
> अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे सदस्य अमोल कारंडे यांनी पदयात्रेसाठी पाच हजार रुपयांची देणगी दिली.

यावेळी अप्पाराव कोरे म्हणाले की, शिवयोग पदयात्रेच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांचे समाजात सर्वधर्म समभाव विचार रूजविण्याचे काम होत आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकाविषयी जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कोरे म्हणाले. यावेळी माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, अमोल कारंडे, भाजपाचे गौरीशंकर मेंडगुदले, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमोटे, रेवणसिद्ध मेंडगुदले, गुरूनाथ जोडमोटे, सिद्धलिंग म्हेत्रे, दयानंद धनशेट्टी, अप्पासाहेब शिळ्ळे, शिवराज कालदे, मिथुन मुगळे, अनिल जोडमोटे, भीमाशंकर लच्याणे, निंगू ख्याडे यांच्यासह अनेक लिंगायत शरणार्थी उपस्थित होते. यावेळी बसवकथाकार ॲड. शिवानंद हैबतपुरे यांनी शिवयोग पदयात्रेविषयी माहिती दिली.

# मिरजगीच्या सिद्धेश्वर यात्रेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ जानेवारी-**

मिरजगी येथील ग्रामदैवत श्री. सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या प्रमाणात येणार असल्याने ग्रामस्थांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. शनिवारपासून यात्रेस सुरवात झाली असून पाच दिवस विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती महादेव निंबाळ यांनी दिली.

सोमवारी १३ रोजी रात्री आठ वाजता पालखी प्रदक्षिणा, त्यानंतर शस्त्र चडविण्याचा कार्यक्रम, मंगळवारी १४ रोजी दुपारी चार वाजता बोरी नदीवर गळोरगी, बासलेगाव आणि मिरजगी येथील श्री सिद्धेश्वर पालखी सोहळा भेट, यानंतर संध्याकाळी बासलेगाव, गळोरगी, मिरजगी येथील श्रीचा पालखी सोहळा मिरवणूक



मिरजगीत वाद्यांसमवेत येणार असून सर्व पालख्या, नंदीध्वज हनुमान मंदिराजवळ आल्यावर नंदीध्वजास फुल चढविण्याचा कार्यक्रम आणि पुरवंतस्वामींचा कार्यक्रम होणार आहे. रात्री आठ वाजता होमहवन करून अक्षता सोहळा होणार आहे. उत्सवानंतर रात्री शोभेचे दारुकाम व होम यज्ञाचा शुभारंभ मानाचे संजय देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ११ वाजता प्रसिध्द कन्नड नाटक होणार आहे.



# मंगळवेढ्यात महिलांची खरेदीसाठी गर्दी; मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर लगबग

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जानेवारी-**

मंगळवेढा शहरात मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर महिलांनी विविध संक्रांती सणासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी जुन्या पोलिस स्टेशन समोरील मैदानात मोठी गर्दी केल्याचे चित्र आहे. दरम्यान यंदा संक्रांतीसाठी लागणाऱ्या सुगड वाणाच्या किंमतीत कुठलीही वाढ झाली नसल्याचे विक्रेत्याकडून सांगण्यात आले.

मंगळवार दि.१४ रोजी देशभरात मकर संक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असून हा सण प्रामुख्याने महिलांचा म्हणून आजतागायत ओळखला जातो. या सणाच्या पार्श्वभूमीवर जुन्या पोलिस स्टेशन परिसरात लुटण्यासाठी लागणारे सुगड वाण, बांगड्या, चुडे, हालवा, पान, तीळ व अन्य साहित्य विक्रीसाठी व्यवसायिकांनी ठेवले आहे. मकर संक्रांतीचा सण दोन दिवसावर येऊन ठेपल्याने महिलांची खरेदीसाठी मोठी गर्दी बाजारपेठेत झाल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर हा एकमेव महिलांचा सण असल्यामुळे महिलांनी विविध प्रकारच्या साड्या, इरकल, सोन्याचे दागिने आदी ठिकाणीही खरेदीसाठी महिला जात असल्याचे चित्र होते.

मकर संक्रांतीला महिलांना घरी बोलावून हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेत साहित्य लुटण्याची प्रथा असल्याने लुटण्यासाठी विविध साहित्य खरेदी करताना निदर्शनास येत होते. नुकत्याच विवाह झालेल्या नववधूही या सणासाठी माहेरी आल्या आहेत. महिलांना पूजेसाठी पाच वाणाची गरज असते. या पाच वाणाची किंमत यंदाही पन्नास रूपये ठेवण्यात आली आहे.

# कुलकर्णी दांपत्याकडून मैत्र फाउंडेशनला वाहन भेट




**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १२ जानेवारी-**

डीएसके विश्व धायरी, पुणे येथील निवृत्त प्रा. डॉ. रघुनाथ वामन कुलकर्णी व मीनल रघुनाथ कुलकर्णी यांनी आई-वडीलांच्या स्मरणार्थ मैत्र फाउंडेशन या बौद्धिक दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थेस मारुती सुझुकी इको गाडी भेट दिली.

मैत्र फाउंडेशन ही संस्था प्रामुख्याने बौद्धिक दिव्यांग व्यक्ती आणी त्यांच्या पालकांसाठी काम करते. करकंब येथे प्रौढ दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी दिशा हे युद्योगकेंद्र चालवले जाते. करकंब व परिसरातील दिव्यांग या केंद्रात काम करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु अश्या व्यक्तींना केंद्रात ने-आण करण्यासाठी वाहनाची नितांत आवश्यकता होती. ती गरज ओळखून कुलकर्णी दांपत्याने संस्थेला ही ७ आसनी गाडी भेट दिली.

डॉ. रघुनाथ कुलकर्णी हे मॉडेल कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. सामाजिक जाणीवेतून, सामाजिक कामासाठी त्यांनी केलेली मदत अभिनंदनीय व अनुकरणीय आहे. प्रा. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे उपाध्यक्ष अरुण लोहकरे यांनी अभय नलगे, तेजस कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे सांगितले. याप्रसंगी मैत्र फाउंडेशनचे उपाध्यक्ष अरुण लोहकरे, रघुनाथ कुलकर्णी, मीनल कुलकर्णी, सलोनी लोहकरे, प्रा. अशोक कांबळे उपस्थित होते.

# मंद्रुपच्या खरबूजाचा दिल्लीत रुबाब

## युवा शेतकऱ्यांनी थंडीत करून दाखविले; दोन महिन्यांत घेतले पाच लाखांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. १२ जानेवारी-**

अनेक शेतकरी अधिक पाणी व रासायनिक खतांचा वापर करून बारा ते तेरा महिन्यानंतर ऊस घेण्याच्या मानसिकतेत आहेत. ऋतुमानानुसार विविध फळफळावळे व भाजीपाला उत्पादन घेऊनही अनेक शेतकरी फायद्यात आहेत. मात्र मंद्रुपमधील दोन युवा शेतकरी बंधूंनी उसाला पर्याय म्हणून खरबूज फळ निवडले. भरपूर उत्पन्न घेतले आणि त्याचा रुबाब दिल्लीच्या बाजारात वाढला आहे. दिल्लीतून मोठ्या प्रमाणात मागणीही वाढली आहे.

थंडीच्या दिवसात खरबूजचे उत्पादन घेणे मुश्किल आहे, याची कल्पना असतानाही पीक फेरबदल म्हणून त्यांनी खरबूजचे उत्पादन घ्यायचे ठरविले. यासाठी त्यांना बियाणे उत्पादन कंपनीत काम करणारे राजेंद्र माने, औंढीचे विजय वाघमोडे व बाणेगावचे आशिष पांढरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी बॉबी या खरबूज वाणाची सविस्तर माहिती घेतली. त्यावेळी दोन्हीही बंधूंनी शेतात गावखत टाकून शेतीची मशागत केली. त्यानंतर महिला मजुरांच्या सहाय्याने बॉबी फळाची लागवड केली. यावेळी लागण केल्यानंतर वारंवार लक्ष देऊन त्याच्यावर रोगांचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घेतली.



> **मागणी कमी असल्याने फायदा कमी**
>
> थंडीमध्येही उत्तर भारतात खरबूजला अधिक मागणी असते. मात्र यावर्षी वातावरण बदलामुळे खरबूजची मागणी कमी आहे. प्रतिकिलो चाळीस ते पन्नास रुपये किलोने विकणारा खरबूज मागणी कमी असल्याने फायदा कमी मिळाला आहे.
>
> **- मळसिद्ध शेंडगे, शेतकरी, मंद्रुप**

> **पहिल्या प्रयत्नात यश**
>
> थंडीच्या दिवसात बॉबी खरबुजाचे उत्पादन घेणे अवघड असते. मात्र संजय शेंडगे व बाळासाहेब शेंडगे यांनी विशेष लक्ष देऊन रोगांवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे अनेक ठिकाणी खरबूजची बाग नुकसानात असताना आम्ही वैयक्तिक लक्ष दिल्याने दोन महिन्यात तीन लाखांचा फायदा मिळाले.
>
> **- मलकारसिद्ध शेंडगे, शेतकरी, मंद्रुप**

थंडीत बुरशी, करपा व दावण्या यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव असताना मलकारसिद्ध व मळसिद्ध शेंडगे यांनी विशेष लक्ष देऊन खरबूजवर कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव होणार नाही, याची दक्षता घेतली. त्यासाठी त्यांनी वेळोवेळी कीटकनाशक व बुरशीनाशक औषधाची फवारणी केली. ६० दिवसानंतर फळ तोडणीस आल्यानंतर त्याची बाजारात माहिती दिली. त्यानंतर व्यापाऱ्यांनी त्यांना प्रति किलो २२ रुपये दर दिला. ६० दिवसांत त्यांना दोन एकर क्षेत्रातील २५ टन खरबुजाचे उत्पादन निघाले. या खरबुजासाठी एकरी एक ते सव्वा लाख रुपये खर्च आला असून दोन एकरसाठी अडीच लाख रुपये खर्च आला आहे. सर्व खर्च जाऊन दोन महिन्यात तीन लाखांचा फायदा या शेतकऱ्यांना मिळाला आहे. मंद्रुपमधील या युवा शेतकऱ्यांचे खरबूज दिल्ली येथील बाजारपेठांत विक्रीसाठी पाठवले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संभाजी ब्रिगेडच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ जानेवारी-**

संभाजी ब्रिगेडच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ चौकामध्ये जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे बार्शी तालुकाध्यक्ष आनंद काशीद यांनी जिजाऊंचे प्रेरणा घेऊन आजच्या महिला, मुलींनी सक्षम व निर्भय होणे गरजेचे आहे. जिजाऊ मॉसाहेबांचा विचार



हा डोक्यात घेऊन जगातील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मुलींनी आपला ठसा उमटवणे गरजेचे आहे. संकट ही सर्वांनाच असतात त्या संकटावरती मात करण्याची प्रेरणा ही जिजाऊ मॉसाहेबांपासून घेतल्यास जगातील कोणत्याही संकटावर मात करायचे ताकद निर्माण होऊ शकते, असा विचार यावेळी आनंद काशीद यांनी व्यक्त केला. या जिजाऊ पूजनप्रसंगी विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष पांडुरंग घोलप, विक्रम घाईतिडक, रणजीत पाटील, मनोज शिंदे, गणेश भोसले, राजवीर काशीद, रणवीर काशीद यांच्यासह तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका कार्यकारिणी निवड प्रक्रियेला सुरुवात

**करकंब, दि. १२ जानेवारी-**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठे यश मिळाले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू करण्यात आली असून त्या अनुषंगाने राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे पंढरपूर तालुकाध्यक्ष साहिल शेख यांनी तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली असल्याची माहिती दिली. विधानसभा निवडणुकीच्या आगोदर अजित दादांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात येत होते परंतु विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रातील मतदार घड्याळाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे चित्र सगळीकडे पाहावयास मिळाले.त्यामुळेच तालुक्यातील अनेक युवक, विद्यार्थी पक्षात काम करण्यासाठी इच्छुक आहेत. पंढरपूर तालुक्यात कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस भक्कमपणे उभी करण्यासाठी निवड प्रक्रिया सुरू करण्यात येत असून इच्छुकांनी दि.२५ जानेवारी २०२५ पर्यंत इच्छुकांनी आपली माहिती ७२७६२२५०५५, ८८५५९१५२९५ या व्हाट्सअप क्रमांकावर पाठवण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष साहिल शेख यांनी केले आहे.



### श्री शंकरलिंग प्रशालेत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती, हुतात्मा दिन साजरा

**वळसंग, दि. १२ जानेवारी-**


वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत राजमाता जिजाऊ, युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती व हुतात्मा दिन संपन्न झाला. याप्रसंगी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांच्या प्रतिमेचे पूजन विजयालक्ष्मी थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, शिक्षक सिध्दाराम भैरामडगी यांनी करून अभिवादन केले. पूजनानंतर प्रशालेतील काही विद्यार्थी व विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संतोष कस्तुरे, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, अजय माणकोजी, गंगा बागलकोटी, वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.



### बार्शीच्या श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात राजमाता जिजाऊ मॉंसाहेब, स्वामी विवेकानंद जयंती

**बार्शी, दि. १२ जानेवारी-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी येथे आज रविवारी सकाळी ११ वाजता हिंदवी स्वराज्य संकल्पक राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉंसाहेब भोसले आणि आधुनिक भारताचे अध्यात्मिक गुरु व तरुणांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले व राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धीरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ मासाहेब भोसले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे, सेवक रेखा यादव,वाचनालयाचे वाचक वर्ग व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ यांनी केले तर आभार वाचनालयाचे संचालक धीरज कुंकूलोळ यांनी मानले.



### रत्नत्रय प्री-स्कूलमध्ये शुभेच्छा समारंभ

**नातेपुते, दि. १२ जानेवारी-**

रत्नत्रय प्री स्कुल व स्पर्धा परीक्षा अकॅडमी दहिगावमध्ये जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा समारंभ, रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीने दहिगाव परिसरातील चौथीच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक क्षमता व कल चाचणीचा निकाल आणि विद्यार्थी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रमोद दोशी, रोनक चंकेश्वरा, मुख्याध्यापक सतीश हांगे, सदस्य अमित गांधी, अमृतलाल गांधी, अमित गांधी, आयटीआयचे प्राचार्य गजेश जगताप, शिवराम नाळे, निलेश शेंडे, गणेश खंडागळे, पूजा चव्हाण, शुभांगी सावंत, आगतराव किर्दक, सुभाष शिरतोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन सतीश हांगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शुभांगी सावंत यांनी केले.



**आंब्याला मोहोर...**

सदाशिवनगर : मोहोराने बहरलेली मोटेवाडी (ता. माळशिरस) येथील स्वप्निल दडस यांची आंब्याची बाग.



**कणसाची राखरांगोळी...**

सांगोला : शनिवारी दुपारी सव्वादोनच्या सुमारास लक्ष्मीनगर (ता. सांगोला) येथील कांतीलाल मारुती नरळे यांची काढणी केलेली मक्याची कणसे शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाली.

## वाशिंबे-पारेवाडीदरम्यान चेन्नई एक्सप्रेसवर तुफान दगडफेक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १२ जानेवारी-**

वंदे भारत सुपरफास्ट एक्सप्रेसवर गुरुवारी (दि.२) रोजी रात्री ९.२०दरम्यान जेऊर-कुईवाडी सेक्शनमध्ये भाळवनी नजीक अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केलेली घटना ताजी असतानाच वाशिंबे ते पारेवाडी स्थानकादरम्यान शनिवारी रात्री ७ च्या दरम्यान गाडी क्रमांक २२१५९ चेन्नई एक्सप्रेसवर अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे.

त्यामुळे प्रवाशांत भीतीदायक वातावरण निर्माण झाले आहे. दगडफेकीत गाडीची काच फुटली आहे. यामध्ये अनिकेत लहामुने (रा. उपळा, ता. धाराशिव) या प्रवाशांस किरकोळ इजा झाली असून यात इतर कुणी गंभीर जखमी नसल्याची माहिती मिळत आहे. या संदर्भात पुणे नियंत्रण कक्षाशी ऑनलाईन तक्रार केल्याचे लहामुने यांनी सांगितले.

**दगडफेकीत खिडकीची काच फुटली**

दगड मारल्यामुळे चेन्नई एक्सप्रेसच्या विकलांग कोचमधील खिडकीची काच फुटली आहे. या घटनेत इतर प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही. मागील आठवड्यात वंदे भारत एक्सप्रेसवर व सद्या चैन्नई एक्सप्रेसवर दगडफेकीची घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वंदे भारत एक्सप्रेसवर दगडफेक झाल्याची घटना ताजी असताना चेन्नई एक्सप्रेसवर दगडफेक झाल्याची घटना ही अतिशय गंभीर बाब असून प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाने याची दखल घेऊन कसून तपास करुण दगडफेक करणारांचा छडा लावून कडक कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच पोलीस प्रशासनाने भाळवनी ते जिंती दरम्यान गस्त वाढवून अशा घटना पून्हा होणार नाहीत. यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**- संजय पाटील, अध्यक्ष, प्रवासी सेवा संघ, सोलापूर**

## तैलाभिषेकाने मंद्रुपच्या मळसिद्ध यात्रेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १२ जानेवारी-**

मंद्रुपच्या मळसिद्ध देवाची यात्रा १२ जानेवारी रोजी दुपारी बारा वाजता नंदीध्वजाची मिरवणूक काढून व गावातील देवतांना तैलाभिषेक करून यात्रेस सुरुवात करण्यात आली.



सोमवारी १३ जानेवारी रोजी भोगी व सायंकाळी पाच वाजता औदुसिद्ध महाराज व निरंजन देवरु यांच्या उपस्थितीत अक्षता सोहळा कार्यक्रम, मंगळवार १४ जानेवारी रोजी आलमेलचे बसवराज तळवार व अथनीचे लक्ष्मीबाई पुजारी यांचे कलगीतुऱ्याचे गाणे, रात्री नंदीध्वजांची मिरवणूक व होम कार्यक्रम तसेच मळगालसिद्ध गायन संघ व बीरलिंगेश्वर गायन संघ यांच्यात डफावरील गाण्याचा कार्यक्रम. बुधवारी १५ जानेवारी रोजी सकाळी कलगीतुऱ्याची गाणे, दुपारी चार ते सहा वाजता यात्रा कमिटीचे अध्यक्ष ॲड. राजेश देशमुख यांच्या हस्ते व हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जंगी कुस्त्यांचे फड भरविण्यात येणार आहे. रात्री नऊ वाजता शोभेचे दारूकाम व रात्री दहा वाजता बेळगाव येथील 'हेण्णू संसारद कण्णू' या कन्नड सामाजिक नाटकाचे सादरीकरण होणार आहे. गुरुवारी १६ जानेवारी रोजी यात्रा कमिटी अध्यक्ष राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व औदुसिद्ध महाराज यांच्या उपस्थितीत दुपारी तीन वाजता जंगी कुस्त्यांचे फड भरविण्यात येणार आहे. रात्री दहा वाजता कोल्हापूर येथील वैभव आर्केस्ट्राचे कार्यक्रम होणार आहे. यात्रा कालावधीत भक्तांकडून महाप्रसादाची सोय करण्यात आली असून सर्व सद्‌भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा कमिटी अध्यक्ष ॲड. राजेश देशमुख यांनी केला आहे .



## बार्शीत जय शिवराय प्रतिष्ठानतर्फे ३१ मुलींना सुकन्या योजनेचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ जानेवारी-**

मॉंसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने ३१ मुलींच्या नावे जय शिवराय प्रतिष्ठानच्या मॉंसाहेब जिजाऊ सुकन्या योजनेअंतर्गत प्रत्येकी ५०० रुपये भरुन खाते सुरु करण्यात आले व त्या खात्यांचे पासबुक वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मुलींच्या शिक्षणासाठी व पुढील भविष्यासाठी हे खाते सुरु करण्यात आले. गेल्या पंधरा दिवसांमध्ये अनेक गरजू मुलींची परिस्थिती जाणून त्यातील ३१ गरजू मुलींचा या योजनेत सहभाग घेऊन त्यांच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता संघटनेच्या माध्यमातून पोस्ट ऑफिसमध्ये करुन प्रत्येक खात्यात ५०० रुपये जमा करुन हे खाते सुरु करण्यात आले. मॉंसाहेब जिजाऊ व थोर महापुरुषांच्या विचारांचा वारसा या कार्याच्या माध्यमातून समाजात रुजवण्याचे संघटनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भविष्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात या योजनेमध्ये मुलींचा सहभाग घेतला जाईल, असे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मॉंसाहेब जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर विविध मान्यवरांचे मनोगत व पासबुक तसेच माहितीपत्रक वितरण करुन कार्यक्रम संपन्न करण्यात आला. यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत, एएसआय सिंधूताई देशमुख, ॲड. राजश्री डमरे-तलवाड, शैलजा गीते, संतोष बारंगुळे, रवीअण्णा राऊत, गोरख यादव, माधवराव देशमुख, सचिन वायकुळे, बाबासाहेब कापसे, अमृत राऊत, कुमार डमरे, उमाकांत राऊत, महेश देशमुख, किरण कोकाटे, अजय पाटील, ॲड. गणेश हांडे, धीरज शेळके, बालाजी, कानगुडे, पोस्ट अधिकारी राहुल जाधव, रविंद्र बगाडे, अजित नडगिरे त्याचबरोबर सर्व शिवभक्त व जय शिवराय प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.

## ऑनलाईन शिधापत्रिकेचा सर्व्हर गेल्या पाच महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ जानेवारी-**

शासनाने स्वस्त धान्य दुकानातून पारदर्शक पद्धतीने नागरिकांना धान्य मिळावे म्हणून शिधापत्रिका ऑनलाईन केल्या. तसेच धान्य वाटपसुद्धा मशिनचा उपयोग करुन केला खरे. पण यामध्ये सर्व्हर बंद असल्याने धान्य वाटपातही अडचणी येत आहेत. त्याचबरोबर नागरिकांना ऑनलाईन शिधापत्रिका सुद्धा नागरिकांना मिळेनात.

कारण गेल्या सप्टेंबर महिन्यांपासून शिधा पत्रिका ऑनलाईन पद्धतीने काढणे पूर्णपणे बंद आहे. कारण यासाठी असणारा सर्व्हरच गेल्या सप्टेंबर महिन्यांपासून बंद आहे. यामुळे नागरिकांना पुरवठा विभागाकडून ऑनलाईन शिधापत्रिका मिळणे पूर्णपणे बंद आहे. यामुळे पुरवठा विभागात अक्षरशः कागदपत्रांचा ढीग लागले आहे. नवीन शिधापत्रिका, नाव वाढविणे, नाव कमी करणे असे कोणतेही काम गेल्या पाच महिन्यांपासून बंद आहे. यामुळे नागरिक तसेच विद्यार्थी यांना वेगवेगळे दाखले काढणे, इतर शासकीय कामांसाठी किंवा अगदी लाडकी बहीण योजना असेल अशा अनेक शासकीय कामांसाठी शिधापत्रिका आवश्यक असा महत्त्वाचा पुरावा आहे. पण गेल्या पाच महिन्यांपासून ऑनलाईन सर्व्हरच बंद आहे. यामुळे नागरिक गेल्या पाच महिन्यांपासून महाई-सेवा केंद्र तसेच तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाकडे ऑनलाईन शिधापत्रिका मिळविण्यासाठी हेलपाटे मारीत आहेत. पत सर्व्हर बंद असल्याने नागरिक अक्षरशः वैतागले असून यामुळे विद्यार्थी, नागरिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. शिधापत्रिकेसाठी आवश्यक असणारा ऑनलाईन सर्व्हर बंद असला तरी बरेच एजंट तुम्हाला शिधापत्रिका मिळवून देतो म्हणून नागरिकाकडून पैसे घेत आहेत. शासनाने शिधापत्रिका संबंधित ऑनलाइन सर्व्हर ताबडतोब सुरू करावा व नागरिकांची होणारी गैरसोय ताबडतोब टाळावी अशी मागणी शिधापत्रिकाधारक नागरिकांमधून होत आहे.

**पुरवठा अधिकाऱ्यांचा होईना संपर्क**

शिधापत्रिकेविषयी निश्चित काय समस्या आहे, हे पुरवठा अधिकाऱ्यांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



## माळशिरस तालुक्यातील प्रत्येकाला भाजपाचा सदस्य करणार

**माजी आ. राम सातपुते : भाजपाचा निर्धार मेळावा**

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १२ जानेवारी-**

आगामी काळात माळशिरस तालुक्यातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती भारतीय जनता पार्टीचा सदस्य असेल असे ठाम मत माळशिरसचे माजी आ. राम सातपुते यांनी मांडले.

ते नातेपुते येथील मधुर मिलन मंगल कार्यालय येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निर्धार व सदस्य नोंदणी अभियानात ते बोलत होते. यावेळी माळशिरस तालुक्यातील भाजपाच्या ११९१ प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला होता. माळशिरस तालुक्यात भारतीय जनता पार्टीचे एक लाख सदस्य करण्याचा निर्धार असून प्रत्येक कार्यकर्त्यांनी अडीचशे सदस्य करायचे आहेत जास्तीत जास्त जो सदस्य करेल त्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत माळशिरस तालुक्यातून भाजपाला एक लाख आठ हजार एवढी मते मिळाली आहेत भाजपाच्या कार्यावर समाधानी असणारे लोक भरपूर आहेत त्यांना सदस्य करणे गरजेचे आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन भाजपाचे सदस्य बनविणे गरजेचे आहे माळशिरस तालुक्यात पंचतारांकित एमआयडीसी, निरा देवघर बंदिस्त पाईपलाईन व फलटण पंढरपूर रेल्वे हे अनेक वर्षे रखडलेली कामे लवकरच पूर्णत्वास येणार आहेत.

आगामी काळात नगरपरिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा झेंडा फडकेल असाही आशावाद व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, ,जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, हनुमंतराव सूळ, शरद मोरे, सुजयसिंह माने-पाटील, सोपानराव नारनवर, ॲड. बी. वाय. राऊत, आप्पासाहेब देशमुख, बाळासाहेब वावरे, बाळासाहेब सरगर, माळशिरसचे नूतन नगराध्यक्ष विजय देशमुख, बाजीराव काटकर, शरद मदने, संजय देशमुख, राहुल पदमन आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब सरगर, तर आभार आनंद शेंडगे यांनी मानले.



माजी आ. राम सातपुते यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने माळशिरस तालुक्यातून एक लाख आठ हजार मते मिळविली आहेत व सर्वसामान्य जनतेला आपलेसे केले आहे. माळशिरस तालुक्यातील भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळात सर्व निवडणुका लढविणार असल्याचे जाहीर तर केलेच आहे. याचबरोबर पक्षीय पातळीवरदेखील यापुढे माळशिरस तालुक्यातील सर्वनिर्णय हे राम सातपुते घेतील व त्यांना याबाबतीत स्वातंत्र्य असेल.

**- चेतनसिंह केदार-सावंत, भाजपा जिल्हाध्यक्ष, सोलापूर**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मकरसंक्रांतीनिमित्त नळदुर्गच्या बाजारात महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ जानेवारी -**

मकरसंक्रांतीच्या सनानिमित्त रविवारी नळदुर्गच्या आठवडी बाजारात सुगडे, चुडे, बांगडया, तिळगुळ व वाणाचे सामान खरेदी करण्यासाठी महिलांनी मोठी गर्दी केली होती.



मकरसंक्रांतीचा सण दि.१४ जानेवारी रोजी साजरा होत आहे. या पार्श्वभुमीवर दि.१२ जानेवारी रोजी (रविवारी) नळदुर्गच्या आठवडी बाजारात या सणात वापरल्या जाणाऱ्या विविध वस्तुंची दुकाने, स्टॉल शहरातील व्यापाऱ्यांनी थाटली आहेत. त्याचबरोबर कुंभार बांधवांनी शास्त्री चौकात सुगडी (खण) विक्रीसाठी दुकान थाटले आहेत.

सुगडांसह चुडे, बांगडया, तिळगुळ, तसेच लुटण्यासाठी लागणाऱ्या वस्तु व वाणाचे सामान खरेदी करण्यासाठी महिलांनी मोठी गर्दी केली होती. यावर्षी सुगडांसह सर्वच वस्तुंचे दर वाढलेले आहेत तरीही या वस्तु खरेदी करण्यासाठी महिलांनी बाजारात मोठी गर्दी केली होती. मकरसंक्रातीचा सण हा नात्यातील गोडवा जपण्यासाठी महत्वाचा सण म्हणुन ओळखला जातो.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### विवेकानंद जयंती साजरी

**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये दि.११ १ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. आजच्या शालेय विद्यार्थ्यांना थोर महापुरुषाविषयी सखोल माहिती व्हावी व त्यांच्या कार्याची जाण प्रत्येकाला राहावी या उदात्त हेतूने स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये विविध उपक्रम राबवले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून वार शनिवार रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून आजच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची व त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव व्हावी या हेतूने इयत्ता चौथी ते सातवी पर्यंतच्या एकूण ९४९ विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार, जेष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे, गोविंद जमादार, प्रणित सूर्यवंशी, उल्हास दूधभाते, अजय पतंगे, स्वप्नील पतंगे आदीसह सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.



### नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**

विधीज्ञ संघाच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असून यामध्ये अध्यक्षपदी ॲड. दत्तात्रय घोडके यांची तर उपाध्यक्षपदी ॲड. भारत बर्वे आणि सचिवपदी ॲड. निळकंठ वट्टे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कोषाध्यक्षपदी ॲड. डोईफोडे तसेच महिला प्रतिनिधीपदी ॲड. सीमा साळुंखे यांची निवड करण्यात आली. ॲड. घोडके ४० मतांनी विजयी पराभूत उमेदवार ॲड. कानडे. ॲड. वट्टे २० मतांनी विजयी. पराभूत उमेदवार प्रवीण लोमटे, ॲड. बर्वे २३ मतांनी विजयी पराभूत उमेदवार ॲड. पटाडे, ॲड. विश्वास डोईफोडे १४ मतांनी विजयी. पराभूत उमेदवार ॲड. किरण इंगोले. महिला प्रतिनिधी ॲड. सिमा साळुंखे ७ मतांनी विजयी पराभूत उमेदवार ॲड. स्वाती वाघमारे नूतन पदाधिकारी आणि विजयी उमेदवारांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### प्रथम वर्धापन दिन साजरा

**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

नारंगवाडी येथे दि.११ रोजी दवसभर भरगच्य कार्यक्रम पार पडले. यासाठी पहाटे पुर्ण गावात रामफेरी काढण्यात आली. श्रीरामाच्या नावाचा गजर करत गावातून प्रभू श्रीराम प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिलांनी कळसतांब्या, तुळशी,आरतीचे ताट घेऊन भाग घेतला होता. महिलानी आपापल्या घरापुढे सडारांगोळी करून प्रतिमेची पूजन केले. टाळ -मृदंगाच्या व हलगीचा तालत वारकऱ्यांनी ठेका धरला. प्रभू रामचंद्रांच्या मंदिराचा इतिहास उलगडत त्यांनी गेल्या साडेचारशे वर्षांचा इतिहास श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभा केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालाजी मुळे महाराज, धनराज मुगळे, भरत मुगळे, अविनाश देशमुख, हनुमंत लोहार, रमेश येळापुरे, खंडू माळी, प्रशांत सांगवे, विकीन सांगवे, प्रदीप सांगवे, नागेश घंटे, आदर्श मुळे, महेश लोहार, नितीन कुलकर्णी व अनेक कार्यकत्यांनी कष्ट घेतले.



### जिजाऊ जयंती साजरी

**कळंब, दि.१२ जानेवारी -**

ज्ञान प्रसार प्राथमिक विद्यालय मोहा येथे राष्ट्रमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रशालेतील सहशिक्षक कमलाकर शेवाळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. तसेच भावी पिढीने राष्ट्रमाता जिजाऊचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पिढी घडवली पाहिजे असे त्यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना संबोधित केले. तसेच प्रशालेतील आदिती मडके, सानिका बाराखोते, समीक्षा बागल, राजश्री भोरे आदीं विद्यार्थिनींनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्यावर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेतील सानिका बाराखोते हीने केले तर आभार प्रदर्शन पांचाळ उषा यांनी केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रशालेतील सहशिक्षिका सोनवणे नीता, स्मिता पाटील, टोपे ज्ञानोबा, प्रशालेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मैलारपुर येथील श्री खंडोबा देवाच्या यात्रेस उत्साहात प्रारंभ

**यात्रेत आलेल्या व्यापारी व व्यवसायिकांची लुट सुरु ... एकाच जागीचे भाडे तिघांकडून वसुली...**



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ जानेवारी -**

नळदुर्ग (मैलारपुर) येथील श्री खंडोबा देवाच्या यात्रेस मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. यात्रेच्या पहिल्याच दिवशी रविवार दि.१२ जानेवारी रोजी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक मंदिरपरीसरात दाखल झाले होते. यावेळी मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. यात्रेचा मुख्य दिवस १३ जानेवारी असुन या दिवशी श्रीक्षेत्र मैलारपुरात महाराष्ट्रासह, कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगना राज्यातील जवळपास ५ ते ६ लाख भाविक येण्याची शक्यता आहे.

नळदुर्ग (मैलारपुर) हे श्री खंडोबा देवाचे महत्वाचे ठिकाण आहे. याच पवित्र व ऐतिहासिक नळदुर्गच्या भुमीत श्री खंडोबा व बाणाईचा विवाह झालेला आहे त्यामुळे खंडोबा भक्तांसाठी श्रीक्षेत्र मैलारपुर हे ठिकाण अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे याठिकाणी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी बाराही महिने भाविक येतात. मात्र याठिकाणी येणाऱ्या भाविकांना याठिकाणी कुठलीच सुविधा मिळत नाही. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी निदान येणाऱ्या काळात तरी श्रीक्षेत्र मैलारपुरात येणाऱ्या भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. याठिकाणी येणाऱ्या भाविकांना याठिकाणी ना स्नान करण्याची सोय आहे ना बाथरूमची सोय आहे भाविकांना उघड्यावरच स्नान करावे लागते ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.

यावर्षी दि. १२ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत याठिकाणी श्री खंडोबा देवाची महायात्रा भरत आहे. सध्या यात्रा परिसर दुकाने, हॉटेल, प्रसादाची दुकाने, खेळणीची दुकाने, मोठमोठे पाळणे व इतर करमणुकीच्या साधनानी थाटला आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी रविवारी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. हजारो भाविक श्रीक्षेत्र मैलारपुरात दाखल झाले आहेत. रविवारी भल्या पहाटेपासुनच श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दर्शनासाठी भाविकांची लांबच, लांब रांग लागली होती. भाविक मोठ्या भक्तीभावाने श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्याबरोबरच आपले नवसही फेडताना दिसत होते. यावेळी देवाला नैवेद्य दाखविणे, भंडारा -खोबरे उधळणे, वारू जेऊ घालणे, तळी उचलणे यासह विविध धार्मिक कार्यक्रम करतांना दिसुन येत होते. यात्रेकरुंच्या सुरक्षेसाठी तसेच त्यांना व्यवस्थित रांगेत दर्शन घेता यावे यासाठी पोलिस प्रशासन व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्यावतीने दर्शन रांगेची चांगली सोय केली आहे.

> श्रीक्षेत्र मैलारपुरात यात्रेनिमित्त आलेल्या व्यापारी व व्यावसायिकांना कांही व्यक्ती अनाधिकृतपणे व दमदाटी करून अव्वाच्या सव्वा जागेचे भाडे घेऊन अक्षरशा लुटत आहेत. व्यापारी व व्यावसायिकांना लुटणाऱ्या त्या व्यक्तींवर प्रशासनाने कडक कारवाई करणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता नियमांनुसार यात्रेत व्यापार व व्यवसायासाठी आलेल्या व्यापारी व व्यावसायिकांनी नगरपालिकेला जागाभाडे देणे गरजेचे असतांना कांही व्यक्ती व्यापाऱ्यांकडुन अव्वाच्या सव्वा भाडे वसुल करुन त्यांची लुट करत आहेत मात्र प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नाही त्यामुळे हा प्रकार याठिकाणी घडत आहे.

## जिजाऊंच्या लेकींना ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या भावांची शिदोरी

**आ. स्वामी व माने यांनी केली बसभाड्यासाठी मदत**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

उमरगा-लोहारा परिसरातील महिला राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी सिंदखेडराजाकडे रवाना झाल्या. या महिलांच्या बसभाड्याची सोय उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रविण स्वामी यांनी केली. तसेच बाळासाहेब माने यांनी महिलांच्या प्रवासासाठी आर्थिक मदत केली.

ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनकडून सिंदखेडराजाला निघालेल्या या सर्व जिजाऊंच्या लेकींना गुळ-शेंगाच्या पोळ्या, चिवडा पॉकीट, बिस्किटचे पुडे, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या आणि जिजाऊंच्या चरित्रावरील पुस्तक अशी शिदोरी देण्यात आली. ही शिंदोरी ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनचे पदाधिकारी सत्यनारायण जाधव, किशोर बसगुंडे, प्रदिप चौधरी, ॲड. अर्चना जाधव, बबिता मदने यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या भगिनींना सकाळी ६ वाजता उमरगा बसस्थानक येथे दिली.

सिंदखेड राजाच्या प्रवासासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती रेखा पवार यांनी पुढाकार घेतला.

## तुळजाभवानी देवीचा मूळ गाभारा काढून प्रशस्त गाभारा निर्माण करा

**पुजारी मंडळाची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**

तुळजाभवानी देवीच्या मूळ गाभाऱ्यात असणाऱ्या शिळांना तडा गेला असून देवीचा सध्याचा मुलगा बडा काढून त्या ठिकाणी ३० बाय ३० चा प्रशस्त गाभारा निर्मिती करण्याची मागणी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष यांच्याकडे निवेदनातून पुजारी बांधवांनी केली आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री तुळजाभवानी मंदिर व तुळजापूर शहर विकास आराखडा अंतर्गत श्री तुळजाभवानी मंदिर जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरू असून मंदिराला पुरातन स्वरूपात आणण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे.

देवीच्या गर्भगृहातील मूळ भिंतीवरील मार्बल व त्याखालील स्टाईल काढल्यानंतर मूळ भिंतीच्या दगडांना तडे गेल्याचे आढळून येत आहे. तसेच सदरील भिंत म्हणावी तेवढी मजबुत दिसत नाही. त्या मुळेच पुर्वी मुळ भिंतीच्या सरक्षणासाठी बाहेरच्या बाजूने दुसरी भिंत बांधण्यात आलेली दिसते. त्या अनुषंगाने या सर्व विकास आराखड्याचा आत्मा म्हणजे देवीचे गर्भगृह या विकास आराखड्यातून सर्व काही मजबूत होईल. शहराच्या चहुबाजूने विकासात्मक कामे होतील नयन रम्य असे पर्यटन स्पॉट होतील.

परंतु मुख्य आत्मा जरकमकुवत राहिला तर आपण केलेला सर्व विकास आराखडा कवडीमोल ठरेल त्यामुळे आता सध्याचा मूळ गाभारा काढून त्या ठिकाणी प्रशस्त गाभारा निर्मिती करावी म्हणजे पुढील शेकडो वर्षाच्या पब्लिक पॉप्युलेशनच्या दृष्टीने ते गरजेचे असल्याचे मत सदरील निवेदनात पुजारी बांधवांनी व्यक्त केले आहे.

सदरील निवेदनावर पुजारी इंद्रजीत साळुंके, बाळासाहेब भोसले, गणेश क्षीरसागर, श्रीकृष्ण साळुंके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ताकमोघे यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**

येथील जय हनुमान नगर मित्र मंडळाच्या वतीने तुळजापूर पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन ताकमोघे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी वैभव मस्के, नागनाथ हुंडेकर, मिलिंद भोसले, ऋषी बेले आदी उपस्थित होते.

## तुळजाभवानीस महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**



तुळजाभवानीच्या शाकंभरी नवरात्र उत्सावातील सहाव्या माळे निमित्त श्री तुळजाभवानी देवीस महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली. या महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजेत तुळजाईला प्राचिन, पारंपारीक दागदागिन्यांनी सजवण्यात आले होते. महिषासुराच्या त्रासातून मुक्ती देण्यासाठी सर्व देव देवतांनी जगतमातेला साकडे घातले. देवादिकांच्या हाकेला धावून जात श्री तुळजाभवानीने महिषासुरासोबत घनघोर युद्ध करून त्याचा वध केला. महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजेतून ही कथा दर्शवत ही अलंकार महापूजा मांडण्यात येत असते

रविवारी पहाटे १ वाजता मंदीर उघडून चरणतीर्थानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. सकाळी ६ वा. अभिषेकाची घाट होऊन देवीचे नित्य अभिषेक पूजा सुरु करण्यात आल्या. अभिषेकानंतर देवीला वस्त्रोलंकारांनी सजवण्यात आले. त्यानंतर देवीची धुपारती होऊन अंगारा काढण्यात आला.

दिवसभरात हजारो भक्त भाविकांनी देवीच्या महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजेचे दर्शन घेतले. भाविकांच्या आई राजा उदो उदोच्या गजराने मंदीर परिसर दुमदुमून गेला होता.

## आई राजा.. उदो.. उदोच्या जयघोषात जलयात्रा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**

साडेतीन शक्तीपीठातील एक पूर्ण पीठ असणाऱ्या आई तुळजाभवानी मातेच्या धाकट्या दसऱ्यात म्हणजे शाकंभरी नवरात्र महोत्सवातील मुख्य आकर्षण असतं ते जलयात्रा आई राजा उदो उदो च्या घोषणा देत मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात मोठ्या भक्तिभावाने दि.११ जानेवारी रोजी तुळजाभवानी मातेची जलयात्रा संपन्न झाली.

शाकंभरी नवरात्रातील पाचव्या माळेनिमित्त विविध धार्मिक विधी सोबतच पारंपरिक रूढी परंपरेने जल यात्रा काढली जाते पापणास तीर्थ येथील विधीवत पूजा करून जलाचे पूजन शाकंभरी नवरात्र महोत्सवातील यजमान विवेक गंगणे आणि त्यांच्या पत्नी प्रियंका गंगणे यांच्या हस्ते करण्यात आले. शाकंभरी मातेची शाक प्रतिमा (भाजीपाला) व पापणास तीर्थ येथील पवित्र जल भरलेला जलयात्रेचा कलश आकर्षक आणि सुंदर सजवलेल्या रथामध्ये बसवून गाजत वाजत ही जलयात्रा प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकातून भव्य मिरवणूक भवानी रोड मार्गे मंदिरात जाते. यावेळी पंचक्रोशीतील सुहासिनी कुमारीका पवित्र पापनास तीर्थाचे जल कलशात घेऊन ते कलश डोक्यावर घेऊन या मिरवणुकीत सहभागी होतात. यावर्षी उत्सवातील शोभायात्रेमध्ये बैलगाड्या, हत्ती, घोडे हे जल यात्रेचे विशेष आकर्षण होते. देवीचे पारंपारिक वाद्य नगारा हा बैलगाडी मध्ये ठेवून नगारा वाजत गाजत असल्याचे सुंदर दृश्य भाविकांना पाहण्यास मिळाले. महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला.

जल यात्रेमध्ये मंहत तुकोजी बुवा, मंहत चिलोजीबुवा, महंत वाकोजी बुवा, तिन्ही पुजारी मंडळाचे अध्यक्ष, भाविक भक्तांसोबत पुजारी, कर्मचारी, अधिकारी, प्रक्षाळ मंडळाचे पदाधिकारी महिला, सुहासिनी आणि कुमारीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्पन्नाधारीत पिक भाव संरक्षण विमा योजनेसाठी अभ्यासगट

**मुख्यमंत्र्यांचे आदेश, प्रयत्नाला यश : आमदार राणाजगजितसिंह पाटील...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

सध्या अस्तित्वात असलेल्या प्रधानमंत्री कृषि पीक विमा योजनेची व्याप्ती वाढवून शेतकरी बांधवांना 'पीक भाव संरक्षण' देण्याचा दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. जगातील काही देशाप्रमाणे आपणही शेतमालाला पीक विमा योजनेच्या माध्यमातून भावाचे संरक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्पन्नाधारीत 'पीक भाव संरक्षण विमा योजना' सुरू करण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे विनंती केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री महोदयांनी त्यासाठी अभ्यासगट गठीत करण्याचे आदेश दिले आहे. एका महत्वपूर्ण आणि धोरणात्मक प्रक्रियेच्या दिशेने सुरू केलेल्या प्रयत्नास यश मिळाले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

आजघडीला जगभरातील काही देशात उत्पन्नावर आधारित पिक भाव संरक्षण दिले जाते. त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळावा ही शेतकऱ्यांची मागणी अगदी सहजपणे पूर्णत्वास जावू शकते. शासनाच्या माध्यमातून उत्पन्नावर आधारित 'पीक भाव संरक्षण विमा योजना' सुरू करण्यासाठी कृषी क्षेत्रातील तज्ञांचा अभ्यासगट गठीत करून योजनेसाठी आवश्यक मसुदा तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी संबंधित विभागाला आदेशीत करावे अशी विनंतीपूर्वक लेखी मागणी आपण ३१ डिसेंबर रोजी केली होती. शेतकऱ्यांसाठी अतिशय जिव्हाळ्याच्या व महत्वाच्या असलेल्या या विषयाला मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी तातडीने प्रतिसाद दिला आहे. आपल्या मागणीवरून उत्पन्नधारीत पिक भाव संरक्षण योजनेसाठी अभ्यासगट नेमून त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना दिले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिले आहेत.

देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेबांनी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून विस्तृत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवली आहे. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना पूर्वीच्या योजनेच्या तुलनेत अधिक दिलासा मिळाला. ही योजना उत्पादनावर आधारित नुकसान भरपाईची आहे. मात्र योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे देखील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हीच बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय शेतकरी दिनाचे औचित्य साधत उत्पन्नावर आधारित पीक भाव संरक्षण योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला होता.

> **शेतकरी हिताच्या दृष्टीने निर्णायक पाऊल...**
>
> शेतकऱ्यांचे बाजार भावातील घटीमुळे नुकसान होऊ नये, यासाठी पीक भाव संरक्षण योजना लागू करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी १ जानेवारी २०२५ पासून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचा ठराव घ्यावा, असे आवाहनही केले आहे. जागतिक बाजारपेठेमुळे अनेकदा शेतमालाचे भाव कोसळतात, परिणामी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. ही बाब टाळण्यासाठी या योजनेची नितांत गरज आहे. या बाबत कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत सखोल विचार विमर्ष केल्यानंतरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांकडे आपण मागणी केली. जगातील काही देशात आजघडीला अशा प्रकारच्या विमा योजना राबविल्या जाता आहेत. त्याला इंन्शुरन्स प्रॉडक्टस असे संबोधले जाते. अभ्यासगट नेमून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी दिल्यामुळे शेतकरी हिताच्या दृष्टीने हे खूप निर्णायक पाऊल असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

धाराशिव - लातूर
जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अमर शहीद श्रीरंग वाचनालय कथा कथन व सामुहिक वाचन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१२ जानेवारी -**

अमर शहीद श्रीरंग वाचनालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धनेगाव ता. देवनी जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाचा संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम अंतर्गत कथाकथन व सामूहिक वाचन कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व शहीद जवान श्रीरंग बिरादार यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रंथालयाचे संचालक गोविंद विश्वनाथ कारभारी व महादेव निवृत्ती बिराजदार फोटो पूजन करून सुरुवात केली. या कार्यक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कथा प्रत्येकानी आपल्या भाषेत



मान्यवरांच्या उपस्थितीत सादर केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे सामूहिक वाचन घेण्यात आले. कार्यक्रमास ग्रंथालयातील कर्मचारी व जि.प. शाळेतील मुख्याध्यापक संजय परीट व सर्व कर्मचारी यांच सहकार्य मिळाल. कार्यक्रमाचे ग्रंथालयातील रोज वाचक भाऊराव पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संजय परीट यांनी केले. तर आभार ग्रंथपालन यांनी मानले.

# दस्त नोंदणीतच शेत रस्त्याचा समावेश करावा

**आ. अभिमन्यू पवार यांची महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी...**

### शेत रस्त्याच्या नोंदी सातबाराच्या इतर हक्कात करा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ जानेवारी -**

शेतीची खरेदी व विक्री किंवा वाटणी करताना शेत रस्त्याबाबत स्पष्टता केली गेली नाही. यामुळे गावोगावी शेतरस्ते भांडणाचे केंद्र बनले आहेत. शेत तिथे रस्ता अभियानामुळे औसा मतदारसंघात बऱ्यापैकी प्रश्न मार्गी लागला आहे.पण संपूर्ण राज्यातील शेत रस्त्याशी निगडित प्रकरणे मार्गी लावायची असतील तर काही धोरणात्मक सुधारणा करण्याची गरज असून शेती खरेदी व विक्री करताना किंवा वाटणी करताना दस्त नोंदणीमध्ये शेतरस्त्याचा उल्लेख करणं बंधनकारक करावं तसेच शेतरस्त्याची नोंद सातबाऱ्यावर इतर हक्कात करावी. या मागण्यांसाठी आ. पवार गेल्या ४ वर्षांपासून सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आहेत.

यासाठी आता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट घेऊन यासंदर्भात निर्णय करण्यासाठी संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्याची मागणी त्यांनी केली आहे. या मागणीनुसार १६ जानेवारी रोजी यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती आ. अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.



शेताकडे जाणे येणेसाठी नकाशावरील, वहिवाटीतील व महसूल विभागाने आदेशित केलेले रस्ते अडवण्याचे प्रकार समोर येत आहेत. नवीन शेतरस्ते मागणीची प्रकरणे पाहता आणि शेत रस्ते हेच शेतीची मुलभूत गरज असल्याने शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणीमध्ये शेत रस्त्याचा समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्याच्या नोंदी सातबारा इतर हक्कात करणे, मामलेदार कायदा आणि १४३ कलम मध्ये सुधारणा करणे, शेत रस्त्यांना क्रमांक देणे आणि दर्जा देणे, शेत रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करावी. अशी आ. अभिमन्यू पवार यांनी केलेल्या मागणी तसेच विधानसभेत लक्षवेधी चर्चेच्या अनुषंगाने तत्कालीन महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१ जानेवारी २०२४ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. परंतू याप्रकरणात कोणताही निर्णया अद्याप झाला नाही. यामुळे महसूल व वन विभाग अप्पर मुख्य सचिव, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रण महाराष्ट्र राज्य आणि इतर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक आयोजित करावी. नवीन दस्त नोंदी आणि महसूल मामलेदार कायदा आणि कलम १४३ मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत तसेच शेत रस्त्यांना दर्जा आणि क्रमांक देऊन त्यांच्या देखभालीसाठी निधीची तरतूद करावी. अशा मागण्या आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट घेऊन केल्या आहेत. याचबरोबर ठोस निर्णय व्हावा.

यासाठी संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्याची मागणी केली. या मागणीनुसार १६ जानेवारी रोजी यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली आहे.

### अप्पर तहसील कार्यालयात पद निर्मितीची मागणी...

नव्याने मंजूर किल्लारी अपर तहसीलदार कार्यालयासाठी शिपाई या एका पदाची तर कासार सिरसी अपर तहसीलदार कार्यालयासाठी आणखीन ३ पदांची निर्मिती करण्याची मागणी यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महसूल अतिरिक्त मुख्य सचिव यांना दिल्या आहेत.

# पानगावच्या विठ्ठल मंदीरास ९ लाखाच्या माऊली पालखी रथाची देणगी

**कामखेड्याच्या माले, गुडे परिवारांनी जपली सामाजीक बांधीलकी....**



### श्रीगोंदा येथून तयार होऊन येणार माऊली पालखी रथ

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१२ जानेवारी -**

तीन पिढ्यापासून लाखो रुपायची देणगीची परंपरा जपणारे कामखेडा येथील माले गुडे परीवारांनी कै. विठोबा ग्यानबा माले यांच्या स्मरणार्थ पानगाव येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदीरास तब्बल ९ लाख १ हजार रुपायचा माऊली पालखी रथाची देणगी देऊन एक सामाजिक बांधिलकी जपली.

पानगाव येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदीर हे उत्तर चालुक्य कालीन १२ व्या शतकातील असुन येणारे वारकरी पायावर डोकं ठेऊन दर्शन घेताना पंढरपुरच्या विठ्ठलाची आठवण काढतात. यावर बांधलेले शिखर हे विजोड आहे. आशा या विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचे जतन व्हावे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराची देखभाल नसल्यामुळे मंदिराची पडझड झाली होती.

पुरातत्त्व विभागाने पाहणी करून अहवाल सादर केल्यानंतर शासनाकडून नमो तीर्थक्षेत्र विकास निधीमधून ९ कोटी रुपये मंजूर झाले असून जिर्णोद्धाराच्या कामास सुरुवात झाली आहे.

कामखेडा येथील विठोबा माले यांनी ६० वर्षा पुर्वी पानगाव येथील विठ्ठल मंदिरात तनपुरे महाराज यांच्या सप्ताहात त्यावेळी १ लाख रुपये देणगी दिली होती. विठोबा माले यांचे चार महिन्यांपूर्वीच निधन झाले. परंतु त्यांच्या दातृत्वाची परंपरा त्यांच्या पश्चात पत्नी मालनबाई माले, मुलगा श्रीधर गुडे, दत्तात्रय माले, धर्मराज माले, विजयकुमार माले व मुली प्रभावती संपत्ते, पुष्पावती गुडे, पद्मावती हरिदास, विद्यावती गुडे या बहीण भावांनी कायम ठेवुन कै. विठोबा ग्यानबा माले यांच्या स्मरणार्थ नऊ लाख एक हजार रुपयांचा माऊलीचा पालखी रथ दिल्यामुळे विठ्ठल रुक्मिणी मंदीर समीतीच्या वतीने या सर्व दानशूरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळेस मंदीर समीतीचे अध्यक्ष प्रदिप कुलकर्णी, ईश्वर गुडे, चंद्रचूड चव्हाण, चंद्रकांत आरडले, ऊत्तरेश्वर हालकुडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## निलंग्यात रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१२ जानेवारी -**

श्री अनंत विद्या विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने निलंगा येथे दरवर्षीप्रमाणे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. यात एकूण १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्वरूप सांप्रदयाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम गुडले, तालुकाध्यक्ष नाना टोंपे, सचिव अशोकराव कांबळे, अंकुश सावंत, सुभाष चव्हाण, राजू मलिल्हे, बालाजी रुपनर, तुकाराम होंतळे, नागेश पांचाळ, दिलीप जाखोटिया आदींनी परिश्रम घेतले.

# अहमदपुरात तिसरे जागल मराठी साहित्य संमेलन उत्साहात साजरे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१२ जानेवारी -**

भारतीय संस्कृतीमध्ये मराठी साहित्याला अनन्य साधारण असे महत्त्व असून मराठी साहित्यामुळे जीवन जगण्याला प्रेरणा, आधार आणि दिशा मिळते त्यामुळे सर्वांनी मराठसाहित्याचा आस्वाद घेऊन मराठी साहित्य चळवळीतून आदर्श समाज उभा करावा असे आग्रही प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले. ते मराठवाडा साहित्य परिषद शाखा अहमदपूरच्या वतीने आयोजित तिसरे जागल मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

जागल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, व्यासपीठावर मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, म.सा.प. शाखेचे अध्यक्ष सत्यनारायण काळे, उपाध्यक्ष उदयकुमार जोशी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की साहित्यातून शेती, आरोग्य, कला, क्रीडा क्षेत्रात मोठे बदल करून ग्रामीण भागात सहकार चळवळ अग्र क्रमाणे राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. कौतिकराव ठाले पाटील म्हणाले की, मराठीला खूप जुनी परंपरा असल्याचे सांगून मराठी भाषा ग्रामीण आणि शहरी भागात रुजवायची असेल तर प्रामाणिकपणे मराठी भाषेचा चिकित्सकपणे अभ्यास करावा.असे जाहीर आवाहन केले. संमेलनाध्यक्ष डॉ. धोंडीराम वाडकर म्हणाले की, माणूस प्रतिकूल परिस्थितीत असला तरी शिक्षणात जिद्द, चिकाटी आणि परिश्रम ठेवून अभ्यास केल्यास सर्वसामान्य माणूस असामान्य होतो




असे सांगून विविध साहित्याचा अहवाल त्यांनी सादर केला. ग्रामीण संस्कृती आणि परंपरा जीवंत ठेवण्यासाठी लोक साहित्याचा अभ्यास करावा असे सांगितले. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात नामदार बाबासाहेब पाटील यांचा कॅबिनेट दर्जाचा सहकार मंत्री म्हणून समावेश झाल्याबद्दल मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच मराठवाडा साहित्य परिषदेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान नामदार बाबासाहेब पाटील, सत्यनारायण काळे यांच्या हस्ते ग्रंथ, सन्मानाचा फेटा देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सत्यनारायण काळे, परिचय प्रा.द.मा. माने, सूत्रसंचालन राम तत्तापुरे आणि आशा तत्तापुरे-रोडगे यांनी तर आभार उदय जोशी यांनी मानले.

# संभाजी सेनेची तालुका कार्यकारणी जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ जानेवारी -**

संभाजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने, जेष्ठ नेते धर्मराज पवार, जिल्हाप्रमुख योगेश देशमुख, विद्यार्थी सेनेचे जिल्हाप्रमुख प्रसाद पवार, लातूर शहराध्यक्ष अमोल कांदे, निलंगा संपर्क प्रमुख राजाभाऊ साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत संभाजी सेनेची औसा तालुका कार्यकारणीची एकमताने निवड करण्यात आली.

औसा येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या संभाजी सेनेच्या बैठकीत तालुका संपर्क प्रमुखपदी मोहन माळी, औसा शहर प्रमुखपदी आदिनाथ गोमदे,उपप्रमुख गणेश तिडके, विद्यार्थी आघाडी सेनेच्या तालुकाध्यक्षपदी अक्षय पवार, तालुका कोषाध्यक्ष बालाजी जाधव, विद्यार्थी सेना आघाडी प्रमुख प्रसाद जाधव, उपप्रमुख सचिन यादव, सचिव अंकुश ढोक, तालुका उपाध्यक्ष सुरज भिसे, सचिव समाधान गोरे यांची निवड करण्यात आली.

समदर्गाचे सरपंच उद्धव काळे, प्रा. धनराज गोमदे, गहिनीनाथ महाराज गोमदे, आशिष स्वामी सोशल मीडिया, खंडू उडवांत, सागर गोमदे, उमेश लोहार, नागनाथ कसबे, महेश मोहिते, गोरख तिडके, राजकुमार शिंदे, रोहिदास कांबळे, गणेश गोमदे, शशिकांत सुरवसे, जालिंदर ढोक, स्वप्नील स्वामी, रोहन तिडके, भैरवनाथ ढोक, बालाजी शिंदे, विनोद सुरवसे, अवधूत तिडके, सागर गरगडे, शिवशंकर काळे, बळी सुरवसे, बळीराम सुतार, स्वप्नील काळे, श्रीनाथ पाटील, विजय कुंभार, रुपेश साळुंके, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## भारतीय स्वातंत्र्याची चिरफाड करणारी साहित्यकृती म्हणजे फ्रॅक्चर्ड फ्रीडम : डॉ. क्रांती मोरे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ जानेवारी -**

भारतीय शासन व्यवस्था आणि राजकारणाचा लेखाजोखा मांडताना सत्य आणि न्यायप्रती असलेली बांधिलकी. स्वतःच्या विचारावरचा ठाम विश्वास यातून तुरुंगात देखील उपोषण आंदोलने करावी लागतात हे किती दुर्दैवाचे आहे. संबंध नसताना शिक्षा भोगणारे इतरांसाठी आयुष्य वाया घालवतात. भारतीय न्यायव्यवस्थेत न्याय हा कसा महाग आहे. शिवाय तो मिळणे ही किती अवघड आहे. हे सांगत भारतीय स्वातंत्र्याची चिरफाड करणारी साहित्यकृती म्हणजे फ्रॅक्चर्ड फ्रीडम होय, असे मत डॉ. क्रांती मोरे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत चालू असलेल्या वाचक संवादाचे ३२८ वे पुष्प शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील इंग्रजी विभागातील प्रा.डॉ. क्रांती विठ्ठल मोरे यांनी गुंफले. त्यांनी कोबाड गांधी लिखित व अनघा लेले अनुवादित फ्रॅक्चर्ड फ्रीडम या ग्रंथावर भाष्य करताना म्हणाल्या, उपेक्षितांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना किती संघर्ष करावा लागतो, जन चळवळीतील कार्यकर्त्यांना पद्धतशीरपणे न्यायालयीन लढाईत गुंतवून तुरुंगात डांबून त्याचा आवाज कसा बंद करण्याचा प्रयत्न केला जातो हे सांगतानाच येणाऱ्या पिढीसाठी सुरक्षित व निकोप वातावरण द्यायचे असेल तर विचारावर बंधन, बोलके सुधारक व करते सुधारक मानवतावादी बनवण्याचा विचार रुजवला पाहिजे. यावेळी श्रोत्यातून अनेकांनी प्रस्तुत पुस्तकावर चर्चा केली.

बालवाचक साईविश्व बिरादार यांनीही इंदुमती जोंधळे लिखित बिनपटाची चौकट ग्रंथावर मनोगत व्यक्त केले. पत्रकार दिनाचे औचित्य साधून काही पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

# मेट्रोब्रेन अबॅकस स्पर्धेत ज्ञानप्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकस अकॅडमीची उत्तुंग भरारी

### ज्ञानप्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकसचे संचालक गजानन पाटील यांना टॉप फ्रेंचायजी अवार्ड-२०२५ प्रदान..

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१२ जानेवारी -**

चाकुर तालुक्यातील लातूररोड येथील ज्ञानप्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकस क्लासेस विद्यार्थ्यांनी नॅशनल लेव्हलची एकूण २३ बक्षिसे जिंकून घवघवीत यश संपादन करत उत्तुंग भरारी घेतली आहे. मोहोळ (सोलापूर) येथील माऊली राजे लॉन्स मंगल कार्यालयात सातव्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धा व बक्षीस वितरण समारंभ पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध मराठी हिंदी अभिनेते विजय पाटकर व सुप्रसिद्ध मराठी हास्य अभिनेता ओमराजे यादव अध्यक्षस्थानी मेट्रोब्रेन अबॅकसचे संचालक संतोष लोहारे प्रमुख पाहुणे मेट्रोब्रेन अबॅकसचे मॅनेजिंग डायरेक्टर सीमा संतोष लोहारे आदीसह विविध मान्यवर मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमात ज्ञानप्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकस क्लासेस लातूररोडच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल लेव्हलची एकूण २३ बक्षिसे जिंकली तसेच ज्ञान प्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकस क्लासेसचे संचालक गजानन संग्राम पाटील यांना टॉप फ्रेंचायजी अवार्ड-२०२५ प्रसिद्ध अभिनेते विजय पाटकर हस्ते प्रदान करण्यात आला.

या स्पर्धेत ज्ञानप्रबोधिनी मेट्रोब्रेन अबॅकस क्लासेसची विद्यार्थीनी अल्फिया चांद शेख हिने देशातून झेड रनर या लेवल मधून फस्ट ग्रँड टॉपर तर सेकंड ग्रँड टॉपर श्रावणी सुरेश सांगवीकर आणि मुदसिर साजेद शेख तृतीय ग्रँड टॉपर तिन्ही मानाची ट्रॉफी पटकावली लातूररोड करांची मान अभिमानाने उंचावली. तसेच झेड आर लेव्हल मधून देशातून संस्कार लांडगे, विराज कोकाटे, सृष्टी सांगवीकर, सर्वेश देशमाने, युवराज मुंडे, विश्व घोडके, संदेश शिंदे, नवाज शेख, साई मुंडे, प्राची पस्तापुरे, श्रद्धा वडवळकर, आरुषी शिंदे, यांनी वेगवेगळ्या कॅटेगिरीतून मानाची टॉपर ट्रॉफी जिंकली तर धनश्री मारापल्ले, अभिषेक मुंडे, रेणुका कोकाटे, इरफान पठाण, अथर्व शिंदे, आरती वडवळकर, आयान पठाण यांनी मानाची द्वितीय टॉपर ट्रॉफी जिंकली तर प्रोत्साहनपर अच्युवर्स अवॉर्डसाठी प्रामुख्याने समीरा मौजन, आभा देशमाने, श्रेयस देशमाने, मानवी मुंडे, नव्या मुंडे, शाम हरिदास, प्रीती हनमंते, श्रेया कांबळे, सोहम मदनुरे, शौर्य शिंदे हे विद्यार्थी पात्र ठरले एकूण या परीक्षेमध्ये ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



त्यात भारत देशातून प्रथम, द्वितीय, तृतीय ग्रँड ट्रॉफी मिळवण्याचा बहुमान ज्ञानप्रबोधिनी अबॅकस लातूररोड ला मिळाला याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# शालेय विद्यार्थ्यासाठी वेळेत लालपरी चालू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१२ जानेवारी -**

वलांडी येथील परिसरातील शैक्षणिक विद्यार्थ्यासाठी वलांडीच्या महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी परिसरातील टाकळी, देवगड, बोंबळी खुर्द, बोंबळी बू. इत्यादी गावातील विद्यार्थ्यांना उदगीर आगाराची गाडी तळेगाव, चवणहीपरगा, वलांडी ते टाकळी परेंत ही लाल परी सोडण्यात आली आहे खरे मात्र या लाल परीचा वेळेत शैक्षिणक विद्यार्थ्याचा वेळ संपून जवळ पास दोन तास होत आहे म्हणून सदर उदगीर आगाराची गाडी ही टाकळी या गावी ८.३० ते ९ च्या दरम्यान आली असता या परिसरातील देवगड, कोरेवाडी, बोंबळी खुर्द, बोंबळी बु. इत्यादी गावातील लाल परीच्या शैक्षणिक पास काडलेल्या विद्यार्थ्याच्या सोई साठी फायद्याचे होईल.



तर निलंगा आगाराची लाल परी औराद ते वलांडी नियमितपणे चालू आहे ही गाडी शालेय विद्यार्थ्याच्या सोईसाठी वलांडी येथून २.३० ला सुटणारी गाडी ही वाया टाकळी मार्ग केली असता विद्यार्थ्याचा सोईचे होईल.या लाल परीच्या प्रवासासाठी वलांडी च्या दोन महाविद्यालयातील १०० ते १५० विद्यार्थी प्रवास पास काडलेला आहे. या प्रवास पास काडलेला विद्यार्थ्याचा फायदा होण्यासाठी लाल परीची व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक लातूर यांना निवेदन देण्यात आले या निवेदनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या गटाचे लातूर जिल्हा वाहतूक अधक्ष श्री हकीम बौडीवले तर टिपू सुलतान विचार मंच चे अध्यक्ष अक्रम शेख यांनी सहमती दाखवली. सदर निवेदनाचा विचार नाही झाल्यास शालेय विद्यार्थ्याचा परीक्षेचा वेळ जवळ येत असल्याने हे शालेय विद्यार्थी अंदोलन करण्याचा पवित्र्यात आहेत.

तरी विभागीय नियत्रकांनी सदर लाल परी सुरू करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## युवकांनी धम्मचळवळीमध्ये सक्रिय योगदान देणे गरजेचे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** बौध्दधम्म हा विज्ञानिष्ठ, बुद्धिवादी, मानवतावादी आहे. तो दैववादावर नव्हे तर स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवतो. त्यामुळे आपणही आपल्या जीवनाकडे क्रियाशील व सकारात्मक दृष्टीकोनातून पहावयास हवे. धम्म चळवळीने मला काय दिले यापेक्षा धम्म चळवळीमध्ये मला काय योगदान देता येईल या अनुषंगाने आपण धम्मचळवळीमध्ये सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांनी केले.

ते बाभुळगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या धम्मपरिषदेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विचारपिठावर अध्यक्ष कृष्णाजी रंगारी, प्राचार्य डॉ. संजय गवई, सखाराम देवपारे, धम्मपाल माने, पराग पिसे, विनायक माहुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन केले.

याप्रसंगी पुढे बोलतना डॉ. गायकवाड म्हणाले की, गौतम बुद्ध हे जगातील पहिले वैज्ञानिक आहेत. ज्यांनी समग्र मानव जातीच्या कल्याणाचा विचार मांडला. चार आर्यसत्ये, अष्टांगमार्ग, पंचशील तत्वे व्यक्तीला नैतिकतावादी व सदाचारी बनण्यास प्रेरणा देणारी ठरतात. आजच्या समाजातील ज्वलंत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी गौतम बुद्धाची अहिंसावादी व शांततामय विचारसरणी उपयुक्त ठरते. उदात्त समावेशक, सामंजस्यपूर्ण सहजीवनासाठी व्यक्तीचा विचार दृष्टिकोन शीलवान व समाजाभिमुख बनला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी प्रमुख अतिथी महात्मा बसवेश्वर महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी बुद्ध विहार हे संस्काराचे केंद्र बनले पाहिजे, असे सांगीतले.



## संक्षिप्त वृत्त...

### विद्यार्थ्यांनी राबविले ग्रामस्वचछता व स्वच्छ शाळा अभियान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मौजे दावतपूर,ता.औसा येथे सुरू असलेल्या युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी या विशेष वार्षिक युवक शिबिरात ग्रामस्वच्छता व स्वच्छ शाळा अभियान राबविण्यात आले.

रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर,दावतपूरचे सरपंच शिवदास कांबळे, उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे,मुख्याध्यापक बळीराम चव्हाण आदिंनी सहभाग नोंदवला.

### बुद्धिबळ स्पर्धेत दीक्षाला सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** भोपाळ येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयातील दीक्षा सोनवणे हिने नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत सुवर्णपदक पटकाविले. तिने सोलापूर, इंदौर व सिम्बॉयसिस विद्यापीठाचा पराभव करीत वैयक्तिक गटात हे यश मिळविले. या यशाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. अनिरुद्ध बिराजदार, डॉ. रत्नराणी कोळी, श्रीकांत मंत्री, नीळकंठ श्रावण यांनी कौतुक केले. या यशाबद्दल तिचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### केशवराजच्या सुरज बजाजच्या प्रकल्पाची राष्ट्रीय पातळीवर निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील सुरज बजाज या विद्यार्थ्याने अटल टिंकरींग लॅब मधील तयार केलेल्या प्रोजेक्टची निवड केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन इनोव्हेटिव्ह सेलच्या वतीने करण्यात आली आहे. त्याच्या प्रोजेक्टचे अंतिम सादरीकरण दिनांक १६ जानेवारी २०२५रोजी पुणे येथे होणार आहे.

या यशस्वी निवडीबद्दल सुरज बजाज यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख,जितेश चापसी, संजय गुरव,विष्णू सोनवणे, केशवराज माध्यमिक विद्यालयाचे पालक राम कुलकर्णी, मुख्य प्रशासकीय समन्वय चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे, पर्यवेक्षक संदीप देशमुख, श्री बबन गायकवाड, पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती अंजली निर्मळे, मार्गदर्शक शिक्षक लक्ष्मीकांत बुगदे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

### जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी १५ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** जिल्ह्यातील उत्कृष्ट क्रीडापटू तसेच गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे मूल्यमापन होवून त्यांचा गौरव व्हावा, यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा धोरणाअंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येतात. सन २०२३-२४ या वर्षातील या पुरस्कारासाठी जिल्ह्याती क्रीडा मार्गदर्शक व खेळाडू यांनी १५ जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

सुधारीत शासन निर्णयानुसार लातूर जिल्ह्यातून गुणवंत क्रीडापटू (पुरुष, महिला व दिव्यांग) तसेच गुणवंत क्रीडा मार्गदर्शक असे जास्तीत जास्त चार पुरस्कार देण्यात येतील. तसेच शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना ज्यादाचा पुरस्कार गणल्या जाईल. यात गुणवंत खेळाडू पुरस्कार तसेच १ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व १० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप राहील. या पुरस्काराकरिता अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार सतत १० वर्षे लातूर जिल्ह्यात क्रीडा मार्गदर्शकाचे कार्य केलेले, तसेच गेल्या१० वर्षांत किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते, तसेच कनिष्ठ शालेय ग्रामीण व महिला (खेलो इंडीया) मधील राष्ट्रीय स्तरापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार केले असतील, असे क्रीडा मार्गदर्शक जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील. तसेच त्यांनी वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

# संस्कृती जोपासण्यासाठी ज्येष्ठांच्या अनुभवाची गरज

## ज्येष्ठ नागरिकांच्या राज्यस्तरीय अधिवेशनास प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** ज्येष्ठांना रेल्वे सवलतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. हा प्रश्न सोडविण्याची मानसिकता सत्ताधाऱ्यांमध्ये नाही. हा प्रश्न धसास लावण्यासाठी आपण आवाज उठवणार आहोत. ज्येष्ठांनी आरोग्याच्या बाबतीत काळजी घ्यावी. आपल्या अनुभवाचा फायदा नवीन पिढीला होतो. बिघडत चाललेल्या पिढीला सुधारण्यासाठी आणि आपली संस्कृती जोपासण्यासाठी ज्येष्ठांच्या अनुभवाची गरज आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक संघ लातूर द्वारा आयोजित महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) च्या ३४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. काळगे स्वागताध्यक्ष म्हणून बोलत होते.

दिवाणजी व श्याम मंगल कार्यालयात उत्साही वातावरणात या अधिवेशनाचे उद्घाटन झाले. महात्मा गांधी चौक ते अधिवेशनस्थळापर्यंत काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने लातूरकरांचे लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दीड हजार ज्येष्ठ नागरिक या अधिवेशनात सहभागी झाले आहेत. स्वस्थ राहा, मस्त राहा, आनंदी राहा, असा सल्ला यावेळी ज्येष्ठांना देण्यात आला. यावेळी 'फेस्कॉम'चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांना महाराष्ट्र भूषण व अरुण रोडे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. काळगे, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील व आमदार विक्रम काळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष अशोकराव तेरकर, सामाजिक न्याय विभागाचे उपायुक्त अविनाश देवशेटवार, 'फेस्कॉम'चे सचिव चंद्रकांत महामुनी, उपाध्यक्ष अंजुमन रशीद खान, महिला विभाग प्रमुख डॉ. निर्मला कोरे, संघटन सचिव डॉ. बी. आर. पाटील, प्रभाकर कापसे, जगदीश जाजू, आर. बी. जोशी, डॉ. सी. एन. जोशी, डॉ. माया कुलकर्णी, डॉ. मधुकरराव कुलकर्णी, प्रकाश घादगिने, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी लातूर शहर व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## मुख्याध्यापक - शिक्षकांनी पालकांशी जुळवून घेणे आवश्यक: जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** मानवी जीवनात गुरुचे, शिक्षकाचे स्थान अत्युच्च आहे. केवळ अध्यापनांवर , शिस्तीवर लक्ष केंद्रित न करता मुख्याध्यापक - शिक्षकांनी पालकांशी जुळवून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी केले.

लातूर येथील थोरमोटे लॉन्स येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात मुख्याध्यापक : कर्तव्य व जबाबदाऱ्या या विषयावर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी उपस्थितांना अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत अध्यापन करणारा शिक्षक म्हणजेच चालते बोलते संस्कार केंद्र असल्याचे सांगितले. पूर्वीच्या काळी गावातील शिक्षकाची, गुरुजींची छबी एवढी आदरणीय असायची की, गावातील शिक्षकाच्या कार्यपध्दतीवरून गाव ओळखला जात असे. मुख्याध्यापक हा आपल्या शाळेचा, विद्यालयाचा प्रमुख असतो. त्यांनी विद्यार्थी आणि पालकांच्या प्रति विश्वासार्हता निर्माण करणे फार महत्वाचे असते. त्यांनी आपल्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशीही जुळवून घेतले पाहिजे.

पालक आणि मुख्याध्यापक - शिक्षकांत समन्वय असल्यास कोणतीही गोष्ट अशक्य होऊ शकत नाही. शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी या उद्देशाने शैक्षणिक सहलींचेही आयोजन केले जात असते. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या सहली ऐतिहासिक, प्रेक्षणीय स्थळांसोबतच आपल्या परिसरातील कचरा डेपो मध्येही आयोजित करायला हव्यात असे यावेळी त्या म्हणाल्या.

या राज्यस्तरीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी रावसाहेब आवारी, वसंतराव पाटील, के.एस. डोमसे, मोहन सोनवणे, नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बिरकड, अशोक मोरे, संजय शिप्परकर, देविदास उमाटे, प्रकाश देशमुख, शिवराज म्हेत्रे आदी परिश्रम घेत आहेत.

## बाभळगावात अंतर्गत रस्त्याचे काम सुरु



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** आ. अमित देशमुख यांच्या स्थानीक आमदार विकासनिधीतून लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे रु. १० लाख स्थानिक आमदार विकासनिधी मंजूर झाला असून ही विकासकामे सुरू झाली आहेत. या विकासनिधीतून मौलानावस्ती येथे सिमेट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करण्यात येत आहे.

आमदार अमित देशमुख यांनी गावपातळीवर नागरीकांना सर्व प्रकारच्या मुलभुत सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत याकरीता स्थानिक आमदार विकासनिधी वेळोवेळी नियोजनबध्द वितरीत केला आहे.

या निधीतून होणाऱ्या विकासकामांच्या गुणवत्तेकडे देखील स्वत: लक्ष दिले आहे. बाभळगाव येथील मौलानावस्तीमध्ये वैशालीनगर रस्ता पासून अब्दूल रहमान यांच्या घरापर्यंत सिमेट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम या रु. १० लाख स्थानीक आमदार निधीतून सुरू झाले आहे. या रस्त्यामुळे या भागातील रस्त्यांची गुणवत्ता सुधारेल, परिसर स्वच्छ राहील, तसेच स्थानिक नागरिकांना दैनंदिन जीवनात सुलभता येईल. या विकासकामाचा लाभ बाभळगावच्या नागरिकांना मिळाला आहे. या बद्दल ग्रामपंचायत पदाधिकारी आणि नागरिकांनी आभार मानले आहेत.

## राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात IQC, जयंती महोत्सव समिती आणि अंतर्गत तक्रार कक्ष यांच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते, तर यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. जी. एल. पांढरे, कवि शिवाजी स्वामी, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. एन. एल. दलगडे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि संगमेश्वर मुळे यांची उपस्थित होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना नामदेव बेंदरगे म्हणाले की, रयतेचा राजा छत्रपती शिवराय घडवण्याचे श्रेय राष्ट्रमाता जिजाऊ यांच्याकडे जाते. शक्ती आणि युक्तीचा योग्य वेळी सुयोग्य वापर, युद्ध कला, तलवारबाजी, राजनीति, धर्मनिती आणि समाजकारणाचे धडे शिवरायांनी जिजाऊ मातेकडून घेतले. त्यामुळेच स्वराज्य स्वभाषा संस्कृती जोपासणारे हिंदवी स्वराज्य निर्माण झाले. यावेळी बोलताना डॉ. अश्विनी रोडे म्हणाल्या की, माँ साहेब जिजाऊ आणि विवेकानंद यांनी समाजामध्ये प्रयत्नवाद कार्यसंस्कृती रुजवली. यावेळी अनेकांनी उपस्थिती होती.

## विद्यार्थी शिकले म्हणूनच लातूर पॅटर्न घडला : प्रा. मोटेगावकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** संपूर्ण राज्यात अग्रेसर ठरलेला तसेच आजही ज्याची शैक्षणिक क्षेत्रात आवर्जून चर्चा होते,असा लातूर पॅटर्न शिक्षकांनी शिकविल्याने आणि विद्यार्थी शिकल्यामुळे घडला असल्याचे प्रतिपादन लातूरच्या आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनात शुक्रवारच्या दुसऱ्या सत्रात बोलताना केले.



लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात स्पर्धेच्या युगात पालकांची भूमिका व कर्तव्य या विषयावरील व्याख्यानात प्रा. शिवराज मोटेगावकर मार्गदर्शन करत होते.

यावेळी राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे , के.एस. ढोमसे, नंदकुमार बारवकर, दत्तात्रय कदम, मनोहर पवार, खंडेराव जगदाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानात प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षकांनी विद्यार्थी आणि पालक यांच्यातील दुवा म्हणून काम केले पाहिजे.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून जास्त अपेक्षा ठेवाव्यात. तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे ध्येय निश्चित करून त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करायला हवा. शिक्षणाचा बहुचर्चित लातूर पॅटर्न उगाच नाही घडला. शिक्षकांनी शिकवल्याने आणि विद्यार्थी शिकल्याने तो घडू शकला असे यावेळी प्रा. मोटेगावकर म्हणाले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



## केंद्रीय राखीव पोलीस दल भरती प्रशिक्षण संस्थेत योग अभ्यास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या भरती प्रशिक्षण संस्थेत आज योग अभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय यांच्या उपस्थित फिटनेस कार्यक्रमांतर्गत या योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले. योगाद्वारे शारीरिक आरोग्य, मानसिक शांती मिळविणे, तणाव कमी करणे आणि एकाग्रतेची क्षमता सुधारणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

केंद्रीय राखीव पोलीस दल भरती प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या मोहिमेत शासकीय मुले व मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, शासकीय वसतिगृहांचे प्रमुख आणि आरटीसी, सीआरपीएफ, अधिकारी, जवान, प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी सहभाग घेतला. योग हे शरीर आणि मन निरोगी ठेवण्याचे एक प्रभावी साधन आहे. योगामध्ये केलेली आसने केवळ स्नायूंनाच बळकटी देत नाहीत, तर संपूर्ण शरीर उर्जेने भरतात. तसेच, योगामध्ये अवलंबलेले प्राणायाम आणि श्वासोच्छवासाचे तंत्र तणाव कमी करण्यास आणि मानसिक शांती प्रदान करण्यास मदत करते, असे श्री. अन्सारी यावेळी म्हणाले. यावेळी उपस्थितांना योगाचे प्रात्यशिके दाखवण्यात आली.

## दुचाकीची चोरी; अज्ञातावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** शहरातील रिंगरोड परिसरातून दुचाकी पळविल्याची घटना बुधवारी घडली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महेश परमेश्वर कावळे (वय ३४ रा. कावळे नगर, कन्हेरी रिंगरोड, लातूर) यांची दुचाकी (एम.एच. २४ बी.पी. ३७४३) नाईक चौक परिसरातून अज्ञात चोरट्यांनी पळविली. ही घटना ८ जानेवारी रोजी घडली. सर्वत्र शोधाशोध घेतली असता दुचाकी आढळून आली नाही. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस नाईक बेस्के करीत आहेत. दरम्यान, शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

## एक कोटीच्या लूट प्रकरणातील आरोपीला अटक : गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** वाशिम जिल्ह्यातील एक कोटी १५ लाख रुपयांच्या बॅग लुटीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

वाशिम जिल्ह्यातील वाशिम शहर पोलीस ठाण्यात दाखल एका गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी लातूरच्या औसा रोडवरील एका मंगल कार्यालयाच्या परिसरात थांबला असल्याची माहिती लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात सदर पथकाने तत्काळ त्या ठिकाणी पोहोचून संशयित स्वप्निल परसराम पवार (वय २८, रा. तोंडगाव, ता. वाशिम) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. ९ जानेवारी २०२५ रोजी वाशिम येथील हिंगोली गेट उड्डाणपुलाजवळ एका दुचाकी चालकास अडवून, रॉडने मारहाण करून त्याच्याकडील १ कोटी १५ लाख रुपये असलेली बॅग हिसकावून



पोलिसांच्या भीतीने वाशिम जिल्ह्याच्या बाहेर पडल्याची त्याने कबुली दिली. वाशिम पोलिसांशी संपर्क साधला असता, वाशिम शहर पोलिसांत सदर गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आले. आरोपीला वाशिम स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पोलीस अंमलदार मोहन सुरवसे, युवराज गिरी, अर्जुन राजपूत, दीनानाथ देवकते, मुन्ना मदने यांनी ही सेवा बजावली.

## जिल्हास्तरीय विधीज्ञ स्पर्धांचे शानदार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जानेवारी -** लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने संविधान रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय बॅडमिंटन, जलतरण, कॅरम, बुद्धिबळ, चेस, टेबल टेनिस, कबड्डी व क्रिकेट स्पर्धाचे उदघाटन महाराष्ट्र व गोवा वकील परिषद मुंबई सदस्य ॲड. अण्णाराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. व्यकटराव बेंद्रे, रोटरी क्लबचे ॲड. जांबुवंतराव सोंनकवडे, ॲड. आशिष बाजपाई, ॲड. मधूकर राजमाने, ॲड. चंद्रकांत आगरकर, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष देशपांडे, माजी जिल्हा न्यायाधीश ॲड. आर. वाय. शेख आदींची उपस्थिती होती संत तुकाराम विद्यालयाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धा सुरू झाल्या आहेत.

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दिनदर्शिकेचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विमोचन

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.१२ जानेवारी -

येथील भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले यांनी प्रकाशित केलेल्या दिनदर्शिकेचे शिर्डी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

या दिनदर्शिकेमध्ये मागच्या वर्षभरात उदगीर भाजपच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती या दिनदर्शिकेतून देण्यात आली आहे. अतिशय सुंदर अशी दिनदर्शिका प्रकाशित केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले.

यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपनगराध्यक्ष सुधीर भोसले, दत्ताजी पाटील, प्रशांत रंगवाळ, यांची उपस्थिती होते.





## राजमाता जिजाऊंना अभिवादन...



### उदयगिरी महाविद्यालय

उदगीर, दि.१२ जानेवारी -

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी होकरणे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी दिनविशेष समितीचे प्रमुख प्रा.डॉ. गौरव जेवळीकर, प्रा.एन.के. खांडेकर, प्रा.एस. एस. मजगे, प्रा.एस.एस. स्वामी यांची विशेष उपस्थिती होती.



### कै. रसिका महाविद्यालय

देवणी, दि.१२ जानेवारी -

कै. रसिका महाविद्यालय देवणी येथे राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांची व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्या हस्ते राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटके यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### शिवाजी महाविद्यालय

उदगीर, दि.१२ जानेवारी -

शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रमाता राजमाता आईसाहेब जिजाऊ यांची व तसेच युवकांचे प्रेरणास्थान युगपुरुष महान अध्यात्मिक गुरु स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा.डॉ. रामकिशन मांजरे होते. त्यांनी जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले. यावेळी छत्रपती शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्वगुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता जिजाऊ होत्या तर जीवनात जोखीम पत्करा, जिंकलात तर नेतृत्व कराल, हारलात तर इतरांना मार्ग दाखवाल असे सांगणारे स्वामी विवेकानंद असा त्यांच्या कार्यावर प्राचार्य डॉ. मांजरे यांनी उजाळा दिला. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेणूका देवी मंदिराला तिर्थक्षेत्राचा दर्जा

### आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या प्रयत्न यश...

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.१२ जानेवारी -

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील प्रसिद्ध व जागृत देवस्थान रेणूका देवी मंदिराला माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या विशेष प्रयत्नातून तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला असून अनेक वर्षापासून विकासापासून कोसोदूर असलेल्या या मंदिराचा व परिसराचा कायापालट होणार आहे.

यामुळे अंबुलगा (बु) व पंचक्रोशीतील होसूर, नदिवाडी, चिचोंडी, बोटकुळ, आनंदवाडी, शिऊर, काटेजवळगा, केदारपूर, हणमंतवाडी, आंबेवाडी, झरी या गावातील भाविक भक्तामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्र मोहत्सवात या मंदिर परिसरात हजारो भाविक भक्त दर्शनासाठी



येत असल्याने त्याना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता.

रेणूकादेवी मंदिराचे जूने बांधकाम असून मंदिर जिर्नअवस्थेत आहे. मंदिर परिसरात मुलभूत सुविधांचा अभाव असल्याने भाविकाना अडचणी निर्माण होत होत्या. परंतु तिर्थक्षेत्राचा दर्जा मि ळाल्याने आता मंदिर व मंदिर परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात होणार आहे.

जागृत देवस्थान रेणूका माता मंदिर माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यानी विशेष प्रयत्न करून तिर्थक्षेत्राचा दर्जा दिल्यामुळे मंदिराचे प्रमुख सुभाष पुजारी, चेअरमन, सुभाष म्हेत्रे, भानुदास होरे, वामनराव भालके, चेअरमन अरविंद चव्हाण, दिलीप मिरगाळे, शेखर मिरगाळे, माधवराव पाटील, विलास पाटील, व्यंकट कांबळे, बळीराम शिंदे, रावसाहेब आंबेगावे, मारूती कांबळे, वामन कांबळे, हिरालाल कांबळे, नरशिंग म्हेत्रे, उत्तम मिरगाळे, नरशिंग सुर्यवंशी, दत्तू सुर्यवंशी, दशरथ गोडगे, विजयकुमार सुर्यवंशी, संदीप शिंदे, चक्रधर बिरादार, दयानंद म्हेत्रे, शिवाजी निवृत्ती सुर्यवंशी, श्रीरंग हारगुळे, शहशांह सुर्यवंशी, चंद्रकांत सुर्यवंशी, नरशिंह कुलकर्णी, उमेश होरे, बब्रुवान सुर्यवंशी, शिवकरण होरे, विनोद हारगुळे, सचिन माने, राजकुमार बडगे आदि भाविकासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी आमदार निलंगेकर यांचे आभार मानले आहेत.

## निलंग्यात राजमाता माँसाहेब जिजाऊ जन्मोत्सव साजरा



तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.१२ जानेवारी -

राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ यांचा जन्मोत्सव निलंगा शहरात मराठा सेवा संघाच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

निलंगा शहरातील राजमाता जिजाऊ चौक येथे झेंडा वंदन करून माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सम जबांधवांनी अभिवादन केले तसेच फटाक्यांची आतषबाजी करत 'जय जिजाऊ जय शिवराय', 'तुमचं आमचं नातं काय जय जिजाऊ जय शिवराय', छत्रपती शिवाजी महाराज की जय' अश्या घोषणा देऊन उपस्थितांनी परिसर दणाणून सोडला होता.

यावेळी एम.एम. जाधव, विनोद सोनवणे, शेषराव शिंदे, मोहन घोरपडे, आर.के. नेलवाडे, डॉ.उद्धव जाधव, डी.बी. बरमदे, अनिल जाधव, प्रकाश सगरे, अजय मोरे, डी.एन. बरमदे, आर. एन. बरमदे, प्रकाश सगरे, संजय इंगळे, डॉ. नितीन चांदूरे, दत्तात्रय बाबळसुरे आदी उपस्थित होते.



## अंगणवाड्यांना ग्रा.पं.व मायक्रो फायनान्स फॉउंडेशनतर्फे साहित्य वाटप

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.१२ जानेवारी -

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील जिल्हा परिषद अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमात आलेल्या चार अंगणवाड्याना ग्रामपंचायत व ग्रामीण कोटा फायनान्स फॉऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक विकास कार्यक्रम अंतर्गत गावातील चार अंगणवाड्याना कपाट, कार्पेट, खुर्च्या, पाण्याची टाकी, जेवनाचे ताट, कुकर, ग्लास, घागर, चप्पल स्टँड असे साहित्य पुरवठा करण्यात आले असून यामुळे अंगणवाडीतील लहान मुलांची सोय करण्यात आली आहे.

कार्यक्रमासाठी सरपंच स्वाती शिंदे, बाल विकास प्रकल्प अधिकारी बालाजी कोरे, विस्तार अधिकारी दत्तात्रय जगताप, ए.एम. गोरे, सुनिल सिंगे, उपसरपंच जगदिश सगर, मुख्याध्यापक शिवशंकर मिरगाळे, ग्रा.पं. सदस्य महावीर काकडे, अंगणवाडी सेविका, मदतनीस, गावातील महिला, मुले यावेळी उपस्थित होते.

नाविन्य पूर्ण उपक्रमात आलेल्या चारही अंगणवाड्याना बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी कोरे व विस्तार अधिकारी दत्तात्रय जगताप यानी प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले.

## स्वागताध्यक्षपदी डॉ. अरविंद भातांब्रे यांची निवड

तभा वृत्तसेवा
शिरूर अनंतपाळ, दि.१२ जानेवारी -

१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळ व मराठवाडा साहित्य परिषद शाखा-शिरूर अनंतपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. अरविंद भातांब्रे यांची शिक्षण महर्षी प्रभाकरराव



कुलकर्णी गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते साहित्य संम ेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. अरविंद भातांब्रे यांची निवड करण्यात आली.

या निवडीचे पत्र मंडळाचे अध्यक्ष प्रा. बालाजी येरोळे व सचिव प्राचार्य शिवाजीराव मादलापूरे यांच्या हस्ते देण्यात आले.

याप्रसंगी साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळाचे उपाध्यक्ष गुरूनाथ शिंदाळकर, सहसचिव किसनराव इंदुलकर, कोषाध्यक्ष धनाजी लखनगावे, तानाजी सोनटके,किरण कोरे, उमाकांत सलगरे आदी साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी डॉ. अरविंद भातांब्रे यांची साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे नामदेव जगताप, महादेव आवाळे, चक्रधर शेळके, सोमेश्वर तोंडारे, देविदास सांगवे, व्यंकट हांड्राळे, मुसा मुजेवार, संजय व्यंजने, राजू पानगावे आदी अभिनंदन केले.

## वि.का.से. सहकारी सोसायट्या बळकट करणार : बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा
अहमदपूर, दि.१२ जानेवारी -

सहकार विभागाच्या माध्यमातून गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या संस्थांना आर्थिक सहाय्य देवून त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी गोडावून उभारणी, विविध सेवांचा पुरवठा, कामकाजाचे संगणकीकरण आदी कामांसाठी मदत करण्यात येत असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे अंतर्गत रस्ते विकास कामाच्या भूमि पूजनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी त्यांनी सिमेंट रस्ता कामाचे भूमिपूजन केले. उपसरपंच विठ्ठल बोडके, ग्रामपंचायत सदस्य निजाम शेख, धनराज बोडके,



चंद्रप्रकाश हंगे, श्रीहरी चाटे यांच्यासह सुनील वावळे, ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र कांबळे, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

आपल्या राज्याच्या विकासात सहकारी संस्थांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे पुढील काळात सहकार चळवळ अधिक बळकट करून तळागाळातील व्यक्तीला या चळवळीसोबत जोडण्याचे प्रयत्न केले जातील. तसेच अडचणीतील सहकारी संस्थांना मदत करण्यात येणार असून आवश्यकतेनुसार नवीन संस्थांची उभारणी देखील करण्यात येईल.

सहकार चळवळीच्या माध्यमातून रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती ना. पाटील यांनी यावेळी दिली.

तसेच किनगाव मधील अंतर्गत रस्त्यांच्या कामासोबतच गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

## आंबेवाडीचा नवतरूण गणेश मंडळ चाकूर तालुक्यात अव्वल



तभा वृत्तसेवा
चाकूर, दि.१२ जानेवारी -

गणेशोत्सव -२०२४ मध्ये पोलिस प्रशासनाने उत्कृष्ट गणेश मंडळ या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान आंबेवाडी (ता.चाकूर) येथील नवतरुण गणेश मंडळाने मिळवला असून जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते पोलिस ठाणे चाकूर येथे आयोजित पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रशस्तिपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी बी. चंद्रशेखर रेड्डी, पो.नि. दत्तात्रय निकम, पोउनि. राजेश घाडगे आणि तालुक्यातील म न्यवरांसह सोपान पाटील, गंगाधर मोतीपवळे, महादेव मोतीपवळे, तुळशीराम मोतीपवळेसह गणेश मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष अक्षय मोतीपवळे, उपाध्यक्ष आकाश मोतीपवळे, सचिव मुकेश येडले, सागर मोतीपवळे, गणेश गुणाले, शुभम कोरे, शुभम मोतीपवळे, ज्ञानेश्वर गुणाले, ओमकार मोतीपवळे, अजय राडकर ओमप्रकाश मोतीपवळे, अमोल मोतीपवळे, सतिष मोतीपवळे उपस्थित होते.

समाज उन्नतीसाठी किर्तन, कवी संमेलन, रक्तदान शिबीर, महिला सबलीकरण कार्यक्रम, आरोग्य शिबिर, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा कार्यक्रम राबविण्यात आले होते.

## प्रेरणादायी विचार आत्म सात करावेत : केंद्रे

लातूर, दि.१२ जानेवारी -

राजमाता माँ जिजाऊंनी बाल शिवबांवर चांगले संस्कार केले. यामुळे शिवाजी महाराजांनी स्वराज्यासह सुराज्याची स्थापना केली. आजच्या मातांनीही आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार प्रेरणादायी आहेत, ते आत्मसात करावेत, असे आवाहन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी रविवारी केले.

## ऑलम्पीयाड स्पर्धा परीक्षेतील गुणवंताचा सत्कार



### ब्लू बर्ड इंटरनशनल स्कूलचा पुढाकार...

तभा वृत्तसेवा
औसा, दि.१२ जानेवारी -

आलम्पियाड फाउंडेशनच्या वतीने जागतिक स्तरावरील विज्ञान व इंग्रजीच्या घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षेत औसा तालुक्यातील श्री विश्वेश्वरय्या शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत असलेल्या ब्लू बर्ड स्कुलच्या ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यापैकी तीन विद्यार्थ्यांची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली असून १८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या आलम्पीयाड स्पर्धा परीक्षेतील विज्ञान व इंग्रजी या विषयाचा निकाल नुकताच जाहीर झाला असुन या ब्लू बर्ड स्कुलम धील सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये १८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी रुद्र किशोर पारडकर, उमर मुख्तारअली सिद्दीकी, श्रीयश श्रीपाद ढोक या तीन विद्यार्थ्यांची पुढील परीक्षेसाठी निवड झाली आहे. तर संकेत परमेश्वर चिलके, क्रांतीसिंग अमरसिंग हजारी, समृद्धी महादेव गुरुशेट्टे, सिध्दांत महादेव गुरुशेट्टे, प्रथमेश महेश शिंदे, स्वरांजली निलेश ठेसे, अंशुमन हर्षद जाधव, आरहान एम डी सय्यद, गंगोत्री सोमनाथ कदम, राघव मनोज पाटील, आरखाम अजमत पटेल, उमरफारुख कलीम ोद्दीन पटेल, श्रेया शंकर आगवाने, श्रध्दा रामेश्वर गुरुशेट्टे हे १५ विद्यार्थी सुवर्णपदकास पात्र ठरले आहेत.

या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने अध्यक्ष शिवचरण धाराशिवे व उपाध्यक्ष प्रभाकर कापसे यांच्या हस्ते करण्यात आला. विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्वेश्वरय्या औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर विभाग प्रमुख प्रवीण साबदे, अंकुश बिडवे व स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे इत्यादी उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना मंजुर शेख, विनोद पांडुळे, हालिमा अरब, परमेश्वर चिलके, रश्मी दुधनकर, सुप्रिया जाधव, फिरदोस सय्यद, तानाजी जाधव, सौरभ वडे, वैष्णवी ढेकणे, मयुरी सुर्यवंशी, रुपाली कुंभार, श्रीदेवी कवटे, मिनहाज शेख, नामजीन सय्यद, गीता चव्हाण, पायल घायल, नितू भंडारी व दिपक खोजे यांनी मार्गदर्शन केले होते.

# वर्तमान पत्र हे प्रबोधनाचे मोठे माध्यम : नरेंद्र मेडेवार

तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.१२ जानेवारी -

पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी शनिवार दि ६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिम ेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व कार्यक्रमास सुरवात करण्यात आली.

पत्रकार दिनानिमित्त उपस्थित पत्रकारांचा सत्कार आयोजीत करण्यात आला होता मंचावर अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की आज जवळपास १९० वर्ष झाली तरी पत्रकारिता टिकुन आहे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे महान कार्या हे अलौकीक आहे आणि आजही पत्रकाराच्या लेखणीतून ते जगासमोर अविरत चालू आहे. समाज सुधारण्यासाठी निर्भीड पणे लेखणीचे कार्य करून समाजाची दिशा ठरविण्याचे काम जांभेकरांनी केले. तसेच जगाला जागा करण्याचं महान काम वर्तम नपत्रानी केले, समाजात जनजागृती, तसेच समाजात घडणाऱ्या घडामोडीना गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहचविण्या कार्य पत्रकारितेच्या



माध्यमातून पत्रकार करीत आहेत. भारताच्या इतिहासात धर्म सुधारणा चळवळ ही महाराष्ट्रात प्रामुख्याने पत्रकारांच्या माध्यमातुनच टिकुन आहे. वाचनाची सुरवात ही वर्तम ानपत्रातुनच होते त्यामुळे वर्तमान पत्र हे प्रबोधनाचे मोठे माध्यम आहे त्यासाठी वर्तमान पत्र हे प्रत्येकाच्या घरात असलेच पाहिजे असे प्रतिपादन केले.

यावेळी मंचावर बीडीओ नरेंद्र मेडेवार, मज्जीद मोमीन, शरद पवार, अॅड. अमोल कळसे, ओम कार सोनटके, विवेक पोतदार, शिवा काळे, राजकुमार धुळशेट्टे, अजीज मोमीन, माधव होणराव प्राचार्य तथा, चंद्रशेखर कळसे, संगम डोंगरे, सचिन काडवदे, महेश देशमुख, नितिन मुस्कावाड, शेख मैनोदीन, राहुल सुवर्णकार, केंद्रे संभाजी, अकुळवाड राजाराम, वैजनाथ शिनधिकुमठे, शांतवीर कासनाळे, संजय घोरपडे, मिलिंद कांबळे, विजय घटवाले, नामदेव नागरगोजे, लक्ष्मण ढोबळे हाळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक नागेश गोविंदवाड सूत्रसंचालन साहयक प्रशासन अधिकारी सचिन काडवदे यांनी केले.